म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा.
दा. क्र. : ११२५

BVBK-0401115

वा। ५।
७७७५।

BVBK-0401115

मनोरंजक
सुबोध
गोष्टी

भाग १ ला



सुशील, प्रेमळ, धर्मनिष्ठ पत्नी

कै. सौ. सरस्वतीबाई पाटणकर

ह्यांना सप्रेम समर्पण

# प्रस्तावना

गेल्या काही वर्षांत मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक इत्यादि दालने समृद्ध होत असली तरी "बालवाङ्मय" हा प्रकार उपेक्षितच राहिलेला आहे. साने गुरुजी, ना. धों. ताम्हनकर ह्यांसारखे अपवाद वगळले तर जाणीवपूर्वक बालवाङ्मय लिहिले जात नाही व जे लिहिले जाते ते पुष्कळसे भाषांतरित किंवा रूपांतरित असते. त्यामुळे ते आपल्या समाजजीवनापासून बरेच दूरचे आहे असे वाटते. मुलांच्या मनात जात्याच प्रत्येक गोष्टीबद्दल कुतूहल असते, साहसाबद्दल त्यांना प्रेम असते तर अद्भुततेबद्दल त्यांना आकर्षण असते. साहजिकच अतिशय साध्या परंतु रसाळ भाषेत जर बालवाङ्मय लिहिले गेले व वरील गुणांवर ते आधारित असले तर ते मुलांना अतिशय आवडते असा अनुभव येतो. परंतु बालवाङ्मयात केवळ अद्भुतता असून चालत नाही, तर त्याला वास्तवतेचा स्पर्श पाहिजे. वाङ्मयासाठी जीवन नसले तरी जीवनासाठी वाङ्मय असते, त्यामुळे लहान मुलांच्या मनावर योग्य ते संस्कार करणे व एका अर्थाने त्यांना घडविणे हे बालवाङ्मयाचे उद्दिष्ट असावे लागते.

श्री. ग. शि. पाटणकर यांच्या कथा बालवाङ्मयासंबंधीच्या ह्या अपेक्षा पुष्कळशा प्रमाणात पूर्ण करतात. कथा–कीर्तने हा त्यांचा छंद असल्यामुळे पुष्कळशा आख्यायिका, आठवणी ह्यांचे भांडार त्यांच्याजवळ आहे. भाषा कीर्तन..सारखीच रसाळ व ओघवती आहे व निवेदनशैली पण आकर्षक आहे. कथाविषयांमध्ये विविधता असून प्रत्येक कथेतून तात्पर्य काढण्याची वृत्ती आहे. विद्यार्थ्यांनी देशाचा व धर्माचा अभिमान बाळगला पाहिजे असे ते एखाद्या कथेतून सांगतात तर लाचलुचपत अधिकारी" ह्या कथेतून लाचलुचपत पाप आहे हे लक्षात ठेवावयास सांगतात. शिक्षकांना फसविणे म्हणजे स्वतःला फसविणे आहे अशी शिकवण ते देतात तर "प्रधानाची हुशारी" सांगून लबाडी फार काळ टिकत नाही हा ठसा ते मुलांच्या मनावर ठसवितात. मुलांचा कल कशाकडे आहे ह्यावर पालकांनी लक्ष ठेवावे असे मा..न ते पालकांनाही करतात.

सारांश, श्री. ग. शि. पाटणकर ह्यांच्या गोष्टी बालांपासून थोरांपर्यंत व शि..कांपासून पालकांपर्यंत सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील असा विश्वास वाटतो. ..राष्ट्रातील असंख्य बालवाचक ह्या पुस्तकाचे स्वागत करतील अशी मी ..शा बाळगतो.

**नी. र. सहस्रबुद्धे**
**प्राचार्य**
**पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले, मुं. ५७**

.. २४–७–७४

# लेखकाचे निवेदन



श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासनवमीचा उत्सव गिरगावातील ( मुंबई ४ ) श्री. फडके यांच्या श्रीगणपती मंदिरात मोठ्या थाटात सुरू होता. त्याच वेळी म्हणजे ता. ९ फेब्रुवारी १९७४ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या विधानसभेचे माजी सभापती माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते मी लिहिलेल्या कीर्तन दृष्टान्त ( मनोरंजक सुबोध गोष्टी ) या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रकाशनाच्या वेळी श्री. बाळासाहेबांनी माझ्या पुस्तकाची मुक्तकंठाने स्तुती केली व हे पुस्तक अतिशय लोकप्रिय होईल असा भरंवसा

व्य. केला. श्रीहरि पांडुरंगाच्या कृपेने त्यांचे म्हणणे खरोखरच खरे ठरून अवघ्या सहा महिन्यांच्या अवधीत पुस्तक लोकप्रिय होऊन रसिक वाचकांनी पुस्तकाचा गौरव करून त्यातील गोष्टी रसाळ, सुगम व नाट्यपूर्ण असल्याचे कळवून मुलांकरिता एखादे स्वतंत्र सचित्र गोष्टींचे पुस्तक तयार करण्याच्या सूचना केल्या. त्याचप्रमाणे आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून ता. २६-४-१९७४ रोजी माझ्या या पुस्तकाचे नवनीत मासिकाचे माननीय संपादक श्री. उमाकांत ठोमरे यांनी केलेले परीक्षण ध्वनिक्षेपित झाले. वरील प्रोत्साहनामुळे म्हातारपणी नवतारुण्याचा जोम अंगात येऊन कामाला सुरुवात केली व त्याचेच फळ म्हणजे वाचकांच्या हाती असलेले सत्तर मनोरंजक सुबोध गोष्टींचे हे पुस्तक होय.

जगदृष्ट्या हे पुस्तक माझी कृति दिसत असली तरी थोडक्यात सांगावयाचे झाल्यास संतांच्या वाङ्मयरूपी आमराईतून आंबे काढून त्यांचा रस काढून त्यात मी तयार केलेला आधुनिक मसाला व विनोदरूपी मिरपूड घालून हा गोष्टिरूपी आंबरस जनसेवेला सादर करीत आहे. असा हा नावीन्यपूर्ण लज्जतदार कथारूपी आंबरस कोणाला बरे आवडणार नाही ? त्या संत महात्म्यांना शतशः प्रणाम.

झाड लहान असताना वाकविता येते, माती ओली असतानाच तिला आकार देता येतो. त्या प्रमाणे मुले लहान असतानाच त्यांची मने वळवून त्यांच्यावर चांगले संस्कार करता येतात. त्या दृष्टीने हलीच्या या संस्कारशून्य वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या मनावर चांगला परिणाम करण्याच्या दृष्टीने या पुस्तकांचा नक्की उपयोग होईल असा विश्वास वाटल्यावरून मी हे पुस्तक प्रसिद्ध करीत आहे. एकंदरीत हे पुस्तक सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना आवडेल व प्रत्येक मराठी माणूस, सहजता, विविधता, व रंजकतायुक्त असे हे पुस्तक संग्रही ठेवून यातील गोष्टी पुन्हा पुन्हा आवडीने वाचील व मुलांना सांगेल यात मुळीच शंका नाही.

या पुस्तकातील काही गोष्टींविषयी गैरसमज होण्याचा संभव व धोका असल्याचे कळल्यावरून मी त्याचा खुलासा करीत आहे.

# लेखकाचे निवेदन



श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासनवमीचा उत्सव गिरगावातील ( मुंबई ४ ) श्री. फडके यांच्या श्रीगणपती मंदिरात मोठ्या थाटात सुरू होता. त्याच वेळी म्हणजे ता. ९ फेब्रुवारी १९७४ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या विधानसभेचे माजी सभापती माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते मी लिहिलेल्या कीर्तन दृष्टान्त ( मनोरंजक सुबोध गोष्टी ) या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रकाशनाच्या वेळी श्री. बाळासाहेबांनी माझ्या पुस्तकाची मुक्तकंठाने स्तुती केली व हे पुस्तक अतिशय लोकप्रिय होईल असा भरंवसा

व्य केला. श्रीहरि पांडुरंगाच्या कृपेने त्यांचे म्हणणे खरोखरच खरे ठरून अवघ्या सहा महिन्यांच्या अवधीत पुस्तक लोकप्रिय होऊन रसिक वाचकांनी पुस्तकाचा गौरव करून त्यातील गोष्टी रसाळ, सुगम व नाट्यपूर्ण असल्याचे कळवून मुलांकरिता एखादे स्वतंत्र सचित्र गोष्टींचे पुस्तक तयार करण्याच्या सूचना केल्या. त्याचप्रमाणे आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून ता. २६-४-१९७४ रोजी माझ्या या पुस्तकाचे नवनीत मासिकाचे माननीय संपादक श्री. उमाकांत ठोमरे यांनी केलेले परीक्षण ध्वनिक्षेपित झाले. वरील प्रोत्साहनामुळे म्हातारपणी नवतारुण्याचा जोम अंगात येऊन कामाला सुरुवात केली व त्याचेच फळ म्हणजे वाचकांच्या हाती असलेले सत्तर मनोरंजक सुबोध गोष्टींचे हे पुस्तक होय.

जगदृष्ट्या हे पुस्तक माझी कृति दिसत असली तरी थोडक्यात सांगावयाचे झाल्यास संतांच्या वाङ्मयरूपी आमराईतून आंबे काढून त्यांचा रस काढून त्यात मी तयार केलेला आधुनिक मसाला व विनोदरूपी मिरपूड घालून हा गोष्टीरूपी आंबरस जनसेवेला सादर करीत आहे. असा हा नावीन्यपूर्ण लज्जतदार कथारूपी आंबरस कोणाला बरे आवडणार नाही ? त्या संत महात्म्यांना शतशः प्रणाम.

झाड लहान असताना वाकविता येते, माती ओली असतानाच तिला आकार देता येतो. त्याप्रमाणे मुले लहान असतानाच त्यांची मने वळवून त्यांच्यावर चांगले संस्कार करता येतात. त्या दृष्टीने हल्लीच्या या संस्कारशून्य वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या मनावर चांगला परिणाम करण्याच्या दृष्टीने या पुस्तकांचा नक्की उपयोग होईल असा विश्वास वाटल्यावरून मी हे पुस्तक प्रसिद्ध करीत आहे. एकंदरीत हे पुस्तक सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना आवडेल व प्रत्येक मराठी माणूस, सहजता, विविधता, व रंजकतायुक्त असे हे पुस्तक संग्रही ठेवून यातील गोष्टी पुन्हा पुन्हा आवडीने वाचील व मुलांना सांगेल यात मुळीच शंका नाही.

या पुस्तकातील काही गोष्टींविषयी गैरसमज होण्याचा संभव व धोका असल्याचे कळल्यावरून मी त्याचा खुलासा करीत आहे.

गोष्ट नं. ७–'हल्लीचे जग वशिल्याचे' ही गोष्ट रशियातील मॉस्को शहरातील नाही. दुसऱ्या एका परदेशी राजधानीतील आहे. क्षमस्व.

गोष्ट नं. १९–' 'मुलांनो, कायदे मोडू नका.' ही एक सत्यकथा आहे. यातील पोलीसखात्याबद्दल काढलेले उद्गार लेखकाचे नसून मुंबईच्या एका सोनाराचे आहेत. लेखक हा एक सरकारी क्लास टू सेवानिवृत्त अधिकारी असून त्याला पोलीस खात्याबद्दल नेहमी आदर होता, आहे व पुढेही राहील.

गोष्ट नं. २६–'खेड्यातील' शाळा ( एक गंमत ). ही गोष्ट फार जुनी म्हणजे ब्रिटिश राजवटीतील आहे. स्वराज्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र-राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी जातीने लक्ष घालून शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र फरक घडवून आणला आहे. त्यामुळे आता खेड्यातील शाळा व शहरातील शाळा असा बिलकूल फरक नाही. खेड्यातील लोकांचा गैरसमज होऊ नये म्हणून खुलासा.

माझ्या सेवानिवृत्तीच्या काळातील या कृतिला महाराष्ट्र शासनाचे शिक्षणखाते व लायब्ररी खाते उत्तेजन देईल व महाराष्ट्रातील शाळांतून मुलांना बक्षीस देण्याकरिता व प्रत्येक मराठी शाळेतील मुलांच्या लायब्ररीत व सार्वजनिक लायब्ररीतून ठेवण्याबद्दल शिफारस करील, अशी अपेक्षा बाळगून, व मला तसा जबरदस्त आत्मविश्वास वाटल्यावरून मी या कागदटंचाईच्या व महागाईच्या दिवसांत हे पुस्तक छापण्याचे धाडस करीत आहे.

या पुस्तकाच्या बाबतीत व "कीर्तन दृष्टान्त" या गोष्टींच्या पुस्तकाच्या बाबतीत ज्या माननीय साहित्यिकांनी व शाळांच्या मुख्याध्यपकांनी अभिप्राय दिले, त्याचा मी अत्यंत ऋणी आहे. श्री. सी. एम्. विटणकर यांनी गोष्टींना अनुरूप सुबक चित्रे व मुखपृष्ठावरील तीनरंगी चित्र प्रेमाने काढून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. तसेच, मुंबई वैभव प्रेसचे मॅनेजर श्री. पुरुषोत्तम अच्युत गुर्जर यांनी थोडक्या दिवसात उत्तम तऱ्हेने पुस्तक छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मी हे निवेदन संपवितो.

**१०१, ब्राह्मणवाडी, माटुंगा, मुंबई–१९.**
**टेलिफोन नंबर ४७६९०१**

आपला नम्र,
**ग. शि. पाटणकर**

# अनुक्रमणिका


| गोष्ट | पृष्ठ |
|---|---|
| स्वधर्माभिमान | १७ |
| विद्यार्थी म्हणजे विद्यार्थी | १९ |
| पूर्वजन्मीचा घेणेकरी | २१ |
| लाचलुचपत अधिकारी | २२ |
| आजकालची मुले | २४ |
| मुलांनों, असे करू नका | २५ |
| हल्लींचे जग वशिल्याचे | २६ |
| प्रधानाची हुशारी | २८ |
| धूर्त सासरा | ३० |
| मुलांनो, मोहाला बळी पडू नका | ३१ |
| नारद क्षमा मागतात | ३३ |
| साठी बुद्धी नाठी | ३४ |
| येतो हिताचा कळवळा | ३५ |
| हुशार, धोरणी शामभट | ३७ |
| मुलगा कोण होईल ? | ३९ |
| आम्हा बायकांना कमी लेखू नका | ४० |
| अन्नदान थोर पुण्य | ४३ |
| निंदा कीं स्तुती | ४४ |
| मुलांनों, कायदे मोडू नका | ४६ |
| कोणाचाही द्वेष करू नये. | ४८ |
| हिटलरची क्यू पद्धत | ५० |
| शाळेचा बक्षीस समारंभ | ५१ |
| समाधान हेच खरें सुख | ५३ |
| नद्यांचा देवाकडे मोर्चा | ५५ |
| कलावंतालाच कलेचे कौतुक | ५६ |
| खेड्यातील शाळा ( एक गंमत ) | ५७ |
| श्रेष्ठ गुण धैर्य | ५९ |
| बालस्वभाव ओळखण्यास शिका | ६१ |
| फार चिकूपणाही चांगला नाही | ६२ |
| सारी पुरुषजात थापेबाज | ६३ |
| अवघड कोडे सोपे उत्तर | ६५ |
| शहरातील भामटे | ६६ |
| हजरजबाबी धूर्त स्त्रिया | ६९ |
| अंगरक्षकाची चाचणी परीक्षा | ७१ |
| बालादपि सुभाषितं ग्राह्यम् | ७३ |
| हुशार राजकन्या | ७५ |
| देव तारी त्याला कोण मारी | ७८ |
| खऱ्या गुणाची पारख | ८० |
| कोणास कोणी हसू नये | ८२ |
| साधूचा उपदेश | ८२ |
| तीन पढतमूर्ख | ८५ |
| मित्राचा सल्ला | ८७ |
| चतुर कारभारी | ८८ |
| सुखाचा मार्ग | ९० |
| खोटी स्तुती | ९१ |
| कोण काय करील-नेम नाही | ९२ |
| खरा श्रीमंत कोण | ९४ |
| लोकशाही राज्यातील दुष्काळ | ९५ |

माणसे ओळखण्यास शिका ९६
बुवाबाजीपासून सावध राहा ९७
लोकसेवा हीच खरी ईश्वरसेवा ९९
हुशारपणाचे बक्षिस १००
लबाड लोभी पुजारी १०२
तीन विद्यार्थी तीन स्वभाव १०३
समाजातील साप १०४
गर्वाचे घर खाली १०५
एकाचे अन्न दुसऱ्याचं विष १०७
पूर्वीचे लहरी संस्थानिक १०८
कोणालाही फसवू नका ११०
मागण्या योग्य असाव्यात १११
प्रयत्न सोडू नका ११३
म्हाताऱ्या माणसांचे ऐका ११४
मित्र पारखून मैत्री करावी ११६
जसा वेष तशी भिक्षा ११८
व्यवहारज्ञान श्रेष्ठ ११९
गोदानाने स्वर्गप्राप्ती १२०
कोणाचेही दोष काढू नका १२२
खोटा अहंकार १२२
नातवाचा आजीवर विश्वास १२३
पूर्वीचे हैद्राबाद संस्थान १२४
आमचे लोकप्रिय मास्तर १२५

**महाराष्ट्र राज्य शासनाच्या विधानसभेचे माजी सभापती माननीय श्री. बाळासाहेब भारदे लिहितात —**

डॉ. पाटणकर यांनी लिहिलेले " मनोरंजक सुबोध गोष्टी " मी वाचले. डॉ. पाटणकर हे कीर्तनकार आहेत. गोष्टीतून उपदेश हा त्यांच्या कथनाचा स्थायीभाव आहे. या पुस्तकात एकंदर सत्तर छोट्या, सोप्या, सुबोध व रंजक गोष्टी आहेत. करमणुकीबरोबर संस्कारही मनावर बिंबवावे असा या बोधकथांचा उद्देश आहे व त्या दृष्टीने या गोष्टी संस्कारक्षम मुलांच्या दृष्टीने वाचनीय आहेत. अनेकदा मोठ्या कथनापासूनही अल्प बोध होतो आणि छोट्या कथांतूनही मोठा बोध होतो असे दृष्टोत्पत्तीस येते. हें पुस्तकही त्याचे प्रत्यंतर देईल असे मला वाटते.

**खादी अँड व्ही. आय. कमिशन** | **त्र्यं. शि. भारदे**
**३ इर्ला रोड, विलेपार्ले ( पश्चिम )**
**मुंबई ५६**

**महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्यालयाचे माननीय संचालक श्री. राजाराम हुमणे लिहितात :**

साहित्य, नाट्य, कविता, कथा, या सर्वच बाबतींत मुलांची फार आबाळ होते. त्यांच्यासाठी खास लिहिलेले साहित्य एकंदरीत कमीच. अशा परिस्थितीत खास मुलांसाठी चुटकेवजा कथा लिहून डॉ. ग. शि. पाटणकर यांनी ही उणीव अंशतः भरून काढली आहे. डॉ. पाटणकरांचे म्हणूनच अभिनंदन करावेसे वाटते. या कथा नुसत्या मनोरंजकच नाहीत तर उद्बोधकही आहेत.

**६ साहित्य सहवास** | **राजाराम हुमणे**
**वांद्रे ( पूर्व ) मुंबई ५१** | **२५-७-१९७४**

**सुप्रसिद्ध लोकप्रिय साहित्यिक माननीय श्री. मंगेश पाडगांवकर** लिहितात :

गोष्टी ऐकणे मुलांना फार आवडते. आजीबाई सांगत आहेत आणि मुले तिच्या भोवती बसून तल्लीन होऊन त्या ऐकत आहेत हे दृश्य 'गोष्ट' हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. आजीबाई हे घरातले एक विद्यापीठच होते. या गोष्टींच्या द्वारे मुलांची करमणूक होत असेच, पण त्याबरोबरच व्यावहारिक शहाणपणा, नीतिमूल्यांची जाणीव मुलांच्या मनावर ठसत असे. 'घरातल्या विद्यापीठाची' ही परंपरा डॉ. ग. शि. पाटणकर या पुस्तकाच्या रूपाने पुढे चालवीत आहेत. याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. गोष्ट सांगताना महत्त्वाची गोष्ट अशी, की ती कुणालाही ऐकावीशी वाटली पाहिजे. यासाठी सांगण्यात नाट्य हवे, व्यक्तिचित्रे डोळ्यासमोर उभी करता यायला हवीत, कथनशैली ओघ हवा. डॉ. पाटणकर हे स्वतः कीर्तने करीत असल्यामुळे श्रोत्यांची मने कथनशैलीने जिंकून घेण्याची कला त्यांच्या अंगी आहे. या अनुभवाचा उपयोग त्यांना या गोष्टी लिहिताना झालेला आहे याचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या गोष्टी लिहीत असताना करमणुकीबरोबरच नीतीचे संस्कार मुलांच्या मनावर व्हावेत असा प्रयत्न डॉ. पाटणकर यांनी सतत केलेला आहे. गोष्टी लिहिल्याप्रमाणेच मुलांसमोर गोष्टी सांगण्याचे कार्यक्रमही डॉ. पाटणकर यांनी करावेत असे सुचवावेसे वाटते. या वाचनीय गोष्टी लिहिल्याबद्दल डॉ. पाटणकर यांचे अभिनंदन करीत असताना एका गोष्टीकडे त्यांचे लक्ष वेधावेसे वाटते. मुलांवर नीतिमूल्यांचे संस्कार करण्याच्या उत्साहाचे अतिउत्साहात रूपांतर होऊ देण्याचे टाळले पाहिजे. नाही तर, मुलांच्या मनात काही गैरसमज दृढमूल होण्याचा धोका असतो. या दृष्टीने पाहता 'इच्छीने जग वशिल्याचे', 'खेड्यातील शाळा' ( एक गंमत ), 'मुलांनो, कायदे मोडू नका' यासारख्या गोष्टीत आवश्यक ती मर्यादा पाळली गेली नाही असे मला वाटते. 'खोटी स्तुती करू नका' अशा आशयाची एक गोष्ट या पुस्तकात आहे तेव्हा हा एक मुद्दा मी खरेपणाने सांगितला हे डॉ. पाटणकर यांना आवडेल असे मी मानतो. या आकर्षक व रसाळ गोष्टींच्या पुस्तकाबद्दल डॉ. पाटणकर यांचे अभिनंदन.

**मंगेश पाडगांवकर**

# १. स्वधर्माभिमान




एका तालुक्याच्या गावी मिशनरी लोकांनी एक धर्मार्थ दवाखाना व हॉस्पिटल काढले होते. दवाखान्यात आलेल्या एका आजारी मनुष्यास तेथील मिशनरी सांगू लागला, "ब्राह्मणांनी तुम्हा लोकांना बुडविले, तुमचा छळ केला. तुम्ही आमच्या धर्मात या. आमचा प्रभू येशू ख्रिस्त फार चांगला होता. आमच्या ख्रिश्चन धर्मात सर्वांना सारखे वागविले जाते." तो मराठा मनुष्य वारकरी असून पंढरीच्या भजनसुखास लालचावलेला विठ्ठलभक्त होता. पंढरीस चोख्यामेळ्याच्या

समाधीपुढे सर्व जातीचे लोक कसे नमतात, मोठे मोठे स्वामी व ब्राह्मणही त्याच्या पुढे भक्तिप्रेमाने कसे लवतात व महायात्रेच्या सुप्रसंगी सर्व विठ्ठलमय झाले असताना उच्चनीच भाव कसे नष्ट होतात हे त्याने पाहिले होते. देवादिकांची पुस्तके तो वाचीत असे, व त्याचे समाधान झालेले होते. त्या मिशनऱ्याचे व्याख्यान संपल्यावर तो मराठा मनुष्य त्यास म्हणाला, "रेवरंडसाहेब, मी आपणास विचारतो की, आपण आपली मुलगी एखाद्यास देऊन तिचे लग्न झाले व ती सुखासमाधानाने नांदू लागली आणि नंतर आपणास दुसरा एक श्रीमंत व सुखवस्तू गृहस्थ आढळला तर आपण तिला पहिल्या गरीब नवऱ्याच्या घरून काढून या दुसऱ्या श्रीमंत घरी घुसवाल का ?" यावर रेवरंडसाहेबांनी उत्तर दिले, "कधीही नाही !" नंतर त्या वारकरी मनुष्याने विचारले, "तर मग देवाने आम्हाला या कुळात जन्माला घातले आहे तर त्या कुळाचा त्याग करून दुसऱ्या कुळात (तुमच्या धर्मात) घुसण्याचा आम्ही प्रयत्न केला तर देवाच्या दृष्टीने आम्ही दोषी ठरणार नाही काय ? जे देवाला आवडले ते आम्हाला आवडले पाहिजे. ज्याने त्याने आपल्या जातीधर्माप्रमाणे वागावे म्हणजे देव सर्वांवर सारखी दया करतो, असे आमचा हिंदू धर्म सांगतो." येथे आपली डाळ शिजत नाही हे पाहून रेवरंडसाहेब दुसऱ्या कामाची सबब सांगून निघून गेले. 'ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें' हेच खरे.

तात्पर्य : मुलांनो, आपल्या धर्माचा व देशाचा अभिमान प्रत्येकाने बाळगलाच पाहिजे. पण हा स्पृश्य व हा अस्पृश्य हा जातीयवाद अजिबात नसावा. राष्ट्रपिता महात्मा गांधींचा आदेश पुढे ठेवावा.

# २. विद्यार्थी म्हणजे विद्यार्थी



विक्रमपूर नगरीला राजा गुणवंत नावाचा राजा राज्य करीत होता. राजा अतिशय गुणी होता. त्याला नाटक कलेचे फार प्रेम होते. तो स्वत: नाटकात उत्तम काम करीत असे. गुणी कलावंतांचे तो कौतुक करी व त्यांना चांगले इनाम देत असे एकदा त्याच्या नगरीत एक बाहेरगावचा सोंगाड्या खेळ करण्यास आला. राजाच्या कानावर ही बातमी गेली व त्या सोंगाड्याला त्याने दोन दिवस दोन खेळ करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी त्याने निरनिराळ्या सोंगांचे खेळ करून शेवटी एका योग्याचा वेष करून तो थेट राजवाड्यात गेला. व त्याने राजाला उपदेश केला. राजाने खूष होऊन त्या सोंगाड्याला

मोठे बक्षीस देण्याचा प्रधानास आदेश दिला. त्यावर योगी म्हणाला, "महाराज, आम्ही योगी ! आम्हाला पैसाअडका घेऊन काय करायचे आहे !" असे म्हणून बक्षीस न घेता तो निघून गेला. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या अनेक सोंगांचा खेळ करून शेवटी त्याने एका नाचापोऱ्याचा वेष करून नाचून दाखवून व निरनिराळ्या नाटकांतील गाणी म्हणून राजाला खूष केले. राजाने पुन्हा प्रधानास बक्षीस देण्याचा आदेश दिला. प्रधानाने त्या सोंगाड्याच्या हातात बक्षीस टाकले. त्यावर तो सोंगाड्या म्हणाला, "महाराज, मी आज दोन दिवस तुमच्या समोर एवढे खेळ करून दाखविले. आपण गुणाचे चाहते आहात असे ऐकून तुमच्या शहरांत आलो. माझ्या गुणांचे हे एवढेच बक्षीस ?" त्यावर राजा चकित होऊन म्हणाला, "अरे, तुला काल मोठे बक्षीस द्यावयास सांगितले होते. ते तू घेतले नाहीस. आणि आज तू आणखी मागतो आहेस ? हे कसे ?" त्यावर सोंगाड्या हसून म्हणाला, "राजेसाहेब, काल मी योगी होतो. आज मी नाचापोऱ्या आहे. जसा वेष तशी राहणी व तशीच मागणी. जसे सोंग तसा वेष आणि जशी सोंगाची वृत्ती तशी बक्षिसाची मागणी." या उत्तराने राजा फारच खूष झाला व त्याने प्रधानास मोठे बक्षीस देण्याचा आदेश दिला.

तात्पर्य : जशी भूमिका असेल तसेच मनुष्याने वागले पाहिजे व भूमिकेशी समरस झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी या भूमिकेशी समरस व्हावे. राजकारणात लक्ष घालू नये. **विद्यार्थी म्हणजे विद्यार्थी.** सर्व कामगारांनी, कर्मचाऱ्यांनी आपल्या भूमिकेशी समरस होऊन सरकारला जर सहकार्य दिले तर देशाचा केवढा फायदा होईल ?

# ३. पूर्वजन्मीचा घेणेकरी

पांडूभटजी नावाचे एक भटजी एका गावात राहात असत. त्यांना भिक्षुकीसाठी दूरदूरच्या गावांत उन्हाळ्यात पावसाळ्यात जावे लागे. वयोमानाप्रमाणे त्यांना दूरच्या गावी जाणे त्रासाचे होऊ लागले. लोक त्यांना म्हणत, "अहो पांडूभटजी, तुम्ही आता म्हातारे झालात, तरी आता एखादे घोडे तरी विकत घ्या." त्यावर भटजी म्हणत, "अरे घोडं काय असं फुकटात येतंय ? चांगले पन्नास साठ रुपये तरी मोजायला हवेत. शिवाय त्याची रोजची दाणावैरण करावीच लागणार!" पण एके दिवशी ते शेजारच्या गावी गेले असता त्या गावचा धोंडू टांगेवाला भटजींना म्हणाला, "भटजीबुवा, मी देतो तुम्हाला घोडं. अगदी फुकट देतो. घेऊन जा." धोंडूने पांडूभटजींना घरी नेऊन घोडें दाखविले. भटजीबुवांनी विचार केला, घोडं मरतुकडं असलं तरी आपलं वजन तरी काय आहे ? मनात म्हणाले, बरं आहे आपल्याला. भटजीबुवा घोडं घेऊन घरी आले. त्याला बांधण्याची वगैरे सोय केली. वाटचालीने घोडं थकल्यामुळे ते मान वरच करीना व गवतपाला वगैरे काही खाईना. भटजींना वाटलं की घोडं थकलं असेल बिचारं! उद्या विश्रांती घेतल्यावर होईल तयार. पण दुसऱ्या दिवशी पाहातात तो घोडं मरून पडलेलं. आपलं नशीबच वाईट असं समजून भटजींनी महाराला बोलावून आणले. त्याने अडवून दहा रुपये मागितले. भटजी कपाळाला हात लावून बसले. जो तो येई व म्हणे, "घोड्याने जलमभर धोंडू टांगेवाल्याचं काम

केलं व मरायच्या वेळी मात्र बामनाला बुडवलं!" भटजी म्हणत, "हे पूर्वजन्मीचं देणं, दुसरं काय? घोडं माझं पूर्वजन्मीचं घेणेकरी होतं." धोंडूला विचारलं तर तो म्हणे, "अहो, घोडं अगदी मरायलाच टेकलं होतं. तेव्हा मेल्यावर खर्च करण्यापेक्षा आधीच बामनाला देऊन टाकलं. नाहीतरी आम्हाला बामनांनी फारच बुडवलं आहे व छळलं आहे."

तात्पर्य: कोणाची जर छळणूक केली तर तो मनुष्य वेळ आल्यावर त्याचं उट्टं फेडून घेतो. धोंडूचं म्हणणं खरं असल्यामुळेच महाराष्ट्रात मिशनरी लोकांचं फावलं. तरी मुलांनो, कोणी कोणाला छळू नये.


## ४. लाचलुचपत अधिकारी

एका लोकशाही राज्यात उसाचे चांगले पीक येत असे. त्यामुळे परदेशी लोक पुष्कळ किंमत देऊन त्या राज्यातून साखर नेत असत. परदेशी गिऱ्हाईक वाढत गेले व साखरेला चांगला भाव येऊ लागला. पण दुर्दैवाने त्या देशाला स्वतःच्या गरजा भागविण्यापुरतासुद्धा पैसा उरेना. म्हणून सरकारने परदेशात जाणाऱ्या साखरेवर कर बसवून तो कर वसूल करण्यासाठी एक क्लास वन् अधिकारी नेमला तो अधिकारी साखर विकणाऱ्या कंपन्यांकडून लाच घेऊन वाटेल ती व वाटेल तेवढी साखर कर न घेता पाठविण्याची परवानगी देऊ लागला. हिशेब वगैरे निराळे ठेवले गेले. लाच घेण्याचे प्रमाण वाढतच

राहिले. करवसुलीकरिता नेमलेल्या यंत्रणेचा खर्च सुद्धा अंगावर येऊ लागला. तेव्हा काही लोकांनी शेतकीखात्याच्या मंत्र्याकडे तक्रार केली व त्या अधिकाऱ्याला त्या जागेवरून काढून टाकून दुसऱ्या चांगल्या अधिकाऱ्याला नेमण्याबद्दल सांगितले. मंत्र्याने तक्रार करणाऱ्या त्या सर्व मंडळींना नमस्कार वगैरे करून त्यांना बसावयास सांगितले व सहानुभूती दाखवीत म्हटले, "तुम्ही म्हणता ते सर्व बरोबर आहे. तरी तुम्ही सर्वांनी मिळून मला दोन हजार रुपये आणून द्या, म्हणजे या तुमच्या अर्जावर मुख्यमंत्र्यांची एका मिनिटात सही आणतो, व त्या लाचखाऊ अधिकाऱ्याला त्या जागेवरून ताबडतोब काढून टाकतो." तक्रार करणाऱ्या विरोधी मंडळींनी कपाळाला हात लावून मंत्र्यांच्या ऑफीसमधून बाहेर पाय काढला.

तात्पर्य : लोकशाही राज्यातील लाचलुचपत गेल्याशिवाय कोणत्याही देशाला चांगले दिवस येणे कठीण. मुलांनो, सावध राहा. लाचलुचपत हे पाप आहे हे लक्षात ठेवा.

# ५. आजकालची मुले



कोकणात काही गावात शेजारच्या गावात जाण्याकरिता तर ओलांडावी लागते. तर ओलांडण्याकरिता होडीचा प्रवास करावा लागतो. अशाच एका तरच्या काठी एक होडी उभी होती. ती तर पार करण्याकरिता काही माणसे बसली. त्या माणसांमध्ये एक केरसुणीवाली व एक गारुडी होता. त्या गारुड्याची दोन माकडे व नाग असलेली एक टोपली होती. होडी निघण्याच्या वेळेस एक तरुण मुलगा तेथे आला व त्याने होडी थांबविण्यास सांगितले. होडीवाल्याने त्याच्याकडून जास्त पैसे घेऊन त्याला होडीवर घेतले. होडी खोल पाण्यात मध्यावर आली. तेव्हा त्या तरुण मुलाने त्या केरसुणीवाल्या

बाईच्या केरसुणीतील एक हीर काढून हळूच त्या माकडाच्या कानात घातला. माकडाने टुणदिशी उडी मारली व ते नाग असलेल्या टोपलीवर जाऊन आदळले. टोपलीचे झाकण उघडले गेले व त्यातील नागाने फणा काढला. त्या नागाला पाहून होडीवर असलेली एक आठ वर्षांची मुलगी घाबरली व पाण्यात पडली. त्या तरुण मुलाने आपल्याला आता लोक मारतील असा विचार करून पाण्यात उडी टाकली व तो पोहत पोहत पहिल्या तीराला आला. घरी जाऊन कपडे बदलून एस्. टी. ने मुंबईस गेला. इकडे त्या होडीवाल्याने स्वतः पाण्यात उडी मारून त्या मुलीचा जीव वाचविला.

तात्पर्य : आजकालची मुले काय करतील याचा नेम नाही. परीक्षेशिवाय वरच्या वर्गात घाला असे म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. मुलांनो, हे वागणं बरं नव्हे !

# ६. मुलांनो, असे करू नका

शिवाजीपार्क दादर येथील एका ब्लॉकमध्ये राहाणाऱ्या एका बड्या श्रीमंत मनुष्याच्या सुहास नावाच्या मुलाला एक दिवस शाळेत जाण्याचा कंटाळा आला. शाळेत जायचे नसले तर शाळेत निरोप पाठवून किंवा फोन करून कळविले पाहिजे, असा शाळेतील हेडमास्तरांचा कडक नियम होता. म्हणून त्या मुलानेच हेडमास्तरांना फोन केला व मोठ्या माणसासारखा आवाज काढून म्हटले, "बरं का, हेडमास्तर-साहेब, आमच्या सुहासला आज बराच ताप आला आहे. तेव्हा तो

काही आज शाळेत येऊ शकणार नाही." हेडमास्तर म्हणाले, "आपण कोण बोलताहांत ?" सुहास म्हणाला, "माझे वडील बोलताहेत !" हेडमास्तर काय ते समजले.

तात्पर्य : शिक्षकांना फसविणे म्हणजे स्वतःला फसविण्यासारखे आहे.

## ७. हल्लीचे जग व शिल्याचे

भारतातून नारायणराव आपटे यांचा मुलगा बाळ आपटे परदेशच्या एका शहरी गेला. तेथून त्याला रेल्वेने दुसऱ्या एका लांबच्या शहरी जावयाचे होते म्हणून तो तेथील रेल्वे स्टेशनवर आगाऊ तिकीट काढण्यासाठी निघाला. पण तेवढ्यात त्याच्या बरोबरीच्या मित्राने सांगितले, "अरे, तुला असं नुसतं जाऊन तिकीट मिळणार नाही. कारण तिथं भली मोठी रांग असेल व त्या रांगेत उभा राहून तू कंटाळशील. तेव्हा अगोदर तू रेल्वे अधिकाऱ्याला भेटून त्याची चिट्ठी ने, म्हणजे त्याच्या वशिल्याने तुला लवकर तिकीट मिळेल. पण थांब, मी तुझ्याबरोबर येतो." नंतर खटपट करून त्या मित्राने चिट्ठी मिळविली. ती चिट्ठी घेऊन आमचे बाळासाहेब आपटे तेथील स्टेशनवर आले. तेथे तिकिटांच्या खिडकी-समोर खरोखरच दोनशे तीनशे लोकांची रांग त्यांना दिसली. पण चिट्ठी मिळाल्याच्या जोरात बाळासाहेब थेट खिडकीकडे गेले. तोच रांगेतल्या एका माणसाने त्यांना हटकले व म्हणाला, "अहो मिस्टर, क्यू सोडून पुढे कुठं चाललांत ?" बाळासाहेब ऐटीत म्हणाले, "मी,

सामान्य नागरिक नाही. मी भारतातील इंदिरा गांधींच्या राज्यातील मनुष्य आहे. माझ्याजवळ रेल्वे अधिकाऱ्याची चिठ्ठी आहे.'' त्यावर त्या गृहस्थाने आपल्याजवळची तसलीच चिठ्ठी दाखविली व तुच्छतेने म्हणाला, ''आपण भारतातील असा नाही तर अमेरिकेतील असा. येथील कायदे निराळे आहेत. आपल्याजवळ चिठ्ठी आहे तर मग आपण ह्या क्यूमध्येच शेवटी उभे राहा. हा सगळा क्यू चिठ्ठीवाल्यांचाच आहे.'' त्यावर आमचे बाळासाहेब म्हणाले, ''तर मग बिनचिठ्ठीवाल्यांचं काय ? त्यांची रांग कुठं आहे ?'' त्या गृहस्थाने सांगितले, ''अहो ते कशाला इथं येतात ? त्यांना मुळी तिकीट मिळतच नाही.''

तात्पर्य : सर्व जग चिठ्ठीवाल्यांचं झालं आहे व ती चिठ्ठीसुद्धा लाच दिल्याशिवाय मिळत नाही. लाच दिली की पेपरसुद्धा आधी कळतात म्हणून मुलांनीच आता पुढाकार घेऊन या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# ८. प्रधानाची हुषारी




गणू माळ्याला शेतातील वांगी तोडता तोडता एक चकाकणारा दगड दिसला. गणूने तो धुवून पुसला व तो त्याला हिरा असल्यासारखे वाटले. तालुक्याच्या गावी जाऊन त्याने तो एका जवाहिऱ्याला दाखविला. तो हिरा असल्याची खात्री झाल्यावर जवाहिऱ्याने गणूला "तो विकावयाचा आहे का ?" असे विचारले. गणूने सांगितले, "विकावयाचा आहे." जवाहिऱ्या म्हणाला, "मला काही घासाघीस करावयाची नाही. मी याचे एक हजार रुपये देईन." सौदा पटला. जवाहिऱ्याने इतके पैसे कसे दिले याबद्दल आश्चर्य करीत गणू गावी

निघाला. थोडेसे अंतर चालून गेल्यावर त्याला दोन बुरखेवाल्या चोरांनी गाठले व त्याच्याजवळचे हजार रुपये लांबविले. गणोबाने पुन्हा शहराकडे धाव घेऊन राजाच्या प्रधानाला ही तक्रार सांगितली. प्रधानाला आश्चर्यच वाटले की जवाहिऱ्याने न मागता हजार रुपये दिले कसे? कारण सोनाराची व जवाहिऱ्याची जात म्हणजे इमानदारी नाहीच. प्रधानाने माळ्याला मदतीचे आश्वासन दिले व एका साध्या पण श्रीमंत मनुष्याचा वेष केला. त्या जवाहिऱ्याला दगा झाल्यास गुप्तपणे पकडण्याची व्यवस्था केली व जवाहिऱ्याची परीक्षा घेण्याकरिता त्याच्या दुकानात श्रीमंत मनुष्याच्या वेषात प्रधान गेला व म्हणाला, "मला एक सोन्याची हिरा जडलेली अंगठी माझ्या नवीन वधूला देण्याकरिता पाहिजे आहे. किंमत जास्त असली तरी चालेल." त्या जवाहिऱ्याने त्या माळ्याकडून घेतलेला तो हिरा दाखविला व सांगितले, "मी तो एक हजार रुपयांस घेतला आहे. आम्ही इमानदारी न सोडता धंदा करतो. आमच्या धंद्याप्रमाणे मी तो दोन हजार रुपयांस विकणार आहे. शंभर टक्के फायदा आम्हाला घ्यावाच लागतो." दोन हजार रुपये देऊन प्रधानाने तो हिरा घेतला व घरी गेल्यावर सोनाराकडून अंगठीत बसवून घेतो असे सांगितले. प्रधानाने तर्क केल्याप्रमाणे शहराच्या वेशीबाहेर जरा लांब गेल्यावर दोन बुरखेवाले चोर आले व ते त्या श्रीमंत माणसाला (प्रधानाला) हात लावायला सुरुवात करणार इतक्यात प्रधानाच्या शिपायांनी त्यांना अटक केली व नंतर प्रधानाने त्यांचे बुरखे वर केले. एक होता हिरा विकणारा तो जवाहिऱ्या व दुसरा त्याचा नोकर. प्रधानाने विचारले,

"का हो महाशय, वराच आहे तुमचा इमानदारीचा धंदा ! आता हा धंदा तुम्हाला तुरुंगाचा रस्ता दाखवीत आहे." प्रधानाने माळ्याचे एक हजार रुपये त्याला देवविले.

तात्पर्य : लवाडी फार काळ टिकत नाही. मुलांनो, प्रामाणिकपणा सोडू नका.

## ९. धूर्त सासरा

वयस्क शामराव एक दिवस वसच्या क्यूमध्ये उभे असताना त्यांच्यामागे उभा असलेल्या एका तरुणाने त्यांना विचारले, "वराच वेळ झाला वस आली नाही, किती वाजले असतील हो ?" शामरावांनी त्यांच्याजवळ घड्याळ होते तरी त्या इसमाला किती वाजले ते सांगितले नाही. कर्मधर्मसंयोगाने वस आल्यावर त्या दोघांना एकाच बाकावर जागा मिळाली. तेव्हा त्या तरुणाचा व शामरावांचा संवाद सुरू झाला

**तरुण** : आपल्याला एक विचारायचं आहे. मघाशी आपण मला वेळ सांगायचं कां नाकारलंत ?

**शामराव** : मी वेळ सांगितली असती की मग आपलं बोलणं सुरू झालं असतं. मग बसमध्ये तुम्ही माझं तिकीट काढलं असतंत. मग खाली उतरल्यावर व्यवहार म्हणून चहा पाजला असता. मग आपलं येणंजाणं सुरू झालं असतं.

तरुण : मग त्यात काय बिघडलं असतं ?

शामराव : तुम्ही माझ्या घरी आला असतात. मग तुमची माझ्या मुलीबरोबर ओळख झाली असती. मग तुमचं प्रेम जमलं असतं. मग तुम्ही माझ्याजवळ तिच्यासाठी मागणी घातली असती.

तरुण : मग ह्यात तरी काय वाईट झालं असतं ? आपला जावई होण्याची माझी लायकी नाही का ?

शामराव : अर्थातच नाही. ज्याच्याजवळ घड्याळ नाही असा मनुष्य जावई म्हणून मला मुळीच पसंत नाही व म्हणूनच मी तुमच्याशी सुरुवातीलाच बोलायचं नाकारलं.

तात्पर्य : माणसाला दूरदृष्टी हवी. पण ती इतकी आचरटपणाची व हसण्यासारखी नसावी.

# १०. मुलांनो, मोहाला बळी पडू नका

एका गुजराथी शेटाणीकडे एक स्वयंपाकी महाराज होता. रोज संध्याकाळी बाजारात जाऊन भाजी आणण्याचे काम त्याच्याकडे असे. बाजारात भाजी न्यावयास मोठ्या लोकांच्या बायका नटून थटून येत असत. त्यांच्या डोक्याला लावलेल्या तेलाचा सुगंध ह्याच्या

नाकात शिरून, ह्यालाही तसलेच तेल लावण्याचा मोह झाला. ह्या महाराजाला तसले उंची तेल कोठून परवडणार ? म्हणून तो शेटाणीच्या खोलीत जाऊन गुपचुप तिचे तेल लावू लागला. काही दिवसांनी शेटाणीच्या हे लक्षात आले. तिने गड्यामार्फत त्याला सांगून पाहिले. पण तो सुधारण्याचे लक्षण दिसेना. शेटाणीने आपली बाटली कपाटात लपवून ठेविली व त्या जागी तसल्याच बाटलीत, तसल्याच रंगाचे, अगदी हलक्या प्रतीचे तेल भरून ठेवले. आमच्या ह्या चैनी महाराजांच्या डोक्यात हे काही शिरले नाही. पण हे नवीन तेल लावायला लागल्यापासून थोड्याच दिवसांत महाराजांचे केस पिकू लागले, इतकेच नव्हे तर गळूही लागले. महाराजांनी कारण ओळखले व नोकरी सोडून जामनगरला घरी गेले.

तात्पर्य : मुलांनो कोणताही मोह वाईटच.

# ११. नारद क्षमा मागतात



हिंदू धर्माची अशी समजूत आहे की मनुष्य जन्माला आला की त्याच्या कपाळावर त्याचे विधिलिखित ब्रह्मदेव सटवीच्या रूपाने येऊन लिहितो. एकदा काय झाले, नारदमुनि भूलोकात हिंडत असता स्मशानात गेले. तेथे त्यांना एका माणसाची कवटी दिसली. त्यांनी ब्रह्मदेवांच्या हस्ताक्षरात त्या कवटीच्या कपाळावर "दारिद्रय व स्वर्गप्राप्ती" अशी अक्षरे लिहिलेली ओळखली. नारदांनी विचार केला की या दरिद्री माणसाने जन्मभर उपास करून अर्धपोटी राहून दिवस काढले असतील. मग याने दानधर्म, देवधर्म कसा काय केला

असेल ? मनुष्याचा प्रपंच चांगला चालला असेल तरच त्याला दानधर्माची, परमार्थाची इच्छा होईल. मग अशा स्थितीत आमच्या पितामहांनी काही तरी तंद्रीत ही चूक केली असावी. ( पूर्वीच्या पिढीला नव्या पिढीने नावे ठेवायची ही शिकवण जुनीच आहे. ) तेव्हा नारदांनी ती कवटी बरोबर घेतली व वडिलांची चूक दाखविण्याकरिता स्वर्गात गेले व ब्रह्मदेवांना गाठून विचारले, "अहो बाबा, मी भूलोकातून आणलेल्या या कवटीच्या कपाळावर 'दारिद्र्य व स्वर्ग-प्राप्ती' असे लिहून ठेवले आहे. त्यातील दुसरा भाग खोटा नाही का ?" ब्रह्मदेव हसून म्हणाले, "अरे बाळा, ती कवटी स्वर्गात तूच आपल्या हाताने आणली आहेस ना ? मग सांग, मी लिहिलेले चूक का बरोबर ?" हा सूर्य व हा जयद्रथ अशी नारदांची स्थिती झाली. नारद म्हणाले, "बाबा, मीच चुकलो. आपली चूक दाखविण्याकरिता आलो हीच माझी फार मोठी चूक झाली. तरी क्षमस्व."

तात्पर्य :—मुलांनी आपल्या आईबापांच्या चुका दाखविण्याचा प्रयत्न करू नये. त्यांचा मान राखावा.

# १२. साठी बुद्धी नाठी

सुंदरराव वकिलांच्या लागोपाठ चार बायका मेल्या. वय साठीच्या घरात गेले, तरी वकील पाचव्या लग्नाला नवरदेव म्हणून उभे राहिले. मुंबईच्या वधूवर मंडळात, मासिकात वगैरे सर्व ठिकाणी नाव-नोंदणी केली. चारदोन भटजींच्या कानावर घालून ठेवले. वधूवर

मंडळातील एक मनुष्य वकीलसाहेबांच्याकडे चौकशीला आला. त्याला वकिलांची प्रकृती साधारणपणे खालावलेलीच दिसली. सुंदररावांनी त्याला चहापाणी दिले. मग त्या गृहस्थाने विचारले, "वकील महाशय, आपण आता साठीचे गृहस्थ, प्रकृती अशी तोळामासा ! आपण लग्नाच्या फंदात कशाला पडता आहा ?" वकील हसून आपल्या वकिली थाटात म्हणाले, "तुम्ही विचारलेला सवाल अगदी बरोबर आहे. आम्ही कोर्टात काम करणारी माणसं ! न्याय निवाडे आमच्या कानावर रोज पडणार. तेव्हा आता तुम्हीच पाहा, मला एकट्याला चार बायकांनी विधूर केलं. हा काय न्याय झाला ? तेव्हा न्याय्य बाजू म्हणजे मी एकीला तरी विधवा केलंच पाहिजे ! मी लग्न केल्याशिवाय ते कसं शक्य आहे ? कळलं मी लग्न करण्याचं कारण ? आता तुमचं काय म्हणणं आहे बोला !" तो मनुष्य या आचरट वकिलाला हसत पटदिशी बाहेर निघून गेला.

तात्पर्य : साठी बुद्धी नाठी म्हणतात तेच खरं.

## १३. येतो हिताचा कळवळा

●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

एकदा एका गृहस्थाची बायको आजारी पडली. म्हणून तो शेजारच्या गावात वैद्याकडे जाण्याकरिता निघाला. जाता जाता त्याला वाटेत द्राक्षाचा मळा दिसला. त्या ठिकाणी एका लोणाऱ्याचे गाढव तो द्राक्षाचा वेल खात होते. वास्तविक हा माणूस बायकोला औषध आणण्याकरिता जात होता. गाढव लोणाऱ्याचे, मळा

तिसऱ्याचा. हा गृहस्थ त्या गाढवाला हाकू लागला. ह्याला गाढव हाकलण्याची उठाठेव करण्याची जरुरी होती का ? पण त्याच्या मनात क़ळवळा आला, की द्राक्षांचा वेल ही वस्तू गाढवाने खाण्याची नव्हे. द्राक्ष ही श्रेष्ठ वस्तू असून ही वेल गाढवाने खाणे म्हणजे ह्या वस्तूचा दुरुपयोग आहे. म्हणून या गृहस्थाने त्या गाढवाला दगड मारून मारून दूर पिटाळून लावले व नंतर तो औषध आणण्याकरिता चालू लागला.

तात्पर्य : या गृहस्थाचा गाढवाला पिटाळून लावण्यात काही लाभ व्हावा किंवा स्वार्थ साधावा असा उद्देश नव्हता. पण हा संतांचा स्वभाव आहे. "बुडतां हे जन न देखवे डोळा" किंवा "येतो हिताचा कळवळा." त्या गृहस्थाप्रमाणे जर हल्ली कोणी वर्तन केले तर त्याला स्वतःला मार खावा लागेल व शिवाय लोक म्हणतील, "याला गाढवाला हा अव्यापारेषु व्यापार करायला सांगितलं कुणी ?" हल्लीच्या मुलांना तर काही सांगायची सोयच राहिली नाही. मोठे केस वाढवा, मुलींसारखे कपडे करा, काय वाटेल ते करा !

## १४. हुशार [illegible]



गोविंदराव देशमुख नावाचे एक श्रीमंत इनामदार होते. त्यांच्या गावी शामभट नावाचे एक भटजी होते. हे भटजी उत्तम कविता करण्यात पटाईत होते. गावातील लोक त्यांना कविता करण्याबद्दल थोडे पैसे देत असत. पण गोविंदराव देशमुख स्वभावाने थापेबाज, चिक्कू व लोभी असल्यामुळे शामभटजींना त्यांच्याकडून फार प्राप्ती नसे. भटजींना प्रत्येक वेळी लग्नकार्यात पैसे देण्याचे अभिवचन देशमुख देत असत. सुदैवाने देशमुखांच्या मोठ्या मुलीचे लग्न ठरले. लग्नाला खूप मंडळी जमली. लग्नामध्ये शामभटजींनी दोन्ही पक्षांच्या गुणांचे व कुळांचे भरपूर वर्णन असलेली मंगलाष्टके तयार करून म्हटली. सगळ्या उपस्थित मंडळींनी भटजींची मुक्तकंठाने स्तुती

तिसऱ्याचा. हा गृहस्थ त्या गाढवाला हाकू लागला. ह्याला गाढव हाकलण्याची उठाठेव करण्याची जरुरी होती का ? पण त्याच्या मनात कळवळा आला, की द्राक्षांचा वेल ही वस्तू गाढवाने खाण्याची नव्हे. द्राक्ष ही श्रेष्ठ वस्तू असून ही वेल गाढवाने खाणे म्हणजे ह्या वस्तूचा दुरुपयोग आहे. म्हणून या गृहस्थाने त्या गाढवाला दगड मारून मारून दूर पिटाळून लावले व नंतर तो औषध आणण्याकरिता चालू लागला.

तात्पर्य : या गृहस्थाचा गाढवाला पिटाळून लावण्यात काही लाभ व्हावा किंवा स्वार्थ साधावा असा उद्देश नव्हता. पण हा संतांचा स्वभाव आहे. "बुडतां हे जन न देखवे डोळा" किंवा "येतो हिताचा कळवळा." त्या गृहस्थाप्रमाणे जर हल्ली कोणी वर्तन केले तर त्याला स्वतःला मार खावा लागेल व शिवाय लोक म्हणतील, "याला गाढवाला हा अव्यापारेषु व्यापार करायला सांगितलं कुणी ?" हल्लीच्या मुलांना तर काही सांगायची सोयच राहिली नाही. मोठे केस वाढवा, मुलींसारखे कपडे करा, काय वाटेल ते करा !

# १४. हुषार, धोरणी शामभट



गोविंदराव देशमुख नावाचे एक श्रीमंत इनामदार होते. त्यांच्या गावी शामभट नावाचे एक भटजी होते. हे भटजी उत्तम कविता करण्यात पटाईत होते. गावातील लोक त्यांना कविता करण्याबद्दल थोडे पैसे देत असत. पण गोविंदराव देशमुख स्वभावाने थापेबाज, चिक्कू व लोभी असल्यामुळे शामभटजींना त्यांच्याकडून फार प्राप्ती नसे. भटजींना प्रत्येक वेळी लग्नकार्यात पैसे देण्याचे अभिवचन देशमुख देत असत. सुदैवाने देशमुखांच्या मोठ्या मुलीचे लग्न ठरले. लग्नाला खूप मंडळी जमली. लग्नामध्ये शामभटजींनी दोन्ही पक्षांच्या गुणांचे व कुळांचे भरपूर वर्णन असलेली मंगलाष्टके तयार करून म्हटली. सगळ्या उपस्थित मंडळींनी भटजींची मुक्तकंठाने स्तुती

केली. या खेपेस शामभटजींना काही तरी चांगले बक्षीस द्यावे लागणार हे गोविंदरावांनी ओळखले. त्यांनी "काय बक्षीस पाहिजे?" असे शामभटांनाच विचारले. शामभटांच्या मनात बरेच दिवसापासून म्हैस पाळण्याची इच्छा होती. पडत्या फळाची आज्ञा घेऊन भटजी म्हणाले, "मला एक दुभती म्हैस द्यावी यजमान. आमच्या बायकोची फार दिवसांची इच्छा आहे." गोविंदराव म्हणाले, "म्हैस का? बरं देतो," असे सांगून त्यांनी एका नोकराला बोलावून त्याच्या कानात काही तरी सांगितले. नोकराने गोठ्यातून एक म्हातारी भाकड म्हैस आणून उभी केली. ती म्हैस पाहून भटजी मनातून निराश झाले. पण सर्वांसमक्ष म्हैस म्हातारी आहे, भाकड आहे, असे कसे सांगावयाचे? म्हणून त्यांनी एक मजेदार युक्ती केली. भटजी म्हशीजवळ गेले. तिच्या कानात काही सांगितल्याचे नाटक करून तिच्या तोंडाशी आपले कान नेऊन मानेने तिने आपणास सांगितलेले भाषण ऐकल्याचा आविर्भाव केला. देशमुखांनी विचारले, "अहो शामभट, हे काय करता आहा?" शामभटांनी गोविंदरावांना व जमलेल्या सर्व मंडळींना नमस्कार करून अदबीने सांगितले, "अहो, मी म्हशीला एक प्रश्न विचारला, व तिने मला त्याचे उत्तर दिले." देशमुख म्हणाले, "तुम्ही तिला काय विचारले व तिने तुम्हाला काय उत्तर दिले ते तरी कळू दे आम्हाला!" भटजी म्हणाले, "मी तिला विचारले, की तुला वासरू केव्हा होणार?" त्यावर ती म्हणाली, "मेल्या, हा प्रश्न विचारायला तुला लाज कशी नाही वाटत? अरे, म्हाताऱ्या भाकड म्हशींना कुठं

# १७. अन्नदान थोर पुण्य



नंदापूर राज्याचा राजा आनंदराज हा फार मुत्सद्दी व दानशूर म्हणून प्रसिद्ध होता. अन्नदानासारखे दुसरे पुण्य नाही असे त्याचे मत होते. एकदा त्याने अन्नसत्राचा कार्यक्रम सुरू केला. सर्व पंचक्रोशीतले लोक जातिभेद विसरून जेवावयास आले होते. स्वयंपाकाची व्यवस्था अनेक ब्राह्मण आचारी करीत होते. अन्नसत्र [illegible]त आले, त्या दिवशी एका आचाऱ्याने एका गाठोड्यात वऱ्याच ना[illegible]णपोळ्या न विचारता घेतल्या व तो मागील दरवाज्याने बाहेर यो[illegible]ऊ लागला. एका पहारेकऱ्याचे लक्ष या ब्राह्मणाकडे गेले व

केली. या खेपेस शामभटजींना काही तरी चांगले बक्षीस द्यावे लागणार हे गोविंदरावांनी ओळखले. त्यांनी "काय बक्षीस पाहिजे ?" असे शामभटांनाच विचारले. शामभटांच्या मनात बरेच दिवसापासून म्हैस पाळण्याची इच्छा होती. पडत्या फळाची आज्ञा घेऊन भटजी म्हणाले, "मला एक दुभती म्हैस द्यावी यजमान. आमच्या बायकोची फार दिवसांची इच्छा आहे." गोविंदराव म्हणाले, "म्हैस का ? बरं देतो," असे सांगून त्यांनी एका नोकराला बोलावून त्याच्या कानात काही तरी सांगितले. नोकराने गोठ्यातून एक म्हातारी भाकड म्हैस आणून उभी केली. ती म्हैस पाहून भटजी मनातून निराश झाले. पण सर्वांसमक्ष म्हैस म्हातारी आहे, भाकड आहे, असे कसे सांगावयाचे ? म्हणून त्यांनी एक मजेदार युक्ती केली. भटजी म्हशीजवळ गेले. तिच्या कानात काही सांगितल्याचे नाटक करून तिच्या तोंडाशी आपले कान नेऊन मानेने तिने आपणास सांगितलेले आपण ऐकल्याचा आविर्भाव केला. देशमुखांनी विचारले, "अहो शामभट, हे काय करता आहा ?" शामभटांनी गोविंदरावांना व जमलेल्या सर्व मंडळींना नमस्कार करून अदबीने सांगितले, "अहो, मी म्हशीला एक प्रश्न विचारला, व तिने मला त्याचे उत्तर दिले." देशमुख म्हणाले, "तुम्ही तिला काय विचारले व तिने तुम्हाला काय उत्तर दिले ते तरी कळू दे आम्हाला !" भटजी म्हणाले, "मी तिला विचारले, की तुला वासरू केव्हा होणार ?" त्यावर ती म्हणाली, "मेल्या, हा प्रश्न विचारायला तुला लाज कशी नाही वाटत ? अरे, म्हाताऱ्या भाकड म्हशींना कुठं

# १७. अन्नदान थोर पुण्य



नंदापूर राज्याचा राजा आनंदराज हा फार मुत्सद्दी व दानशूर म्हणून प्रसिद्ध होता. अन्नदानासारखे दुसरे पुण्य नाही असे त्याचे मत होते. एकदा त्याने अन्नसत्राचा कार्यक्रम सुरू केला. सर्व पंचक्रोशीतले लोक जातिभेद विसरून जेवावयास आले होते. स्वयंपाकाची व्यवस्था अनेक ब्राह्मण आचारी करीत होते. अन्नसत्र

त झाले, त्या दिवशी एका आचाऱ्याने एका गाठोड्यात बऱ्याच णपोळ्या न विचारता घेतल्या व तो मागील दरवाज्याने बाहेर ना ऊ लागला. एका पहारेकऱ्याचे लक्ष या ब्राह्मणाकडे गेले व योग

त्याने त्याला मुद्देमालासकट पकडून राजापुढे उभे केले. तो ब्राह्मण आचारी भीतीने थरथर कापू लागला व खाली मान घालून राजाला म्हणाला, "महाराज, क्षमा करा. मी पोटभर जेवलो. पण घरी मुले उपाशी असतील. त्या मुलांच्या मायेमुळे माझ्या हातून हा अपराध घडला." राजाने त्याच्याकडे पाहिले व म्हणाला, "भटजीबुवा, तुम्ही फार मोठी चूक केली आहे. तुम्ही या पोळ्या घरी नेणार व त्या तुमच्या मुलांना कोरड्या खायला देणार. होय की नाही ? बोला." आचारी चाचपडत "हो" म्हणाला. त्यावर राजा म्हणाला, "मग ती मुले कोरड्या पोळ्या तुपाशिवाय खाल्ल्यावर आजारी पडणार व तो दोष माझ्यावर येणार." सर्व मंडळी राजाकडे पाहातच राहिली. राजा पुढे म्हणाला, "आता तुम्ही परत स्वयंपाकघरात जा, एक तांब्याभर तूप घ्या व घरी जाऊन त्या पोळ्या तुमच्या मुलांना तुपाबरोबर खायला द्या." ब्राह्मणाने कृतज्ञ भावनेने व चकित होऊन राजाला नमस्कार केला.

तात्पर्य : याला म्हणतात दानशूरत्व. अन्नदानासारखे दुसरे पुण्य नाही. मुलांनो, दानधर्म करण्याची वृत्ती ठेवा.

## १८. निंदा की स्तुती

एकदा नारदमुनि रावणाकडे गेले. इकडच्या तिकडच्या गप्प झाल्यावर रावणाने नारदांची गंमत करण्याच्या इराद्याने " संकृ "मुनिमहाराज, मी एक आपली शंका विचारू का ?" पुरा

**नारद :** विचार की. खुशाल विचार. उत्तर देता आलं जाठं

**रावण :** मुनीश्वरा, मला हे सांगा की मी इंद्रदेवाला माझ्या बंदिखान्यात ठेवलं आहे. तर मी श्रेष्ठ का इंद्र श्रेष्ठ ?

**नारद :** हे राजा, हे विचारण्याची जरुरीच काय ? इंद्रापेक्षा केव्हाही आपणच श्रेष्ठ.

**रावण :** आपण माझ्या तोंडदेखलं बोलता आहात असं मी समजू का ? तसं नसेल तर कसा ते सांगा.

**नारद :** राजेश्वरा, ऐक. ब्रह्मदेवाने सर्व सृष्टी निर्माण केली, हे आपण जाणताच. त्या ब्रह्मदेवाने इंद्राचा व तुमचा असे दोन पुतळे तयार केले. नंतर तुम्हा दोघात मोठा कोण हे ठरविण्याकरिता त्याने एक मोठा तराजू घेतला व एकेका पारड्यात एकेकाला ठेवलं. ( रावण मनातून खूष होत होता. त्याला नारदांचा मिष्कील स्वभाव ओळखता आला नाही. )

**रावण :** नारदा, बरं. पुढे काय ?

**नारद :** राजेश्वरा, अरे पुढे काय ? पाहातो तो तुमच्या पुतळ्याचं वजन अधिक भरलं आणि तुमचं पारडं खाली म्हणजे पृथ्वीवर राहिलं; म्हणून तुम्हाला लंकेचं म्हणजे पृथ्वीचं राज्य दिलं, आणि इंद्राचं पारडं वर गेल्यानं त्याला वरचं म्हणजे स्वर्गाचं राज्य दिलं. आता यावरून पाहा. आपण श्रेष्ठ म्हणून मी सांगितलं, यात काही चूक आहे का ?

नारदांच्या या बोलण्याने रावण खूष झाला. कारण त्याला नारदांच्या बोलण्यातला गर्भित अर्थ कळला नाही व त्याने नारदांची योग्य संभावना करून निरोप दिला.

तात्पर्य : आपल्याबरोबर बोलणारा मनुष्य आपली स्तुती करतो आहे का निंदा करतो आहे हे पाहूनच त्याच्याशी सलगी करावी व व्यवहार करावा.

## १९. मुलांनो, कायदे मोडू नका

मुंबई म्हणजे सर्व कलांचे आगर आहे. त्याचप्रमाणे काळाबाजार, लाचलुचपत, खिसे कापाकापी शिक्षण, कायद्याचा बडगा बाजूला ठेवून सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने धंदा जोरात चालू ठेवण्याचे शिक्षणही मुंबईस मिळते, अशी अकोल्याच्या गणपत सोनाराची कल्पना होती. सुवर्णनियंत्रण कायद्याचा अम्मल सुरू झाला. त्यामुळे सर्व सोनारांच्या धंद्यावर गदा आली. गणपत सोनार अकोल्याहून मुंबईमधील सोनारांची परिस्थिती पाहाण्याकरिता व त्यातून काही मार्ग काढण्याकरिता एका मुंबईच्या सोनाराकडे आला व त्यांचा संवाद सुरू झाला.

**गणपत सोनार** : काय करावं रामभाऊ ? हा सुवर्ण कायदा म्हणजे सर्व सोनार वर्गावर मोठा अत्याचार आहे. अहो, एकट्या अकोला शहरात वीस ते बावीस हजार लोकांनी सोनं गहाण ठेवून पैसे कर्जाऊ घेतले आहेत. याचा अर्थ इतक्या लोकांची पैशाची गरज भागू शकली. या नवीन नियंत्रणामुळे लोक अगदी हवालदील झाले आहेत. आपल्याकडील परिस्थिती पाहाण्याकरिता व मुंबईच्या युक्तिबाज व कायदेबाज लोकांकडून सल्ला घेण्याकरिता मी आलो आहे.

**मुंबईचा सोनार :** अहो गणपतदादा, आपलं सरकार म्हणजे उत्तम सरकार. आपणच निवडून दिलेलं सरकार. सरकार नवीन होतकरू लोकांना धंदा काढून देतं व हा कायदा म्हणजे तेवढ्या-करिताच आहे पाहा. या कायद्यामुळे मुंबईत सुवर्णकारांनी आपल्या-जवळचा सोन्याचा स्टॉक जाहीर केलेला (म्हणजे सरकारात कळविलेला) आहे. त्याची तपासणी आठपंधरा दिवसांनी पोलीस अधिकाऱ्यांनी करायची असते. परंतु दारूप्रमाणे याही बाबतीत पोलिसांना काही सापडत नाही, कारण ते आम्हाला चक्क सांगतात, "आम्हांला पाचपन्नास रुपयांचा हप्ता बांधून द्या म्हणजे तुम्हालाही कटकट नको व आम्हालाही त्रास नको." सुवर्ण कायद्यामुळे काळ्याबाजाराचा एक नवीन विभाग खोलला गेला आहे. काय? आहे की नाही गम्मत?" मुंबईच्या सोनाराचे हे बोलणे ऐकल्यावर गणपत सोनार काय समजायचे ते समजला व त्याने तावडतोब अकोला गाठला. (ही सत्यकथा आहे. यातील पोलिस खात्याबद्दल काढलेले उद्गार लेखकाचे नसून मुंबईच्या एका सोनाराचे आहेत. लेखक हा एक सरकारी क्लास टू सेवानिवृत्त अधिकारी असून त्याला पोलिस खात्याबद्दल नेहमी आदर होता, आहे व पुढेही राहील.)

तात्पर्य : मुलांनो, प्रामाणिकपणाने जेवढा पैसा मिळेल तेवढाच मिळवा. कायदे मोडून काळाबाजार करू नका.

# २०. कोणाचाही द्वेष करूं नये




एका गावाबाहेरील देवळात एक सिद्धपुरुष तपश्चर्या करण्याकरिता बसला होता. गावातील लोक त्याच्यापुढे जे ठेवीत त्यावर त्याचा उदरनिर्वाह चाले. तो थोडे खाई व बाकीचे पदार्थ वाटून टाकीत असे. एका लाकूडतोड्याने त्या साधूच्या पुढे पाच नारळ आणून ठेवले व त्याने एक नारळ फोडून त्या साधूला नारळाचे पाणी पिण्याची व खोबरे खाण्याची विनंती केली. मग तो त्या साधूपुढे हात जोडून उभा राहिला. साधूने त्याची भक्ती व श्रद्धा पाहून नारळाचे

पाणी पिऊन थोडेसे खोबरे खाल्ले. लाकूडतोड्या जाऊ लागला. तेव्हा साधूने त्याला परत बोलाविले व सांगितले, "हे नारळ घरी ने व ते फोडताना तुझ्या मनात जी इच्छा असेल ती पुरी होईल." बाबू नावाचा हा लाकूडतोड्या घरी आला व त्याने एक नारळ फोडावयास घेतला. माझी प्रतिज्ञा कधी भंग होऊ नये व माझ्या बायकोला मुलांना पोटभर खायला मिळावे अशी इच्छा करून त्याने नारळ फोडला. त्या दिवसापासून बाबूची मिळकत वाढत गेली. त्याने घर बांधले व तो दानधर्मही करू लागला. बाबूला आता लोक बाबाजीबुवा म्हणू लागले. तो श्रीमंत झाला. पण त्याच्या ह्या श्रीमंतीचे सुख एका शेजारी माणसाला खुपू लागले. तो त्याचा द्वेष करू लागला व त्याच्या श्रीमंतीचे रहस्य कळण्याची त्याला उत्सुकता लागली. तो शेजारी एक दिवस बाबूच्या घरी गेला व त्याने हळूच युक्तीने श्रीमंती कशी आली ते बाबूला विचारले. भोळ्या बाबूने नारळाची गोष्ट सांगून टाकली व त्याच्याजवळ असलेले आणखी नारळही दाखविले. दुसऱ्या दिवशी त्या शेजाऱ्याने घरातला एक नारळ लपवून घेतला व पुन्हा तो त्या बाबूकडे गेला. इकडच्या तिकडच्या थोड्या गप्पा झाल्यावर त्या लुच्च्या शेजाऱ्याने लपवून आणलेला नारळ दोन नारळ असलेल्या टोपलीत ठेवला व त्यातील साधूने दिलेला नारळ घेऊन घरी आला. घरी येऊन नारळ फोडणार इतक्यात त्याची बायको जवळ आली व म्हणाली, "अहो, नारळातले पाणी मला द्या." या मनुष्याची अशी सवय होती की बायकोने काही मागितले की तो तिला भिकारी म्हणत असे. बायकोने पाणी मागितले म्हणून याही वेळेस तोच शब्द मनातल्या मनात

म्हणत त्याने नारळ फोडला. चूक त्याच्या तावडतोब लक्षात आली. पण मागाहून काही उपयोग झाला नाही. त्याची संपत्ती हळू हळू कमी झाली. शेवटी तो पुन्हा बाबूकडे गेला व त्याने नारळ चोरल्याची कबुली देऊन त्याची माफी मागितली. बाबूने आपले मन मोठे करून त्याला क्षमा केली व तिसरा नारळ त्याला दिला. नंतर त्याची स्थिती सुधारली, व त्याने बाबूला धन्यवाद दिले.

तात्पर्य : दुसऱ्याचा कधीही द्वेष करू नये.

## २१. हिटलरची क्यू पद्धत

जर्मनीत क्यूची पद्धत प्रथम हिटलरने सुरू केली. सुरुवातीला जर्मन लोकांना ही पद्धत फार त्रासदायक वाटत होती व ह्या पद्धतीची त्यांना फार चीड येत असे. त्यावेळची ही गोष्ट आहे.

एक माणूस घासलेट आणायला निघाला. दुकान लांब असल्यामुळे तो बस गाठण्यासाठी बसस्टँडवर गेला. तेथे फार मोठा क्यू होता. त्याने विचार केला, येथे वेळ मोडण्यापेक्षा चालत जाऊनच घासलेट लवकर आणता येईल. म्हणून तो चालत घासलेटच्या दुकानात गेला. तो तेथेही केवढा मोठा क्यू! नाइलाजाने तो क्यूमध्ये उभा राहिला. मनात मात्र हिटलरवर खूप संतापला व त्याने हिटलरला गोळी घालून ठार मारावयाचे ठरविले. बऱ्याच वेळाने घासलेट मिळाले. ते घेऊन तो घरी आला. लगेच तो पिस्तुलाच्या दुकानात गेला. तेथेही क्यू होताच. खूप वेळ तिष्ठंतो केल्यावर पिस्तूल मिळाले ते

घेऊन हिटलरला मारण्यासाठी त्याने त्याच्या राजवाड्याकडे धूम ठोकली. पण तेथेही हिटलरला मारण्यासाठी हातात पिस्तुले घेतलेल्या लोकांचा लांबच लांब क्यू !

तात्पर्य : चांगल्या गोष्टीला विरोध करणारेच फार असतात.

## २२. शाळेचा बक्षीस समारंभ

७११५
१६२११२ ९२

एका तालुक्याच्या गावातील शाळेच्या बक्षीस समारंभाला तेथील लोकांनी एका मंत्रीमहाशयांना मुख्य पाहुणे म्हणून बोलाविले व त्यांच्याच संमतीने त्यांच्या ओळखीचे एक श्रीमंत उद्योगपती चिमणलाल दोशी यांना अध्यक्षपद स्वीकारण्यास विनंती करुन त्यांच्याकडून संमती मिळविली. बक्षीस समारंभाची तयारी जोरात सुरु झाली. ठरल्याप्रमाणे समारंभाच्या दिवशी मंत्रीमहाशय व चिमणलाल-शेट सकाळी दहा वाजता त्या गावी गेले. लोकांनी त्यांचे स्वागत करून चहापाण्याचा कार्यक्रम झाला. गावकऱ्यांनी सर्व गाव मंत्र्यांना दाखविले. दुपारी भोजनाचा कार्यक्रम उत्तम तऱ्हेने झाला व पाहुण्यांच्या विश्रांतीची खास व्यवस्था झाली. चार वाजता समारंभ सुरू झाला. मुलींनी स्वागतगीत म्हटले. मुलामुलींनी बसविलेले संवादाचे कार्यक्रम झाले. त्यानंतर शाळेच्या हेडमास्तरांनी अहवालवाचन केले व शाळेला नवीन इमारतीची अत्यंत जरुरी आहे हे सांगून मंत्रीमहाशय व माननीय पाहुणे यांनी काही तरी अनुदान व देणगी द्यावी असे सूचित केले. मंत्रीमहाशयांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली व त्यांचे भाषण सुरू

झाले. मंत्र्यांनी गावातील लोकांची, शाळेच्या हेडमास्तरांची, इतर मास्तरांची व बाल-बालिकांची स्तुती करून सरकारकडून दहा हजार रुपये इमारत निधीला देण्याचे आश्वासन दिले. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यानंतर कसे तरी सावरत सावरत अध्यक्षांनी दोन मिनिटे भाषण केले व इमारत निधीला वीस हजार रुपयांची देणगी जाहीर केली. हेडमास्तरांनी अध्यक्षांचे व मंत्रीमहाशयांचे आभार मानून कार्यक्रम समाप्त झाल्याचे जाहीर केले. या कार्यक्रमाला बरेच दिवस होऊन गेले तरी मंत्रीमहाशयांकडून व चिमणलालशेटकडून पैसे आले नाहीत. म्हणून शाळेचे हेडमास्तर मंत्रीमहाशयांना भेटावयास गेले. कर्मधर्मसंयोगाने चिमणलालशेट दोशी हेही त्याच वेळी मंत्र्यांच्या शेजारी बसले होते. हेडमास्तरांनी मंत्र्यांकडे अनुदानाचा चेक मागितला. त्यावर दोशीशेट मोठ्याने हसून म्हणाले, "अहो मास्तरसाहेब, तुम्ही मुलांना शिकवता तेच बरे! अहो, मंत्र्यांनी समारंभाच्या वेळी दिलेली आश्वासने पाळण्याकरिता नसतात ! समजलं ?" त्यावर लगेच मंत्रीमहाशय म्हणाले, "अहो मास्तरसाहेब, त्याचप्रमाणे उद्योगपतींनी दारूच्या नशेत दिलेले आकडे खरे नसतात, समजलं ? पळा पाहू आता." हेडमास्तर निराश होऊन गावी आले व ही बातमी सांगून गावकऱ्यांना आश्चर्याचा धक्का दिला व धडा दिला.

तात्पर्य : मुलांनो, दिलेला शब्द कधीही मोडू नका.

# २३. समाधान हेच खरे सुख



गोपाळराव देशमुखांच्या मुलाचे लग्न व्यवस्थित रीतीने पार पडले. त्या आनंदात रामभटजी आपल्या गावास परत जाण्यास निघाले. गोपाळरावांच्या पत्नीने त्यांच्याबरोबर लाडू, जिलब्या वगैरे फराळाचे पदार्थ दिले होते. जाता जाता काळोख पडू लागला तरी पण वाट माहीत असल्यामुळे रामभट चालतच राहिले. थोड्या वेळाने ते एका वडाच्या झाडाखाली फराळ करण्याकरिता व विश्रांती घेण्याकरिता

थांबले. फराळाचा डबा सोडला. इतक्यात त्यांच्यासमोर एक आकृती येऊन उभी राहिली व फराळाचे पदार्थ खावयास मागू लागली. रामभटांनी तिच्यापुढे काही पदार्थ ठेवले. त्या आकृतीने ते पदार्थ खाऊन आणखी पदार्थ मागितले. रामभट म्हणाले, "आणखी पाहिजे असतील, तर उद्या आणून देईन व हे पदार्थ तयार करण्याकरिता मला बरेच पैसे लागतील. कारण डालडा मिळत नाही, तेल महाग, साखर महाग. सर्वच गोष्टी महाग झाल्या आहेत." हे रामभटाचे शब्द ऐकताच ती आकृती म्हणजे भूत म्हणा पाहिजे तर—झाडाच्या ढोलीत शिरले व लगेच दोन मिनिटांत बाहेर येऊन रामभटाच्या हातावर सोन्याची भरपूर नाणी ठेवली आणि रामभटास रोज फराळाचे जिन्नस आणावयास सांगितले. दररोज सोनेही मिळेल असेही सांगितले. घरी गेल्यावर रामभटांनी बायकोच्या हातावर सोन्याची नाणी ठेवली व घडलेली सर्व हकीगत सांगितली. रामभटांची पत्नी खूष झाली व तिने लगेच बाजारातून सामान आणून फराळाचे पदार्थ तयार केले व त्या भुताकडून सोने आणण्याचा धंदा चालू झाला. चार दिवस झाल्यावर रामभट आपल्या बायकोला म्हणाले, "या धंद्यात फायदा पुष्कळ असला तरी दररोज त्या भुताजवळ जाऊन बोलायला आपल्याला भीती वाटते, व धीर होत नाही." रामभटाच्या बायकोने थोडा विचार केला व ती म्हणाली, "आपण दिवसा त्या भुताच्या ठिकाणी जाऊ व ढोलीतून सर्व सोने घेऊन येऊ. भुते दिवसा बाहेर येत नाहीत, असे म्हणतात." रामभटाला खरे म्हणजे सर्व पुरुषांप्रमाणे बायकोचीच जास्त भीती वाटत होती. म्हणून त्याने तिच्या म्हणण्याला

संमती दिली. दुपारी रामभट कुऱ्हाड घेऊन गेले. रामभटांनी झाड पाडले. ढोली तपासली पण त्यात लाकडाच्या कोळशांशिवाय काही सापडले नाही. काही मिळाले नाही असे सांगितल्यास बायकोचा विश्वास बसणार नाही या भीतीने रामभटांनी कोळशाचा भुगा एका गाठोड्यात बांधून घेतला व ते घरी आले. तो चुरा त्यांनी बायकोला दाखविला व एका कोपऱ्यात टाकला. जमिनीवर पडल्यावर त्यातून एकदम जाळ झाला व क्षणभरात सर्व घर जळून गेले. नशीब म्हणून दोघे नवराबायको वाचले.

तात्पर्य : रामभट व त्याची बायको यांनी जास्त सोने एकदम मिळण्याचा लोभ धरला म्हणून त्यांच्यावर हा प्रसंग ओढवला. थोडक्यात समाधान मानावे म्हणजेच सुख प्राप्त होते व तेच खरे सुख. मुलांनो, समाधानी वृत्ती ठेवा.

## २४. नद्यांचा देवाकडे मोर्चा

भारतामध्ये सध्या संप, बंद, मोर्चे यांची जशी काही अहमहमिकाच चालू आहे. ही लाट भारतातल्या नद्यांपर्यंत पोहोचली, तेव्हा महाराष्ट्रातील नद्यांनी एकत्र होऊन व काही भाडोत्री मोर्चेवाल्या बाया घेऊन देवाकडे मोर्चा नेला. (–हे एक मजेदार रूपक आहे–) व सांगितले, 'हे देवाधिदेवा, आम्ही आमचं सर्व पाणी समुद्राला देत असूनही समुद्र आमच्याशी नीट वागत नाही. आमच्यामुळे त्याला मोठेपणा मिळतो. त्याची त्याला जाणीव नाही. त्यामुळे आमचं जिणं

निरुपयोगी होत आहे. तेव्हा हे देवा, समुद्राला आम्हा नद्यांना समान हक्क व सर्व स्वातंत्र्य देण्यास सांगावे ही आमची मागणी आहे." देवाने त्यांच्या समक्षच समुद्राला बोलावून ह्यावर त्याचे काय म्हणणे आहे ते विचारले. समुद्र म्हणाला, "माझ्या ठिकाणी पाणी कमी आहे, म्हणून काही मी नद्यांना माझ्या ठिकाणी स्थान दिले नाही. त्यांना दुसरीकडे कुठे स्थान नाही म्हणून त्या माझ्या आश्रयाला राहात आहेत. तेव्हा त्यांनी माझ्याशी सहकार्याने व मी देईन तेवढ्या स्वातंत्र्यातच समाधानाने राहावे हेच त्यांच्या हिताचे आहे." समुद्राचे ते उत्तर ऐकून नद्या शरमल्या व मुकाट्याने समुद्रात मिळून राहू लागल्या.

तात्पर्य : या रूपकापासून भगिनींनी काय तो बोध घ्यावा. सुज्ञांस अधिक लिहिणे न लगे.

मुलांनो, संप, बंद, मोर्चा यांपासून तुम्ही दूर राहा.

## २५. कलावंतालाच कलेचे कौतुक

सुप्रसिद्ध संगीत–दिग्दर्शक व हार्मोनियम–वादक गोविंदराव टेंबे ह्यांच्या घरासमोर एक भिकारी गाणे गाऊ लागला. गोविंदराव हे गाण्याचे तज्ज्ञ. त्या भिकाऱ्याचे गाणे व त्यातील फिरत मोठी मजेदार व कौतुकास्पद वाटली. त्यांनी त्या भिकाऱ्याला घरात बोलाविले. चहा दिला, फराळाचे खावयास दिले व ते गाणे त्या भिकाऱ्याकडून पुन्हा पुन्हा म्हणून घेतले. श्रोता दर्दी असला म्हणजे गवयालाही एक प्रकारचे स्फुरण व कैफ चढतो. त्या भिकाऱ्यालाही तसेच झाले. त्याने

मोठ्या रंगात येऊन ते गाणे म्हटले. गोविंदरावांनी त्या गाण्यातल्या फिरती व हरकती जाणून घेतल्या व पेटीवर वाजवून पाहिल्या. नंतर त्यांनी त्या भिकाऱ्याला पोटभर जेवायला घातले, चांगले कपडे दिले व पाच रुपये हातावर ठेवले. तो भिकारी गोविंदरावांना दुवा देत गेला. एवढे मोठे पेटी—वादक गोविंदराव ! पण त्यांना त्या भिकाऱ्याकडून फिरत शिकण्यात कसलाच कमीपणा वाटला नाही.

तात्पर्य:—चांगले कोणापासूनही शिकावे.

## २६. खेड्यातील शाळा ( एक गंमत )

एका गावातील शाळेत इन्स्पेक्टर शाळा तपासणीकरिता गेले. शाळेच्या हेडमास्तरांबरोबर ते एका वर्गात गेले. तेथे भूगोलाचा तास चालू होता. त्याच वर्गाच्या वर हेडमास्तरांची खोली होती. इन्स्पेक्टरांनी एक मुलाला विचारले, " पूर्व कोणती ? " त्या मुलाने वर बोट दाखविले. इन्स्पेक्टरना वाटले, दुपारची वेळ आहे, सूर्य माथ्यावर आला आहे. 'तेव्हा जिकडे सूर्य तिकडे पूर्व' अशा समजुतीने मुलाने वर बोट दाखविले असेल. नंतर निरनिराळ्या मुलांना विचारले की, " पश्चिम कोणती ? " " दक्षिण कोणती ? " " उत्तर कोणती ? " पण प्रत्येक मुलगा आपला बोट वर दाखवी. इन्स्पेक्टरसाहेबांना मोठे आश्चर्य वाटत होते. पण ते काही न बोलता आपल्याशीच हसत शेजारच्या वर्गात गेले. तेथेही त्यांनी एका मुलाला विचारले, " पूर्व कोणती ? " त्याने लगेच पाटीवर "पूर्व" असे मोठ्या

अक्षरात लिहिले व इन्स्पेक्टरसाहेबांना दाखवीत म्हटले, " ही पहा पूर्व." त्याचप्रमाणे उत्तर, दक्षिण, पश्चिम वगैरे दिशा मुलांनी पाटीवर लिहून दाखविल्या. साहेब अधिकच बुचकळ्यात पडले. त्यांनी मुलांना विचारले, " तुम्हाला हे कुणी शिकवलं ?" मुले अभिमानाने म्हणाली, "आमच्या मास्तरांनी !" साहेबांनी पुन्हा विचारले, "मास्तरांनी तुम्हाला काय शिकवलं रे ?" मुले म्हणाली, "मास्तर म्हनत्यात, 'त्या दिश्या वर हेडमास्तरांच्या खोलीत भिंतीवर लिवलेल्या हैती. त्यानला दिश्या म्हनत्यात. त्या बगुन पाट करून ठ्येवा.' आता त्या बगुनशानी पाट केल्या नि तुमास्नी सांगितल्या." इन्स्पेक्टर-साहेबांनी ओळखले की " दिश्या " म्हणजे हेडमास्तरांच्या खोलीत ज्या पाट्या भिंतीवर लावलेल्या आहेत त्या ! ह्या संबंधाने काही विचारण्यासाठी साहेब हेडमास्तरांकडे वळतात, तोंच त्यांनी साहेबांना " पार्टी " साठी आपल्या खोलीत नेले.

तात्पर्य : कोणत्याही शाळेत शिक्षक म्हणून नेमणूक करण्यापूर्वी त्या व्यक्तीच्या लायकीचा नीट कस लावून पाहाणे आवश्यक असते. गोष्ट फार जुनी म्हणजे ब्रिटिश राजवटीतील आहे. स्वराज्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी जातीने लक्ष घालून शिक्षण क्षेत्रांत आमूलाग्र फरक घडवून आणला आहे. त्यामुळे आता खेड्यातील शाळा व शहरातील शाळा असा बिलकूल फरक नाही. खेड्यातील लोकांचा गैरसमज होऊ नये म्हणून खुलासा.

# २७. श्रेष्ठ गुण धैर्य




आटपाट नगरात एक राजा राज्य करीत होता. राजा शिकारीला गेला असताना एक शेतकरी पुढे आला व त्याने एक चमकदार गुळगुळीत हिऱ्यासारखा गोटा राजापुढे केला. तो राजाला म्हणाला, "राजेसाहेब, हा गोटा आपण विकत घ्यावा. हा जादूचा गोटा आपल्या राज्याचे सदैव रक्षण करील. याची किंमत दोन लाख रुपये आहे." राजा घरी आला व त्याने प्रधानाचा, राणीचा वगैरे कोणाचाही सल्ला न घेता त्या शेतकऱ्याला बोलावून दोन लाखाच्या ऐवजी एक लाखाला तो गोटा विकत घेतला. दुसऱ्या दिवशी राजाला एक स्वप्न पडले. एक रूपवान सुंदर स्त्री अलंकार घालून राजवाड्याबाहेर जाताना दिसली. राजा म्हणाला, "कोण ग तू ? व कोठे चाललीस ?" ती स्त्री

म्हणाली, "माझे नाव धनलक्ष्मी. काल तू त्या शेतकऱ्याकडून एक लाख रुपये देऊन एक यःकश्चित् गोटा विकत घेतलास ? हा माझा भयंकर अपमान आहे. मी क्षणभरदेखील येथे थांवणार नाही." राजा म्हणाला, "खुशाल जा." थोड्या वेळाने पुन्हा एक लठ्ठ बाई बाहेर जाताना दिसली. राजाने विचारले, "कोण ग तू ? " ती बाई म्हणाली, "मी वललक्ष्मी. राज्यातून धनलक्ष्मी गेली. तेव्हा यापुढे तू माझं रक्षण करू शकणार नाहीस. म्हणून मी आता क्षणभरदेखील थांवणार नाही." राजाने विशेष काळजी न दाखविता तिला जाण्याची परवानगी दिली. दोन प्रहर उलटल्यावर एक म्हातारी बाई राजवाड्यातून बाहेर आली व म्हणाली, "बाबा रे, धनलक्ष्मीला, वललक्ष्मीला राज्यावाहेर जाऊ दिलंस; माझ्यासारख्या ज्ञानलक्ष्मीला येथे राहून काय उपयोग ? मी पण जाते." राजा म्हणाला, "जरूर जरूर जा." थोड्या वेळाने हातात तलवार घेतलेली एक तरुण स्त्री राजाला दिसली. राजाने तिला तिचे नाव विचारले. ती स्त्री म्हणाली, "हे राजा, माझे नाव धैर्यलक्ष्मी असे आहे. तुला धनलक्ष्मी, बललक्ष्मी, ज्ञानलक्ष्मी सोडून गेल्या. तेव्हा मी तरी कशाला राहू ? मी पण जाते." राजा एकदम पुढे झाला. त्याने त्या स्त्रीचा हात धरला व तो तिला म्हणाला, "त्या तिघी गेल्या असल्या तरी मी तुला जाऊ देणार नाही. तू असलीस म्हणजे धन, वल, ज्ञान सर्व काही मिळेल." धैर्यलक्ष्मीने त्याच्यावरोवर सर्वकाळ राहाण्याचे आश्वासन दिले आणि राजा एकदम जागा झाला. त्याच्या तोंडावर एक प्रकारचे तेज व समाधान दिसत होते.

तात्पर्य : सर्वस्व गेले तरी माणसाने धैर्य व हिम्मत सोडू नये. धैर्यवान माणसेच मोठी झालेली दिसतात. मुलांनो, धैर्यवान होण्यास शिका.

# २८. बालस्वभाव ओळखण्यास शिका

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

एका बाईचे यजमान बाहेरगावी गेले होते. ठरल्याप्रमाणे चार दिवसांनी परत यायचे, ते आठ दिवस झाले तरी परत आले नाहीत. बायकोला मोठी काळजी वाटू लागली. लहान मुले देवासारखी असतात या भावनेने तिने आपल्या लहान मुलाला विचारावयाचे ठरविले. त्याच्या तोंडून येईल ते खरे मानावयाचे ठरवून तिने मुलाला देवासारखे पाटावर बसविले व विचारले, "बाळ, हे कधी येतील रे ?" (पूर्वीच्या काळी बायका नवऱ्यांची नावे घेत नसत. त्या काळातील गोष्ट आहे.) मुलाला 'हे' कोण ते समजेना. आईने निरनिराळ्या तऱ्हेने सांगितल्यावर त्याला समजले एकदाचे. तरीसुद्धा तो मुलगा मुख्य प्रश्नाचे उत्तर न देता इकडचे तिकडचे बोलत व प्रश्न विचारीत राहिला. आईने त्याला खाऊ, खेळ, कपडे वगैरे देण्याचे आमिष दाखवून तोच तोच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारला. शेवटी तो बाळ एकदाचा बोलला, "आई ग, बाबा गेले आहेत ना ? ते कध्धी कध्धी यायचे नाहीत." बाईने कपाळाला हात लावला. कुठून ही विषाची परीक्षा पाहिली असे तिला झाले. पण तिचे नशीब थोर. हा संवाद संपता संपताच यजमान बाहेरून आले. आनंदीआनंद झाला.

तात्पर्य : मुलांना भलतेसलते प्रश्न विचारू नयेत. अनपेक्षित व मनाला चटका लावणारी उत्तरे मिळण्याचा संभव जास्त.

# २९. फार चिक्कूपणाही चांगला नाही

*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*❁*

वाई शहरात बळवंतराव कानडे नावाचे एक श्रीमंत सावकार राहात असत. पैसा पुष्कळ होता पण हा सावकार कर्मदरिद्री होता. खर्च करणे म्हणजे त्याच्या जिवावर येई. अतिशय चिक्कू होता. कोणी घरातील माणसाने पैसे खर्च केले की याला धसका बसायचा व याला हृदयरोगाचा झटका येतो की काय अशी शंका यावयाची. याने जन्मात कधी वैद्याला किंवा औषधाला पैसा खर्च केला नाही. एकदा हे बळवंतराव आजारी पडले. मरणासन्न घरघर लागली. तोंडातून शब्द निघेना. मुले–मुली–सुना, नातवंडे सर्व जमली. एका मुलाने वैद्यांकडे जाऊन हेमगर्भाची मात्रा आणली व ती चाटवली. गृहस्थ शुद्धीवर आले. तों तोंडात औषधाची चव लागली म्हणून डोळे वटारून त्यांनी विचारले, "अरे विनायका, मला काही औषध का दिलंस ?"

**विनायक** : होय, हेमगर्भाची मात्रा दिली.

**बळवंतराव** : कुठून आणलीस ?

**विनायक** : आपल्या रामशास्त्री वैद्यांकडून.

**बळवंतराव** : किती रुपये घेतले त्यांनी ?

**विनायक** : पंचवीस रुपये.

**बळवंतराव :** ( छाती वडवीत ) अरे विन्या, मूर्खपणाचा कळस केलास. आता दहावा, अकरावा, बारावा या सगळ्यांचा खर्च आधीच करून बसलास. ह्यापुढे माझ्या कुठल्याही क्रियेला एक पैसा सुद्धा खर्च करू नकोस.

असे सांगून झाले आणि त्यांनी प्राण सोडला.

तात्पर्य : मुलांनो, पैसे फार खर्च करू नयेत पण फाजील चिक्कूपणाही करू नये. अति सर्वत्र वर्जयेत् ।

# ३०. सारी पुरुषजात थापेबाज




शूरसेन नावाचा राजा युवराज असताना नेहमी शिकारीस जात असे. एकदा तो शिकारीला गेला असताना त्याला एका सरोवराच्या

काठी एक रानटी जातीची सुंदर तरुण स्त्री स्नान करताना दिसली. शूरसेनाच्या मनात तिच्याशी लग्न करण्याची इच्छा उत्पन्न झाली व त्याने त्या बाईला आपली इच्छा कळविली व लग्न केल्यास तिला पट्टराणी करण्याचे आश्वासन दिले. ती स्त्री म्हणाली, "माझ्या पोटी येणाऱ्या मुलाला जर आपल्या पश्चात् गादी मिळणार असेल तर मी तुमच्याशी लग्नाला तयार आहे." युवराजाने त्या गोष्टीस होकार दिला. विवाह झाल्यावर तो तिच्याच महालात राहू लागला. नंतर पुन्हा एकदा त्याच सरोवरावर तो शिकारीला गेला असताना तेथे त्याला पहिल्या तरुण युवतीपेक्षा जास्त सुंदर स्त्री दिसली. पहिल्या स्त्रीप्रमाणे ह्याही स्त्रीला वरीलप्रमाणे वचन देऊन त्याने तिच्याशी लग्न केले व तिच्याबरोबर राहू लागला. पुढे काही दिवसांनी तो त्याच सरोवरावर आला. पहिल्या दोघींपेक्षा जास्त सुंदर स्त्री स्नान करताना दिसली. ह्याही युवतीला युवराजाने वरील दोघी स्त्रियांप्रमाणे वचन देऊन तिच्याशी लग्न करून तिच्याबरोबर राहू लागला.

त्यानंतर पुन्हा जेव्हा त्या ठिकाणी युवराज आला त्या वेळेस त्याला निराळेच दृश्य दिसले. त्या सरोवराच्या काठी एक सुंदर स्त्री एका ज्योतिषाला आपला हात दाखवून आपले भविष्य विचारीत असल्यासारखे दिसले. राजा दगडाच्या आड लपून राहिला. तो ज्योतिषी निघून गेल्यावर राजा पुढे झाला व त्या बाईला म्हणाला, "कोण ग तू ? इथे अशी एकटी खिन्न अवस्थेत का बसली आहेस ?" त्या स्त्रीने त्याला विचारले, "महाराज, आधी आपण कोण ते मला सांगावे, म्हणजे मग मी कोण व माझ्या दुःखाचे कारण काय ते मला सांगता येईल." राजा म्हणाला, "हे स्त्रिये, अग, या देशाचा मी युवराज आहे. तुझे

कोणतेही दुःख मला सांग. मी त्याचा नाश करीन." हे युवराजाचे शब्द ऐकून ती युवती एखाद्या नागिणीसारखी चवताळून म्हणाली, "नीचा, तुझा सर्व इतिहास या ज्योतिषाने मला आताच सांगितला आहे. माझ्या तिघी बहिणींना त्यांना होणाऱ्या मुलांना गादी देण्याचं वचन देऊन फसवून थापा मारून त्यांच्याशी लग्न केलंस. मलाही त्याच जाळ्यात ओढण्याचा तुझा डाव मी चालू देणार नाही." असे म्हणून त्या युवतीने सरोवरात उडी टाकून जीव दिला.

तात्पर्य :–थापा मारणे हा पुरुषांचा स्वभाव आहे. तरी भगिनींनी पुरुषांवर फार विश्वास दाखवून फसू नये. विश्वास असल्यासारखे भासवावे. पुरुषांची संपूर्ण थापेबाजी ओळखणारी स्त्री अजून जन्मास यावयाची आहे. मुलांनो, थापेबाजी करू नका.

## ३१. अवघड कोडे सोपे उत्तर

साबरमती आश्रमात एक दिवस महात्मा गांधी आपली प्रार्थना वगैरे उरकून आपल्या मित्राबरोबर गप्पा मारीत बसले होते. त्याच वेळेस एका माणसाने महात्माजींना प्रश्न विचारला, "ज्या क्षणी आपण जन्मला त्याच क्षणी इतर बरेच लोक जन्माला आले असणारच. आपण महात्मे झालात. काही लोक श्रीमंत झाले असणार व काही मध्यम व काही भिकारी झाले असणार. हे असं का झालं ? या कोड्याचं उत्तर मला पाहिजे आहे." महात्माजींनी सगळ्यांना विचारून पाहिले, पण कोणालाही काही सांगता आले नाही. त्यानंतर महात्माजींनी एका नोकरास वही बांधण्याकरिता कोरे कागद, दोरा व

दाभण आणण्यास सांगितले. कागद वगैरे आणल्यावर ते कागद वही करण्याकरिता फाडून नीट जुळवले व शेजारच्या एका माणसास त्या कागदांना भोके पाडण्यास सांगितले. त्या माणसाने दाभणाने सर्व कागदांना एकदम भोक पाडले. महात्माजींनी त्या माणसाच्या हातातून ते कागद आपल्या हातात घेतले व सांगितले, "पाहा, दाभणाने सर्व कागदांना एकाच वेळी भोकं पाडण्यात आली. पण ह्या वरच्या कागदांना मोठी छिद्रं पडली असून त्यांखालील कागदांना त्याहून बारीक छिद्रं पडली आहेत. त्यापुढच्या कागदांना तर छिद्र पडलं आहे की नाही ते सुद्धा कळत नाही. त्याचप्रमाणे एकाच वेळी जन्म झालेल्या मनुष्यप्राण्यांचंही आहे. ज्या वेळी आपला जन्म झाला त्याच वेळी इतर अनेक लोकांचा जन्म झाला असेल. पण या कागदांवरील छिद्रांप्रमाणे काही मोठे झाले, काही मध्यम झाले, आणि काही आहेत का नाही ते कळतसुद्धा नाही. या सर्व गोष्टी पूर्वजन्मातील सुकृतावर अवलंबून असतात. म्हणून माणसाने आपले आचार, विचार आणि उच्चार उत्तम ठेवावे."

तात्पर्य : मुलांनो, आचार, विचार व उच्चार उत्तम ठेवण्यास पहिल्यापासून शिका.

## ३२. शहरातील भामटे

काशी क्षेत्रात गुरुदत्त नावाचा एक सावकार राहात असे. ठरल्या-वेळी जर व्याजासह रक्कम परत करता आली नाही तर गहाण ठेवलेला

दागिना परत न देण्याची अट तो कर्ज घेणाऱ्या माणसास घालीत असे. गावातील गोपाळभटाने आपल्या मुलीच्या लग्नाकरिता या सावकाराकडून तीन हजार रुपयांचे कर्ज काढले व त्याच्याकडे चपलाहार गहाण ठेवला. पण कर्ज फेडायच्या अगोदरच गोपाळभट दिवंगत झाले. त्यांचा मुलगा रामभट याने चपलाहार जप्त होऊ नये म्हणून सावकाराचे तीन हजार रुपये परत केले. पण व्याजाचे दोनशे रुपये देण्याचे शिल्लक राहिले. मुदतीत व्याज देण्याचा त्याने खूप प्रयत्न केला. पण ते व्याज देण्यास त्याला दोन दिवस उशीर झाला. बापाने कबूल केल्याप्रमाणे सावकाराने चपलाहार जप्त केला. गोपाळ-भटाच्या मुलाला फार वाईट वाटले. त्याने ही गोष्ट शेजाऱ्या-पाजाऱ्यांना सांगितली. सगळ्यांना वाईट वाटले. पण कायद्याप्रमाणे कोणी काही करू शकत नव्हते. रामभटाने मनात एक युक्ती योजिली व त्या सावकाराच्या घरी आपल्या नात्यातील एका विश्वासू मुलास मोठ्या युक्तीने नोकरीस ठेवले. त्याने त्याच्या कानात काही तरी गुप्त गोष्ट सांगितली. स्वतः सावकाराकडे मधूनमधून जाण्याचा प्रघात ठेवला. त्यानंतर एक दिवस गुरुदत्त सावकार बाहेरगावी निघाला. त्या वेळेस त्याची बायको त्याला म्हणाली, "अहो, चपलाहार सगळा तुटला आहे त्यामुळे तो घालता येत नाही." सावकार म्हणाला, "मी शेवकशेट सोनाराला जाताजाता पाठवून देतो." असे सांगून सावकार निघून गेला. गावाला जाण्याच्या नादात सोनाराला सांगायचे विसरून गेला. हा नवरा-बायकोचा संवाद रामभटाने सावकाराकडे ठेवलेल्या मुलाने रामभटास ताबडतोब युक्तीने कळविला. रामभटाने त्याच्या एका खास मित्राला त्याच्या कानात काही गुपित सांगून

गुरुदत्त सावकाराकडे पाठविला. तो मित्र सावकाराकडे गेला. बायकोने दार उघडले. त्या मित्राने बायकोला नमस्कार केला व म्हणाला, "ताई, गुरुदत्त सावकारांनी चपलाहार दुरुस्त करून आणून द्यायला सांगितलं आहे." बायको म्हणाली, "बरं झालं बाबा आलास. मी किती दिवस दुरुस्त करीन करीन म्हणते आहे. कोणत्याही गोष्टीला वेळ यावी लागते." (मित्र मनातल्या मनात हसत होता.) असे म्हणून तिने कपाटातून चपलाहार काढून त्या मित्राच्या हाती दिला. तो मित्र म्हणाला, "अहो ताई, दुरुस्ती तर अगदी थोडी आहे. एका तासाभरात परत आणून देतो. वनिता मंडळात वगैरे कुठं जाऊ नका." या विनोदावर ताई खूष झाल्या. ताईनी त्या मित्राला चहा देऊन चपलाहार लवकर आणण्यास सांगितले. अशा तऱ्हेने तो चपलाहार रामभटाच्या हाती आला. संध्याकाळी सावकार घरी आला. बायकोने सोनाराकडे चपलाहार दुरुस्तीला दिल्याचे सांगितले. तेव्हा सावकार म्हणाला, "अग, कुठला सोनार ? मी कधी पाठवला ? खरोखर तुम्हा बायकांना अक्कलच कमी ! कुणी तरी भामट्याने तुला फसवलं." असे म्हणून त्याने कपाळाला हात लावला. (गोपाळभट ब्राह्मणाला फसविल्याचे फळ.)

तात्पर्य : वरील प्रकार शहरातून नेहमी झालेले दिसत त. तरी भगिनींनी व्यवहार करताना जपून करावा. पुरुष सुद्धा पुष्कळ वेळा फसतात. पण बायका बहुतेक वेळी फसतात. (भगिनींनो, क्षमस्व.)

मुलांनो, फसवणूक कोणाचीही करू नका.

# ३३. हजरजवाबी धूर्त स्त्रिया




मद्रदेशाच्या राजाने शेजारच्या राज्यावर स्वारी करून तेथून वरीच लूट आणली व त्याचबरोबर काही स्त्रीपुरुष कैदी करून आणले. त्या कैद्यांपैकी तीन स्त्रिया फार सुंदर असून बहिणी बहिणी होत्या. राजाने त्या तीन स्त्रियांना राजवाड्यातील एका महालातच ठेवून त्यांच्या भोवती स्त्रीहेरांचे जाळे पसरून ठेवले. एके दिवशी त्या तिघी बहिणींनी आपापल्या कल्पनेप्रमाणे राजाची निंदा करण्यास सुरुवात केली.

**पहिली स्त्री :** हा राजा नुसतं जळतं लाकूड आहे.

**दुसरी स्त्री :** नाही ग बाई ! हा राजा काट्यांची मोळी आहे.

**तिसरी स्त्री :** इश्श ! काहीतरीच तुमचं म्हणणं ! राजा नुसता दगड आहे.

राजाला हेराकडून हे सर्व कळले व राजा संतापला. त्या बायकांना त्याने भर दरबारात आणून राजाविषयी काय बोलत होत्या, ते सांगण्यास आज्ञा केली. "खरं सांगा, नाही तर प्राणास मुकाल" असे राजाने फर्माविले.

**पहिली स्त्री :** मी आपणास जळतं लाकूड म्हणाले. जळत्या लाकडावरच स्वैपाक होतो व थंड झाल्यावर आपण जेवतो. याचा अर्थ आपल्याबरोबर बोलताना घाई न करता शांतपणाने बोलावं कारण आपण शांत स्वभावाचे आहात.

**दुसरी स्त्री :** मला हे कबूल नव्हतं. मी आपल्याला काट्यांची मोळी म्हटलं. याचा अर्थ आपण वरून फणसाच्या काट्यासारखे आहात. परंतु काटेरी कवचाआड फणस जसा गोड असतो त्याप्रमाणे आपले हृदय गोड आहे.

**तिसरी स्त्री :** महाराज, मला हे देखील पटलं नाही. फणस थोडा वेळ चांगला राहातो. पण नंतर तो कुजतो. म्हणून मी तुम्हाला दगड म्हटलं. याचा अर्थ तुम्ही दिसायला जरी दगड असलात तरी ज्याप्रमाणे खडीसाखर

दिसायला दगड दिसली तरी चवीला गोड असते, त्याप्रमाणे आपण गोड आहा.

त्या तिघी मुलींचे प्रसंगावधान, हजरजबाबीपणा व चातुर्य पाहून राजाच्या मनात त्या मुलीविषयी पितृवात्सल्य उत्पन्न झाले व त्याने राज्यातील तीन सरदारांच्या तीन चांगल्या मुलांबरोबर त्या तीन बहिणींची लग्ने लावून दिली.

तात्पर्य : मुलांनो, हजरजबाबीपणा व प्रसंगावधान हे गुण अंगी आणण्याचा अभ्यास करा. अभ्यासाने सर्व साध्य होते. संकटाला तोंड देण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो.

# ३४. अंगरक्षकाची चाचणी परीक्षा

एका राजाला एका अंगरक्षकाची नेमणूक करावयाची होती. जाहिरात देऊन अर्ज मागविले व अर्जांची छाननी करून ज्यांच्या अर्जात साहस व पराक्रमाचे वर्णन केले होते असे तीन अर्ज निवडले. त्या तरुणांना चाचणी परीक्षेचे निमंत्रण पाठवून बोलावून घेतले. राजाने प्रधानास चाचणी परीक्षा सुरू करण्यास सांगितले. पहिल्या तरुणास आत बोलाविले व त्याची परीक्षा सुरू झाली.

**प्रधान :** समज, नजर चुकवून राजाला शत्रू एकाएकी उचलून घेऊन जात आहेत, तर तू काय करशील ?

**पहिला तरुण :** शत्रूकडे निषेध खलिता पाठविण्याची व्यवस्था करीन व इतर राजे लोकांची सहानुभूती मिळविण्याकरिता निरनिराळ्या देशात शिष्टमंडळे पाठविण्यास सांगेन.

प्रधानाने त्यास बाहेर जाण्यास सांगितले व दुसऱ्या तरुणास आत पाठविण्यास सांगितले. दुसऱ्याची परीक्षा सुरू झाली. प्रधानाने त्याला तोच प्रश्न विचारला.

**दुसरा तरुण :** प्रधानाकडून शत्रूशी युद्धाची घोषणा करवून शत्रूचा पराभव करून राजाला सोडवून आणीन.

प्रधानाने त्याला बाहेर जावयास सांगितले व तिसऱ्या तरुणास धाडून देण्यास सांगितले. त्याची परीक्षा सुरू झाली. प्रधानाने त्यालाही तोच प्रश्न विचारला.

**तिसरा तरुण :** प्रधानजी व मान्यवर राजेसाहेब, मी जिवंत असेपर्यंत म्हणजे मला ठार मारल्याशिवाय शत्रू राजाला धरून नेऊच शकणार नाही.

हे उत्तर ऐकून राजा व प्रधान खूप झाले व त्यांनी या तिसऱ्या तरुणाची निवड केली हे सांगणे नकोच.

तात्पर्य : मुलांनो, जे काम आपल्यावर सोपविले आहे त्याच्याशी तन्मय होऊन ते केले पाहिजे. प्राणावर उदार होण्यापर्यंत मनाची तयारी ठेवली पाहिजे.

# ३५. बालादपि सुभाषितं ग्राह्यम्

एकदा एका गावात साथीच्या रोगाची साथ आली व गावातील माणसे पटापट मरू लागली. रामभट नावाचा एक लोभी भटजी त्या गावात राहात असे. गावात दुसरा भटजी नसल्यामुळे या भटजीला मात्र हे दिवस सुगीचे ठरले. कारण प्रत्येकाचे अग्निसंस्कार, कार्य त्याच्याकडे आले. भटजींनी आपल्या सुपीक डोक्यातून एक युक्ती काढली. त्याने सर्व लोकांना सांगितले, की साथीच्या रोगाने मरणाराला गोदानाशिवाय मुक्ती मिळत नाही. लोकांनी भाकड गाई विकत घेऊन गोदान सुरू केले. अशा तऱ्हेने रामभटांच्या घरी भाकड गाईंचा पांजरपोळ तयार झाला. भटजींचे शहाणपण भटजींच्याच अंगाशी यावयास लागले. गाईंचा खर्च व त्यांची देखभाल करण्याची कामगिरी रामभटांच्या अंगावर पडली. गाई उपाशी मेल्या तर गोहत्येचे पाप डोळ्यापुढे दिसू लागले. भिक्षुकीच्या कामात व्यत्यय आल्यामुळे त्या धंद्यातील प्राप्ती कमी होऊ लागली. रामभट म्हणाले, "देवा, काय रे मला असा वाईट सल्ला देण्याची बुद्धी दिलीस ?" रामभटांची पत्नी सीताबाई आतून म्हणाली, "आता तरी जरा बायकोचं ऐका !" रामभट म्हणाले, "बरं बाई, सांग एकदा; तू सांगशील ते करायला मी तयार आहे. झाली एवढी षष्ठी पुरे झाली." बायको म्हणाली, "हे पाहा, या पांजरपोळातील सर्व गाई जातील त्या भावाने खाटकांना विकून टाका. जे पैसे येतील त्या पैशांनी पाचसहा म्हशी विकत घ्या. गोदान करणारांकडून गाईंचे

पैसे घ्या व त्या पैशाच्यासुद्धा म्हशी विकत घ्या. अशा तऱ्हेनें एकीकडे भिक्षुकी व जोडधंदा म्हणून दुधाचा धंदा सुरू करता येईल. दुधाला भाव हल्ली चांगला आहे. मुंबईत म्हणे साडेतीन रुपये लीटर भाव झाला आहे." वायकोने दिलेला सल्ला म्हणजे रामभटांना संध्येतील गायत्रीमंत्रच वाटला. सीताबाईंच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी गाई विकल्या व भिक्षुकीच्या विस्कळीत झालेल्या धंद्याला नीट उभा केला व जोडधंदा म्हणून **राम डेअरी फार्म** असा बोर्ड दारावर लावला.

तात्पर्य : पुरुषांनी बायकांचा सल्ला घेण्याची टाळाटाळ करू नये. बऱ्याच वेळा फायदा होतो व तोटा झाल्यास दोष त्यांच्यावर ढकलता येतो. चांगली गोष्ट लहान मुलांनी जरी सांगितली तरी ग्राह्य धरावी. **बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ।**

# ३६. हुषार राजकन्या

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★




चंद्रपूरच्या राजाला रूपमती नावाची एक अप्रतिम सुंदर एकुलती एक मुलगी असून तिच्या हस्तस्पर्शाने असाध्य रोग सुद्धा बरे होत असत. राजकन्या उपवर झाली व वरसंशोधन सुरु करण्याचे ठरले. राजकन्येने राजाला चार योग्य वर निवडून आणण्यास सांगितले व त्यांतून ती एका वराची निवड करणार असल्याचे सांगितले राजाने जवळपासच्या राजपुत्रांची चौकशी करून त्यांतून चार राजकुमारांना राजवाड्यात आणले व त्यांची निरनिराळ्या महालात राहाण्याची सोय केली. चार दिवसांनी स्वयंवर करण्याचे ठरले. या चार दिवसांत

राजकुमारांची परीक्षा कशी घ्यावयाची हे राजकन्येने राजाबरोबर खलबत करून ठरविले. राजकन्येने ठरविलेली परीक्षेची युक्ती ऐकून राजा आपल्या कन्येवर फार खूष झाला. सखू नावाच्या एका सुंदर दासीला राजपुत्रांच्या तैनातीला दिली. रूपसुंदर नावाच्या पहिल्या राजकुमाराने सखू त्याच्या महालात आली असताना तिला बोलावून विचारले, "काय ग सखू, मला राजकन्या पाहावयास मिळेल का ?" सखूने भ्याल्यासारखे करून ती म्हणाली, "माझ्या पाठीमागून चाहूल न लागता या." ती त्याला अंतःपुरात घेऊन गेली व तेथे पूजा करीत असलेली एक काळी अम्मा राजकन्या म्हणून दाखविली. रूपसुंदरने कपाळाला हात लावला व या काळ्या अम्माबरोबर लग्न करण्याचा विचार सोडून देऊन तो स्वदेशी गेला. दुसऱ्या दिवशी सखू लक्ष्मीकांत नावाच्या दुसऱ्या राजपुत्राच्या महालात झाडाझाड करण्यास गेली. तेव्हा त्याने रूपसुंदर राजपुत्र काही न सांगता का गेला असे विचारले. सखूने हळूच सांगितले, की रूपसुंदरने राजकन्येचे काळे रूप, लठ्ठ शरीर, पुढे आलेले दात पाहिले व येथून पलायन केले. लक्ष्मीकांत म्हणाला, "अग सखू, राजकन्येच्या रूपाकडे कशाला पाहायचं ? तिच्याबरोबर येणाऱ्या राजवैभवाकडे पाहायचं." (हा राजपुत्र राजकन्या एकुलती एक आहे म्हणून राज्यलोभाने तिच्याशी लग्न करण्याकरिता आला होता.) त्यावर सखू म्हणाली, "आपण जर राज्यलोभाने आला असाल तर आमच्या राजेसाहेबांनी आपल्या भावाच्या मुलाला दत्तक घेतला आहे." हे ऐकल्यावर त्यानेही पळ काढला. तिसऱ्या दिवशी सखू वनराज नावाच्या राजपुत्राच्या महालात आली व तिने त्याला दोन्ही

राजपुत्रांची गोष्ट सांगितली. तो म्हणाला, "अग सखू, मला तुझ्या राजकन्येचं रूप नको, वैभव नको. मी फक्त तिच्या करस्पर्शाने रोग बरे होतात असं ऐकलं आहे म्हणून मला ती हवी आहे." सखू हसून म्हणाली, "अहो, हे सर्व खोटं आहे." असे ऐकल्यावर तोही निघून गेला. त्या दिवशी सखू गुणवंत नावाच्या चवथ्या राजपुत्राच्या महालात गेली. त्या वेळेस तो कण्हत होता. सखूने विचारले, "काय झालं तुम्हाला?" राजपुत्र म्हणाला, "माझ्या छातीत दुखतं आहे! मी आता मरणार!" सखूने वैद्याला बोलावून आणले व त्याच्या छातीवर हात फिरवून त्याला बरे केले. रात्रभर सखू त्याच्याजवळ बसून होती. सकाळी उठल्यावर राजपुत्र सखूला म्हणाला, "सखू, रागावू नकोस, मला तुझ्यासारखी प्रेमळ पत्नी पाहिजे आहे. तू जर माझ्याबरोबर आलीस तर मी तुला माझी पट्टराणी करीन." त्यावर सखू म्हणाली, "मी देखील प्रेमळ पती पाहात होते. माझे नाव सखू नसून मीच राजकन्या रूपमती आहे. मीच तुमच्या चौघांची परीक्षा घेत होते. कारण एकाला रूप, एकाला संपत्ती व एकाला माझी मंत्रशक्ती पाहिजे होती. तुम्हाला पाहिजे होतं प्रेम. मी तुमच्याशी लग्न करायला तयार आहे!" पितापुत्रीने आखलेले नाटक योग्य प्रकारे पार पडले. राजाने चांगला मुहूर्त पाहून दोघांचे लग्न लावून दिले.

तात्पर्य : मुलांनो, ओळखा या गोष्टीचे तात्पर्य.

# ३७. देव तारी त्यास कोण मारी

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

विशालपूरचा राजा विक्रमसिंह हा फार दयाळू व दानशूर म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्याकडून काही मदत घ्यावी म्हणून दोन वाटसरू निघाले. या दोन्ही वाटसरूंवर निरनिराळ्या आपत्ती आल्या होत्या. त्यांना वाटेत एक तिसरा वाटसरू भेटला. पण त्याची कोणाकडून दान घेण्याची इच्छा नव्हती. परमेश्वर ठेवील त्या स्थितीत राहाण्याची त्याची तयारी होती. प्रवास करताकरता ते सर्वजण एका धर्मशाळेत उतरले. त्यांनी फराळ वगैरे केला व गप्पा मारीत ते विश्रांती घेत होते. कर्मधर्मसंयोग असा, की त्याच वेळेस राजा विक्रमसिंह वेष पालटून बाहेर पडला होता. त्याने या तिघांचे बोलणे ऐकले. दुसऱ्या दिवशी सेवकाकडून त्यांना राजदरबारी आणविले व राजाने प्रत्येकाला एकच प्रश्न विचारला "तुला काय पाहिजे ?"

**पहिला :** महाराज, मी खूप श्रीमंत होतो. पण माझ्यावर आपत्ती ओढवली व मी भिकारी झालो. तरी आपण मला व्यापार करण्याकरिता दोन हजार रुपये द्या.

**दुसरा :** माझी बायको फार सुंदर व गुणी स्त्री होती. ती मेल्यापासून मला अगदी वेडच लागल्यासारखं झालं आहे. तरी मला तशी सुंदर स्त्री देऊन माझं लग्न करून द्यावं.

**तिसरा :** महाराज, माणसाच्या इच्छा पुऱ्या करण्याचं सामर्थ्य फक्त त्या परमेश्वराजवळच आहे. मी कोणापुढे हात पसरू इच्छीत नाही. माझ्या नशिबात असेल ते मला मिळेल.

तिसऱ्या मनुष्याचे ते शब्द ऐकल्याबरोबर राजा मनातून रागावला. राजाने पहिल्या प्रवाशास दोन हजार रुपये देण्यास सांगितले.

प्रधानाने थैली भरून आणून ले. दुसऱ्या प्रवाशास एक सुंदर स्त्री आणून वैदिक पद्धतीने त्याचे लग्न लावून दिले. दुसरे दिवशी तिघा प्रवाशांना जाण्यास परवानगी दिली. प्रवासी निघाले. थोडा वेळ झाल्यावर राजाने एका शिपायाला बोलाविले व सांगितले की या प्रवाशांना घोड्यावरून जाऊन गाठ. एका प्रवाशाजवळ थैली आहे. एकाबरोबर एक तरुण स्त्री आहे. या दोघांना सोडून जो तिसरा प्रवासी आहे, त्याचे मुंडके घेऊन ये. इकडे थैली घेतलेला इसम दमल्यामुळे त्याने ती थैली तिसऱ्या प्रवाशाजवळ दिली होती. घोड्यावरून शिपाई त्याच वेळी तेथे आला. एका प्रवाशाला रिकाम्या हाताने पाहिले. त्याला ठार मारून त्याचे मुंडकं घेऊन शिपायाने राजापुढे आणून ठेविले. ते मुंडके पाहून राजा चकित झाला व शिपायाला म्हणाला, "अरे, तू चुकलास. पुन्हा जा व ज्या प्रवाशाबरोबर सुंदर तरुण स्त्री आहे तो सोड व दुसऱ्याचं मुंडकं कापून आण." इकडे सुंदर स्त्री बरोबर असलेला प्रवासी लघुशंका करण्यास थांबला व ती तरुणी त्या तिसऱ्या प्रवाशाबरोबर चार पावले पुढे गेली. शिपाई तेथे आला तेव्हा दुसरा प्रवासी हळूहळू एकटाच चालत होता. त्यालाच शिपायाने ठार मारले व त्याचे मुंडके राजापुढे आणून ठेविले. राजाचे दोन्ही प्रयत्न फसले. त्या तिसऱ्या प्रवाशाला मात्र देवाने दोन हजार रुपये व एक सुंदर स्त्री दिली. त्याने तिच्याशी लग्न केले. राजाने तिसऱ्या प्रवाशाला काही दिले नव्हते व त्याला मारण्याचा दोनदा प्रयत्न केला. त्याला देवाचे साहाय्य होते.

तात्पर्य : **देव तारी त्याला कोण मारी** ? मुलांनो, देवावर विश्वास ठेवा व प्रयत्नांची जोड सोडू नका.

# ३८. खऱ्या गुणाची पारख



दक्षिण भारतातील एका राज्यात अनेक कवी, गवई व शाहीर राहात असत. याचे कारण त्या देशाचा राजा गुणांची कदर करणारा, कलावंतांना बक्षिसे देऊन त्यांना प्रोत्साहन देणारा असा होता. असे जरी होते तरी तो राजा अतिशय क्रूर व अन्यायी असा होता. एके दिवशी त्या राजाने कोणाला तरी एक कविता म्हणताना ऐकले. त्या कवितेत त्या राजाचा क्रूरपणा, अन्याय व त्याच्या अत्याचारांचे वर्णन मोठ्या कुशलतेने केले होते. कविता ऐकल्यावर राजाच्या अंगाचा नुसता भडका उडाला आणि त्याने राज्यातील सर्व कवींना

अटक करण्याचा हुकूम सोडला. कैद करून आणलेल्या सर्व कवींना राजाने विचारले, "बोला, तुमच्यापैकी माझ्या क्रूरपणाचं व अन्यायी वृत्तीचं वर्णन करणारी कविता कोणी लिहिली आहे का ?" कोणी उत्तर दिले नाही. राजाने मग त्या कवींना आपापल्या कविता म्हणून दाखविण्यास सांगितले. सर्व कवींनी राजाच्या दयाशील वृत्तीचे व त्याच्या दानधर्मादि गुणांचे रसभरित वर्णन केलेल्या कविता म्हणून दाखविल्या. राजाने त्या सर्वांना कैदमुक्त करण्याचा हुकूम दिला. फक्त एका कवीने कविता म्हणण्याचे नाकारले होते. त्या कवीला भीती दाखविण्याच्या हेतूने राजाने एक चिता रचण्यास सांगितले व ती चिता त्यास दाखवून राजा म्हणाला, " तू जर कविता म्हटली नाहीस तर तुला जिवंत जाळण्यात येईल." तरी देखील त्याने कविता म्हटली नाही. शेवटी त्याला हातपाय बांधून चितेवर ठेवण्यात आले व मग राजाने पुन्हा विचारले, " आता तरी कविता म्हणशील की नाही ?" तेव्हा त्या कवीने सांगितले, " मला चितेवरून खाली घ्या म्हणजे मग मी कविता म्हणतो." राजाने तसे करण्याचा हुकूम दिला. मग त्या कवीने राजाच्या क्रूरपणाचे व अन्यायाचे वर्णन करून लिहिलेली कविता म्हटली. राजाने ऐकलेली व जी कविता ऐकून राजाचा संताप झाला होता तीच ती कविता होती. राजा गुणाचा चाहता असल्यामुळे राजाने त्या कवीला मिठी मारली व त्याला उत्तम बक्षीस देऊन त्यास सोडून दिले.

तात्पर्य : क्रूर अन्यायी माणसांना सुद्धा कलावंत प्रिय असतात. मुलांनो, एक तरी कला अवगत करण्याचा प्रयत्न करा. प्रयत्नांती परमेश्वर.

## ३९. कोणास कोणी हसू नये

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

बगदादचा बादशहा मोठ्या थाटाने व ऐटीने रस्त्यातून जात असताना त्याला एक चकणा मनुष्य दिसला. वास्तविक शारीरिक व्यंगाची चेष्टा करणे हे निर्दयपणाचे व मूर्खपणाचे असते. या गोष्टीचा बादशहाला विसर पडला व त्याने त्या चकण्या मनुष्यास थांबवून विचारले, " काय रे काण्या, तुला एका वस्तूच्या दोन वस्तू दिसतात म्हणे, खरं काय रे ?" साधारणपणे चकणी माणसे लबाड असतात. हा चकणा मनुष्यही तसाच होता. तो बादशहाला म्हणाला, "खाविंद, आपण मोठे लोक ! आपलं म्हणणं खोटं कसं असेल ? आताच पाहा ना. आपल्याला दोन पाय आहेत ना ? पण मला तर आपल्याला चार पाय असल्यासारखे दिसत आहेत !" ( भावार्थ, गाढव आहात ! ) बादशहा काय ते समजला व त्याने पुन्हा कोणाची खोडी काढली नाही.

तात्पर्य : कोणास कोणी हसू नये. मुलांनो, लक्षात ठेवा.

## ४०. साधूचा उपदेश

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

एकदा एक साधू आपल्या तिघा शिष्यांना घेऊन काशीयात्रेला निघाला. वाटेत जे अनुभव येत, त्यावरून तो साधू आपल्या शिष्यांना धडे देत असे. एका गावात त्यांचा मुक्काम पडला. एक शिष्य स्वयंपाक करू लागला व दुसरा गावात ताक आणण्याकरिता गेला. एका

घरात तो शिरला. तेथे त्याला एक लांब शिंगांची म्हैस दिसली. ती म्हैस एका म्हाताऱ्या बाईची होती. त्या शिष्याने त्या म्हातारीला विचारले 'आजी, आमच्या गुरुजींच्याकरिता थोडं ताक देता का ?'' म्हातारी म्हणाली, "अरे, ताकाला का कोणी नाही म्हणतं ? बैस, देते तुला ताक." इतक्यात हा शिष्य म्हणाला, "काय हो आजी, तुमच्या म्हशीची शिंगं बरीच लांब दिसताहेत ? उद्या म्हैस जर मेली तर तिला बाहेर कशी नेणार ?'' म्हातारी एकदम संतापली व म्हणाली, "मेल्या, भिकारी ते भिकारी, आणि माझी म्हैस मारायला निघालाय ! चल हो चालता !" ताक न देता शिष्याला म्हातारीने घालवून दिले. पहिला शिष्य परत आलेला पाहून साधूने दुसऱ्या शिष्याला पाठविले. तो त्याच म्हातारीकडे आला. म्हातारीने त्याच्या अगोदर आलेल्या शिष्याने जे म्हटले होते ते सांगितले. त्यावर तो शिष्य म्हणाला, "अहो आजी, तो पहिला शिष्य अगदीच मूर्ख दिसतोय ! त्याला एवढं कळेना की म्हैस मेली की तिची शिंगं कापून तिला बाहेर काढायचं ! व काढावं लागणारच " म्हातारी एक लाटणे हातात घेऊन त्या शिष्याला मारायला निघाली व म्हणाली, "हे कसले साधू ? निर्लज्ज मेले ! माझी म्हैस मारायला आले आहेत !" दुसरा शिष्य तसाच ताकाशिवाय निघून गेला. साधूने मग तिसऱ्या शिष्याला त्याच म्हातारीकडे जाण्यास सांगितले. तो शिष्य त्या बाईच्या दाराकडे गेला, तों ती म्हातारी लाटणे घेऊन त्याची वाट पाहातच बसली होती. शिष्याने ताबडतोब नमस्कार केला व म्हणाला, "आजी, आमच्या गुरुजींनी तुमची क्षमा मागण्याकरिता मला पाठविलं आहे.

अहो आजी, तुम्ही किती उदार ? ते दोघे शिष्य अगदी मूर्ख आहेत. त्यांना काही अक्कल नाही. तरी मला माफ करा, मी जातो." असे म्हणून त्याने जाण्याचे नाटक केले. म्हातारीने त्याला परत बोलाविले व त्यास बसावयास सांगून चांगले तांब्याभर ताक दिले. शिष्य परत आला. गुरुजी म्हणाले, "शिष्यांनो, कोणाचीही निंदा करणं यासारखं दुसरं पाप नाही. तसंच, आपलं काम करून घ्यायचं असल्यास गोड बोलूनच करून घ्यावं लागतं. काही वेळा अपमान सुद्धा सहन करावा लागतो."

तात्पर्य : वर दिले आहे. मुलांनो, लक्षात ठेवा. उपदेश फार महत्त्वाचा आहे.

## ४१. तीन पढत मूर्ख



एका गावात चार तरुण राहात होते. त्यांपैकी तीन तरुणांनी एका साधूजवळ राहून तीन प्रकारच्या सिद्धीविद्या अवगत करून घेतल्या होत्या. चवथा जो होता, त्याला कोणतीही, कसलीही विद्या येत नव्हती पण त्याला व्यवहारज्ञान उत्तम होते. समय पाहून कोठे कसे वागावे हे तो उत्तम तऱ्हेने जाणत होता. ते तिघे तरुण मित्र, उत्तरेकडच्या श्रीनगरच्या राजाकडे जाऊन व आपल्या विद्या दाखवून खूप पैसे मिळविण्याच्या उद्देशाने, उत्तरेकडे निघाले. त्यांच्याबरोबर हा चवथा तरुणही निघाला. पण त्याच्याजवळ काही

विद्या नसल्यामुळे हे तिघे मित्र त्याला नेण्यास तयार नव्हते. पण त्याने बरीच गयावया केल्यावर व आपले कौतुक करण्यास व मदत करण्यास कोणी तरी पाहिजे म्हणून त्यालाही नेण्याचे ठरले. अशा तऱ्हेने ही चार मंडळी प्रवासास निघाली. प्रवास करताकरता त्यांना एका अरण्यातून जावे लागले. एका जागी हाडांचा ढीग दिसला. तिघा मित्रांपैकी एक जण पुढे होऊन म्हणाला, "ही हाडं वाघाची दिसत आहेत. तरी मी माझ्या सिद्धीच्या ज्ञानाचा उपयोग करून वाघाचा सांगाडा तयार करतो." व लगेच त्याने वाघाचा सांगाडा तयार केला. त्यावर त्याचा दुसरा मित्र म्हणाला, "अरे, नुसत्या सांगाड्याला काय महत्त्व आहे ? या सांगाड्यावर मी मांस व कातडं चढवितो." असे म्हणून त्याने त्याप्रमाणे केले. यावर तिसरा मित्र पुढे झाला व म्हणाला, "मित्रहो, तुम्ही एवढं केल्यावर मी काही कमी नाही. या सांगाड्यामध्ये मी आताच्या आता प्राण टाकतो व वाघ तयार करतो. माझी विद्या सर्वांत महत्त्वाची आहे." हा सर्व प्रकार पाहून तो चवथा ज्ञानी मित्र म्हणाला, "अरे मित्रा, हा एक रानटी हिंस्र पशू आहे. जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. तरी त्याला जिवंत करू नका." त्यावर तिसरा मित्र अभिमानाने म्हणाला, "मी माझ्या विद्येचा उपयोग करतो आहे तर तू आडवा येणार काय ? मी अतिशय कष्ट घेऊन विद्या शिकलो आहे. तर मी तुझं ऐकणार नाही." चवथ्या मित्राने कपाळाला हात लावला व म्हणाला, "तुला काय करायचं आहे ते कर." असे म्हणून तो पटदिशी तेथील झाडावर जाऊन बसला. तिसऱ्या मित्राने सिद्धीचा उपयोग केला. वाघ जिवंत झाला

व त्याने मोठ्या डरकाळ्या फोडीत या तीन मित्रांना मारून खाऊन टाकले.

तात्पर्य : कोणतेही ज्ञान कोठे कसे वापरावयाचे याचा साधक-बाधक विचार करूनच ते वापरले पाहिजे. व्यवहारज्ञान हेच श्रेष्ठ ज्ञान. मुलांनो, परीक्षेचे पेपर लिहितानासुद्धा व्यवहारज्ञानाचा उपयोग करा.

## ४२. मित्राचा सल्ला

गोविंदराव व गोपाळराव हे दोघे मित्र एक दिवस गप्पा मारीत व चहा पीत बसले होते. त्यांचा संवाद चालू होता.

**गोविंदराव** : काय रे गोपाळ, माझ्या बंड्याला बाजारातून वस्तू कशी विकत आणावी ते अगदी कळत नाही. लोक त्याला फसवितात. त्याला अकलेचा गड्डा, अकलेचा कांदा वाटेल ते म्हणतात. तू तरी काही युक्ती सांग.

**गोपाळराव** : हे पाहा गोविंदा, एक तोडगा करून पाहू व प्रयत्न करू. तू त्याला माशाचा मेंदू शिजवून खायला दे. मेंदू मात्र त्यालाच विकत आणायला सांग.

गोविंदरावांना कल्पना पसंत पडली. त्यांनी बंडूला एकीकडे बोलावून सांगितले, "हे पाहा बंडू, आजपासून रोज माशाचं डोकं विकत आणून ते शिजवून खात जा" बंडूला आनंद

विद्या नसल्यामुळे हे तिघे मित्र त्याला नेण्यास तयार नव्हते. पण त्याने वरीच गयावया केल्यावर व आपले कौतुक करण्यास व मदत करण्यास कोणी तरी पाहिजे म्हणून त्यालाही नेण्याचे ठरले. अशा तऱ्हेने ही चार मंडळी प्रवासास निघाली. प्रवास करताकरता त्यांना एका अरण्यातून जावे लागले. एका जागी हाडांचा ढीग दिसला. तिघा मित्रांपैकी एक जण पुढे होऊन म्हणाला, "ही हाडं वाघाची दिसत आहेत. तरी मी माझ्या सिद्धीच्या ज्ञानाचा उपयोग करून वाघाचा सांगाडा तयार करतो." व लगेच त्याने वाघाचा सांगाडा तयार केला. त्यावर त्याचा दुसरा मित्र म्हणाला, "अरे, नुसत्या सांगाड्याला काय महत्त्व आहे? या सांगाड्यावर मी मांस व कातडं चढवितो." असे म्हणून त्याने त्याप्रमाणे केले. यावर तिसरा मित्र पुढे झाला व म्हणाला, "मित्रहो, तुम्ही एवढं केल्यावर मी काही कमी नाही. या सांगाड्यामध्ये मी आताच्या आता प्राण टाकतो व वाघ तयार करतो. माझी विद्या सर्वांत महत्त्वाची आहे." हा सर्व प्रकार पाहून तो चवथा ज्ञानी मित्र म्हणाला, "अरे मित्रा, हा एक रानटी हिंस्र पशू आहे. जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. तरी त्याला जिवंत करू नका." त्यावर तिसरा मित्र अभिमानाने म्हणाला, "मी माझ्या विद्येचा उपयोग करतो आहे तर तू आडवा येणार काय? मी अतिशय कष्ट घेऊन विद्या शिकलो आहे. तर मी तुझं ऐकणार नाही." चवथ्या मित्राने कपाळाला हात लावला व म्हणाला, "तुला काय करायचं आहे ते कर." असे म्हणून तो पटदिशी तेथील झाडावर जाऊन बसला. तिसऱ्या मित्राने सिद्धीचा उपयोग केला. वाघ जिवंत झाला

व त्याने मोठ्या डरकाळ्या फोडीत या तीन मित्रांना मारून खाऊन टाकले.

तात्पर्य : कोणतेही ज्ञान कोठे कसे वापरावयाचे याचा साधक-बाधक विचार करूनच ते वापरले पाहिजे. व्यवहारज्ञान हेच श्रेष्ठ ज्ञान. मुलांनो, परीक्षेचे पेपर लिहितानासुद्धा व्यवहारज्ञानाचा उपयोग करा.

# ४२. मित्राचा सल्ला

गोविंदराव व गोपाळराव हे दोघे मित्र एक दिवस गप्पा मारीत व चहा पीत बसले होते. त्यांचा संवाद चालू होता.

**गोविंदराव** : काय रे गोपाळ, माझ्या बंड्याला बाजारातून वस्तू कशी विकत आणावी ते अगदी कळत नाही. लोक त्याला फसवितात. त्याला अकलेचा गड्डा, अकलेचा कांदा वाटेल ते म्हणतात. तू तरी काही युक्ती सांग.

**गोपाळराव :** हे पाहा गोविंदा, एक तोडगा करून पाहू व प्रयत्न करू. तू त्याला माशाचा मेंदू शिजवून खायला दे. मेंदू मात्र त्यालाच विकत आणायला सांग.

गोविंदरावांना कल्पना पसंत पडली. त्यांनी बंडूला एकीकडे बोलावून सांगितले, "हे पाहा बंडू, आजपासून रोज माशाचं डोकं विकत आणून ते शिजवून खात जा" बंडूला आनंद

झाला व तो रोज एक रुपया घेऊन माशाचे डोके विकत आणून आईकडून शिजवून खाऊ लागला. कोळी बंडूला एक रुपयाला माशाचे डोके विकून डोकेरहित मासा आणखी एक रुपयाला विकू लागला. या गोष्टीला एक महिना झाला. गोपाळराव बंडूला भेटले व म्हणाले, "काय बंडोबा, सकाळची न्याहारी काय म्हणते आहे ?" बंडूने ओळखले व तो हसला व त्यांना म्हणाला, "गोपाळकाका, मी एक शंका विचारू का ?" गोपाळराव म्हणाले, "विचार की !" त्यावर बंडू म्हणाला, "गोपाळकाका, कोळी सबंध मासा एक रुपयाला विकतो व माझ्याकडून नुसत्या डोक्याची किंमत तो एक रुपया घेतो." गोपाळराव हसून म्हणाले, "अरे, महिनाभर माशाचा मेंदू खाऊन तुझ्या मेंदून ही अक्कल आली व म्हणून तर तुला हे समजलं. आता तुला लोक अकलेचा गड्डा वगैरे काही म्हणणार नाहीत" बंडू खरोखरच सुधारला. बंडूचे बंडोपंत झाले. गोविंदरावांनी गोपाळरावांचे आभार मानले.

तात्पर्य : मुलांनो, गोष्ट साधी असली तरी करून पाहावी. प्रयत्नाला यश हे येणारच.

## ४३. चतुर कारभारी

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

भोर संस्थानात पूर्वी रामनवमीचा उत्सव फार मोठ्या थाटाने साजरा होत असे. निरनिराळ्या ठिकाणचे कलाकार, विद्वान पंडित त्या ठिकाणी येत असत व पंतसचिव त्यांचा उत्तम तऱ्हेने गौरव

करून सत्कार करीत व त्यांची उत्तम प्रकारे संभावना करीत असत. जर्मन युद्धाच्या वेळेस ब्रिटिश सरकारने सर्व संस्थानिकां कडून पैशाची बरीच मागणी केल्यामुळे प्रत्येक संस्थानाप्रमाणे भोर राज्याचा खजिना थोडासा रिकामा पडला व त्याचा परिणाम या उत्सवावर झाला. कलावंतांचा व विद्वानांचा सत्कार व संभावना कशी करावयाची हा प्रश्न पंतसचिवांच्या पुढे उभा राहिला. त्यांनी आपल्या मुख्य कारभाऱ्याला बोलाविले व यावर उपाय विचारला. तो कारभारी कोकणातील पेशव्यांच्या घराण्यातील एक हुशार मनुष्य होता. त्याने सचिवांना सांगितले, "सरकार, आपण काही काळजी करू नका." कलावंतांचा, पंडितांचा, विद्वानांचा सत्कार करण्याचा दिवस उजाडला. शेकडो नवे जुने कलावंत व विद्वान सत्कारार्थ भोर गावी आले. कारभाऱ्याने नव्या व जुन्या कलावंतांची उतरण्याची व्यवस्था वेगवेगळ्या जागी करविली. नंतर तो नव्या कलावंतांच्या राहाण्याच्या जागी गेला व म्हणाला, "महाराजांची प्रकृती बरी नाही. म्हणून सत्काराचा कार्यक्रम यंदा करता येणार नाही. आपणा सर्वांना जो त्रास झाला त्याबद्दल संस्थानातर्फे मी आपली माफी मागतो." सर्व लोक भोर सोडून गेले. त्यानंतर कारभारी जुन्या कलावंतांच्या जागेकडे गेला व म्हणाला, "महाराजांची प्रकृती बरी नाही म्हणून यंदा फक्त नव्या कलावंतांचाच मामुली सत्कार होणार आहे. आपल्या त्रासाबद्दल संस्थानातर्फे मी आपली माफी मागत आहे." कलावंत म्हणाले, "महाराजांची प्रकृती बरी नाही तर यंदा कार्यक्रम नसणेच योग्य." अशा तऱ्हेने कारभाऱ्याने युक्तीने सर्व कलावंतांना संस्थानचा एकही पैसा खर्च न होता परत पाठविले.

पंतसचिवांनी कारभाऱ्याच्या गुणाचे कौतुक केले व त्याला चांगले बक्षीस दिले.

तात्पर्य : मुलांनो; गुणी मनुष्य कुठेही असला तरी चमकल्याशिवाय राहात नाही. संधी मिळाली की तिचा फायदा घ्या.

# ४४. सुखाचा मार्ग

धोंडोपंत व पांडूभटजी दोघेही एकाच वेळी मुंबईस आले व त्यांनी आपला भिक्षुकीचा धंदा सुरू केला. धोंडोपंत अतिशय मितव्ययी व अंथरूण पाहून पाय पसरणारे होते. पांडूभटजी मात्र खर्चिक होते. त्यांना उद्याचे कसे होईल याची फिकीर नव्हती. धोंडोपंतांनी भिक्षुकीवर पैसे मिळवून थोडा सावकारीचा जोडधंदा सुरू केला. एका दिवाळीला पांडूभटजी धोंडोपंतांकडे गेले व म्हणाले, "दिवाळी आली आहे. मला पंचवीस रुपये उसने देतोस का ? माझ्यावर फार उपकार होतील." धोंडोपंतांनी आढेवेढे न घेता पांडूभटजींना पंचवीस रुपये दिले. संध्याकाळी धोंडोपंत आपल्या बायकोकरिता दिवाळीला एक नवे पातळ घेण्याकरिता एका कापडाच्या दुकानात गेले. त्याच दुकानात थोडा वेळ आधी पांडूभटजी पंचवीस रुपयांची साडी विकत घेताना धोंडोपंतांना दिसले. धोंडोपंतांनी दुकानदाराला पंधरा रुपयांपर्यंत किंमत असलेल्या साड्या दाखविण्यास सांगितले. हे ऐकून पांडूभटजी धोंडोपंतांना म्हणाले, "अहो धोंडोपंत, तुम्ही आता बडे इसम झालात, इतक्या स्वस्तातली साडी का

तुमच्यासारख्यांनी दिवाळीला घ्यायची ?" त्यावर धोंडोपंत हसून म्हणाले, "अरे पांडूतात्या, तुझं म्हणणं बरोबर आहे. पण संध्याकाळी पंचवीस रुपये उसने मागायला कोणी आला तर त्याला मला द्यावे लागतील त्याची काय वाट ?" पांडूभटजी मनातल्या. मनात काय ते समजला.

तात्पर्य : अंथरूण पाहून पाय पसरणे म्हणजेच मिळकत पाहून खर्च करणे, हाच खरा सुखाचा मार्ग. मुलांनो, लहानपणापासूनच अशी सवय लावून घ्या.

# ४५. खोटी स्तुती

औरंगजेब बादशहा आपल्या दिवाणखान्यात बसून राजकारणाची पत्रे चाळीत बसला होता. तेव्हा एका कवीने बादशहाची स्तुती करून एक कविता म्हटली. "हे प्रतापी बादशाह, आपलं तेज सूर्यासारखं आहे" वगैरे वगैरे. औरंगजेबाला तोंडपुजेपणा आवडत नसे तरी पण त्याने आपल्या प्रधानाला बोलावून त्या कवीला शंभर नाणी द्यावयास सांगितले. तो कवी हुरळून गेला व त्याने दुसरी कविता म्हटली. त्यामध्ये बादशहा दयाळू व मातापित्यावर प्रेम करणारा असे वर्णन होते. औरंगजेब बादशहाला राग आला. परंतु त्याने राग तोंडावर न दाखविता प्रधानाला हाक मारून "शंभर नाणी नाही, पाचशे नाणी द्या" असे सांगितले. प्रधानाने

कवीला बाहेर बसावयास सांगितले व आत येऊन बादशहास विचारले, "खाविंद, कवीला शंभर नाणी द्यायची की पाचशे नाणी द्यायची ?" औरंगजेब प्रधानावर ओरडला व म्हणाला, "कवीने माझी खोटी स्तुती केली. त्याला जे द्यायचं ते मी दिलं आहे. त्याने माझा खोटा स्तुतिपाठ गाऊन मला खूष करण्याचा प्रयत्न केला, मी देखील त्याला पाचशे नाणी देण्याचं गोड बोलून खूष केलं. त्याला काही द्यायचं नाही. त्याला एवढंच सांगायचं की यापुढे खोटी स्तुती करणं सोडून दे."

तात्पर्य : मुलांनो, खोटी स्तुती करण्याने प्रथम थोडासा फायदा झालेला दिसला तरी शेवटी नुकसानच होते. तरी तसे करू नका.

## ४६. कोण काय करील नेम नाही

एका बड्या मंत्र्याच्या घरी त्याच्या मुलीच्या लग्नाच्या साखरपुड्याचा कार्यक्रम होता. वधूवर पक्षांकडील बरीच मंडळी जमली होती. मंत्री महाशयांनी मेजवानीची व मनोरंजनार्थ लोकप्रिय नृत्यगायनाची उत्तम व्यवस्था केली होती. सभागृहात मुलीला देण्याकरिता तयार केलेली हिऱ्याची सुंदर अंगठी प्रदर्शनार्थ एका टेबलावर चांदीच्या तबकात ठेवली होती. अहेराचे इतर सारे जिन्नस दुसऱ्या टेबलावर ठेवले होते. बायकापुरुष एकमेकांशी बोलण्यात दंग झाले होते.

इतक्यात अचानक मंत्रीमहाशयांची नजर त्या अंगठी ठेवलेल्या तवकाकडे गेली, पण अंगठी नाहीशी झालेली दिसली. ती पाहुणे मंडळी-पैकीच कोणी तरी उचलली होती यात शंकाच नव्हती. पण ते विचारावयाचे कसे व कोणाला ? सर्व थोर आदरणीय लोकशाही राज्यातील मंत्रीमंडळी, त्यांच्या बायका, सुना, मुली, नातेवाईक मंडळी. झडती घेतली तर अंगठी मिळेल हे सरळ होते. पण एखादे वेळेस लग्नच मोडावयाचा धोका. म्हणून मंत्रीमहाशयांनी एक युक्ती योजिली. ते सर्व मंडळीस म्हणाले, "तबकातील अंगठी नाहीशी झालेली दिसत आहे. तरी कोणाकडे ती चुकून गेली असल्यास ती त्याने परत तबकात टाकावी अशी नम्र विनंती. तेवढ्या-करता दोन मिनिटे दिवे मालविण्याची व्यवस्था केली आहे." दोन मिनिटे अंधार झाला पुन्हा दिवे लावण्यात आले. मंत्रीमहाशयांनी टेबलाकडे पाहिले. तो काय आश्चर्य ? अंगठीही नाही व चांदीचे तबकही नाही. मंत्र्यांनी दुसरी अंगठी आणून दिवस साजरा केला. वरपक्षाकडील माणसे उत्तम होती म्हणून त्यांनी विशेष गाजावाजा केला नाही. लग्न झाल्यावर कळले की मंत्रीमहाशयांच्या पहिल्या बायकोच्या मुलाने हा व्यवहार केला होता. हल्लीच्या जगात कोण काय करील याचा नेम नाही.

तात्पर्य : मुलांनो, ओळखा या गोष्टीचे तात्पर्य व तसे वागण्याचा प्रयत्न करा.

# ४७. खरा श्रीमंत कोण

एक गावात एक श्रीमंत जोडपे राहात असे. दोघेही नवरा बायको कवडीचुंबक असून दानधर्म करण्याची त्यांची बिलकुल प्रवृत्ती नव्हती एके दिवशी एक भिकारीण त्यांच्या दारासमोर आली व भीक मागू लागली.

**भिकारीण :** बाईसाब, मला गरिबाला काही द्या.

**मालकीण** : पुढे जा, काही मिळणार नाही.

**भिकारीण :** एखादं फाटकं लुगडं तरी द्या.

**मालकीण :** काही देणार नाही. चालती हो म्हटलं ना !

**भिकारीण :** थोडी भाकरी तुकडा तरी द्या.

**मालकीण :** एकदा सांगितलं ना ? काही नाही म्हणून ? लोचट मेली !

**भिकारीण :** माझ्या कारभाऱ्याला पान, तंबाकू, विडीकाडी तरी द्या.

मालकीण संतापली व म्हणाली, "माझ्याकडे काही नाही. चालती हो." त्यावर ती भिकारीण म्हणाली, "बरोबर आहे. तर मग असं करा माझ्याजवळचे आठ आणे घ्या व मला हे लुगडं मिळालं आहे ते घ्या." असे म्हणून त्या भिकारणीने त्या मालकिणीच्या घरात आठ आणे व एक लुगडे टाकून दिले व ती निघून गेली. मालकिणीला मागाहून पश्चात्ताप झाला.

तात्पर्य : मनाने जो मोठा तोच खरा श्रीमंत. मुलांनो, पुढील आयुष्यात आपल्या मिळकतीपैकी थोडा भाग तरी दान करा.

## ४८. लोकशाही राज्यातील दुष्काळ

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

एका लोकशाही राज्यात फार मोठा दुष्काळ पडला. सरकारने कालव्याचे काम काढले. लोक भराभर कामावर जाऊ लागले. काम सुरू झाले. लोकांना वाटले की मजुरी चांगली मिळेल व लवकर मिळेल. पहिल्याने मजुरी लवकर मिळेना. पुढे ती मिळावयास लागली. पण महागाईच्या मानाने ती फारच थोडी होती. लोक हवालदिल झाले. पगार कसा वाढवून घ्यावा व तो वेळेवर कसा मिळेल याचा विचार करीत मंडळी झाडाखाली विश्रांती घ्यावयास बसली. तितक्यात सरकारच्या विरोधी पक्षापैकी एक नेता तेथे आला. त्या लोकांचे सर्व म्हणणे ऐकून घेऊन तो त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला उपाय सुचवितो. पण मला तुम्ही सर्वांनी पंचवीस रुपये द्या." लोक कबूल झाले व त्यांनी त्याला पंचवीस रुपये दिले. त्यावर तो म्हणाला, "एवढे नाही पुरणार आणखी पंचवीस द्या." लोकांनी पुन्हा पैसे गोळा करून त्याला पंचवीस रुपये दिले. त्यावर तो म्हणाला, "अहो, एवढ्यानं कसं भागेल ? आणखी पंचवीस द्या." तेव्हा मात्र लोक चिडले व त्या नेत्याच्या अंगावर आपापली कुदळ फावडे उचलून त्याला मारायला उठले. तो नेता ताबडतोब म्हणाला, 'अगदी हाच उपाय तुम्ही योजा व त्यात एक भर घाला. ती म्हणजे जो अधिकारी येईल त्याला घेराव घाला. तुमचं काम झालंच समजा " त्याने लोकांचे सर्व पैसे परत करून तेथून गमन केले.

तो गेल्यावर दुसऱ्या दिवशी अधिकारी आला तेव्हा तोच उपाय लोकांनी योजून आपले काम करून घेतले.

तात्पर्य : न्याय मागण्याकरिता जनतेने संप, बंद, मोर्चे हे उपाय इतर सर्व उपाय झाल्यावरच सौम्य प्रमाणात करावे. पण जनतेचे हाल न होतील हे धोरण असावे.

मुलांनो, तुम्ही संप, मोर्चे यांपासून दूर राहा.

## ४१. माणसे ओळखण्यास शिका

विश्वसुंदर नगरीचा राजा आपल्या प्रधानाबरोबर व न्यायाधीशावरोबर काही गुप्त मसलती करीत होता. शेवटी राजाने प्रधानाला ताबडतोब दुसऱ्या गावी काही जरुरीच्या कामाकरिता जावयास सांगितले व प्रधान गेला. तेवढ्यात राजाकडे एक फिर्याद आली. दोन माणसांचे एका सोन्याच्या कंठ्याबद्दल भांडण जुंपले होते. एकाच्या हातात कंठा होता. त्या कंठ्याकडे बोट दाखवून दुसरा म्हणत होता की तो कंठा त्याचा आहे व पहिल्या माणसाने तो चोरून घेतला आहे. पहिला मनुष्य म्हणत होता की कंठा दुसऱ्याचा आहे पण त्याने तो दुसऱ्याकडून विकत घेतला आहे राजाने तो कंठा हातात घेतला व न्यायाधीशाला दाखविला. तो कंठा राजकन्येचा होता हे राजाने ओळखले. राजा संतापला व म्हणाला, "हा कंठा तुम्ही दोघांनी राजवाड्यातून चोरला आहे. त्याच्यावरोबर इतर चोरलेले दागिने कोठे आहेत ते सांगा

नाही तर प्राणाला मुकाल." राजाच्या शिपायांनी दोघांनाही कैद केले होते. ते दोघे घाबरले व म्हणाले, "राजेमहाराज, आम्ही खरं सांगतो. आम्ही दोघांनी हा कंठा एका घरातून चोरून आणला आहे. बाकीच्या दागिन्यांविषयी आम्हाला काही माहिती नाही." राजाने ते घर दाखविण्यास त्यांना नेले. ते घर प्रधानाचे होते. प्रधान गावी गेला होता. ही संधी साधून राजाने त्याच्या घराची झडती घेण्यास सांगितले. झडतीत दागिने सापडले. राजा संतापला. प्रधान गावाहून आल्यावर त्याला राजाने तुरुंगात टाकले. अपराध्याला शिक्षा झालीच पाहिजे, मग तो मोठा असो अगर छोटा असो, असे त्या राजाचे तत्त्व होते.

तात्पर्य : वरून चांगली दिसणारी माणसे चांगली असतातच असे नाही. तरी मुलांनो व मुलींनो, माणसे ओळखण्यास शिका.

# ५०. बुवाबाजीपासून सावध राहा

सुंदर आकर्षक चेहरा, उत्तम शरीरसौष्ठव, थोडीशी गोड आवाजाची देणगी व मिठ्ठी भाषणकला, एवढ्या गोष्टी असल्या म्हणजे बुवाबाजीचा धंदा उत्तम तऱ्हेने सहज करता येतो. यांतच भर म्हणजे लोकांचा भोळाभाबडेपणा हे भांडवल या लोकांच्या उपयोगी पडते. वरील गोष्टी साध्य असलेल्या एका लबाड माणसाने काशी क्षेत्री जाऊन एका मठाची स्थापना केली. थोडेसे पैसे खर्च करून चार शिष्य तयार केले. धंदा काशीक्षेत्री सुरू करण्याचे त्याचे कारण

म्हणजे बरेच धर्मभोळे लोक मोक्षप्राप्तीकरिता, स्वर्गप्राप्तीकरिता काशी क्षेत्री जातात असे त्याने ऐकले होते. शिष्यांनी रामकृष्ण ब्रह्मचारी-बुवांचे गुणगान करून भोळ्याभाबड्या लोकांना दर्शनाला आणण्याचे काम सुरू केले. बुवा सकाळी दोन तास भजनाचा कार्यक्रम करीत असत. पैसा मिळवून देणे, पुत्रप्राप्ती होणे, असाध्य रोग बरे करून दाखविणे वगैरे गोष्टी बुवा हात पाहून सांगू लागले. इतकेच काय, पण मेल्यावर लोकांना स्वर्गप्राप्तीचा मार्ग दाखवू लागले. ही गोष्ट काशीक्षेत्राचा राजा धर्मराज याला कळली. राजाला लोकांच्या भोळेपणाची कीव आली. लोकांची ती बुवाकडे जाणारी गर्दी व बुवांकडे जाणारा पैसा थांबविण्याकरिता राजाने शिपायांकडून त्या रामकृष्णबुवांना पकडून तुरुंगात टाकण्याचा हुकूम केला. हे पाहाताच बुवांचे काही शिष्य भक्त ( पुरुष व स्त्रिया ) यांनी राजाकडे मोर्चा नेला व साधूच्या सुटकेची ताबडतोब मागणी केली. राजा म्हणाला, "जो साधू मेलेल्या लोकांना स्वर्गात पोचवू शकतो, तो या इहलोकातील तुरुंगातून आपली सुटका करून घेऊ शकणार नाही का ? विचार करा व सांगा." लोकांना राजाचे बोलणे पटले व फसल्याबद्दल पश्चात्ताप झाला.

तात्पर्य : भोंदू बुवाबाजीपासून सावध राहा. मुलांनो, परीक्षेचे भविष्य या भोंदूबुवांना विचारण्याचे मनात आणू नका. अभ्यास करा, नक्की पास व्हाल.

# ५१. लोकसेवा हीच ईश्वरसेवा

*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*

एका गावामध्ये माधवराव नावाचे एक सावकार राहात असत. त्यांना आत्मस्तुती हा एकच विषय प्रिय होता. ते कोठेही गेले की आपलेच पुराण, स्तुतिपुराण चालू ठेवीत. "मी असं केलं—मी तसं केलं..मी ह्या संस्थेला देणगी दिली" वगैरे वगैरे. ते मदत कोणालाच करीत नसत. मदत केली असे नुसते सांगत असत. इतरांच्या नावलौकिकाची किंवा सुखदु:खाची त्यांना बिलकुल फिकीर नसे. त्याच गावी रामशास्त्री नावाचे एक भटजी राहात असत. ते शेजारी पाजारी लोकांना, गावातील गरीब श्रीमंत लोकांना, त्यांची कामे करून मदत करीत असत. त्यामुळे त्या गावात ते अतिशय लोकप्रिय झाले होते. ते कुठे दिसेनासे झाले की सर्व गाव त्यांची चौकशी करी. एकदा रामशास्त्र्यांना अचानकपणे बाहेरगावी जावे लागले. बरेच दिवस झाले तरी रामशास्त्री कुठे दिसेनात. लोक गावामध्ये एकमेकांना विचारू लागले. माधवरावांना तर किती तरी लोकांनी "रामशास्त्री कुठं गेले हो ? आजारीबिजारी पडले की काय ?" असे विचारले. इतकेच काय, पण माधवरावांच्या पत्नीनेसुद्धा हाच प्रश्न त्यांना दोनदा चारदा विचारला. माधवरावांना कोडे पडले, की लोक या भिकारड्या भटजीची इतकी प्रेमाने चौकशी का करतात ? त्यांनी स्वतः बाहेरगावी जाऊन आपली लोक चौकशी करतात की नाही ते पाहाण्याचे ठरविले व ते दहा दिवस गावाला जाऊन आले. नेमके त्याच वेळेला समोरून येत असलेले शेजारचे रघुअण्णा भेटले. त्यांना माधवरावांनी विचारले, "काय रघुअण्णा, गावातली काय नवी जुनी

खबरबात ?" रघुअण्णा म्हणाले, "अहो माधवराव, कळलं का ? आपले रामशास्त्री परत आले." त्यावर माधवराव म्हणाले, "अहो रघुअण्णा, मी दहा दिवस कोकणात गेलो होतो." रघुअण्णा म्हणाले, "असं होय ? पण कोणी काही गावात तसं बोलल्याचं आठवत नाही." असे म्हणून रघुअण्णा हसले व माधवरावांना पुन्हा मिष्किलपणे म्हणाले, "काय माधवराव, असं का झालं कळलं का ? रामशास्त्री म्हणजे सर्वांना मदत करणारा व सर्वांची हौसेने कामं करणारा देवमाणूस व तुम्ही म्हणजे सगळीकडे आपलंच पुराण गाणारे."

तात्पर्य : मुलांनो, लोकसेवा हीच खरी ईश्वरसेवा; व त्यावरूनच माणसाची किंमत कळते.

## ५२. हुशारपणाचे बक्षिस

एका गावामध्ये हणमंतराव नावाचे एक श्रीमंत बडे सावकार होते. त्यांचा धंदा, शेती व सावकारी बरीच मोठी होती. पण दुर्दैवाने त्यांच्या संपत्तीला कोणी मालक नव्हता, म्हणजे त्यांना पुत्रसंतान नव्हते. म्हणून त्यांनी कोणा तरी हुशार होतकरू मुलाला दत्तक घेण्याचे ठरविले. ही बातमी शेजारच्या गावी रमाबाई नावाच्या एका गरीब बाईला कळली. तिला गणू नावाचा एक मुलगा होता. गरिबीमुळे तो मुलगा हुशार असूनही त्याचे शिक्षण व्ह. फायनल-पर्यंतच झाले. त्याला व्यवहारज्ञान उत्तम होते. रमाबाईंनी गणूला

दा. क्र. 9995 विषय 18212 892

त्या सावकाराच्या गावी आणले व त्या सावकाराला म्हणाल्या, “माझा मुलगा हुशार आहे तरी त्याची परीक्षा घेऊन तो आपल्या परीक्षेस उतरल्यास आपण त्याला दत्तक घ्यावे ही माझी आपणास नम्र विनंती आहे.” सावकाराने सांगितले, “बाई, मी आपल्या मुलाला ठेवून घेतो. मी याला प्रथम कोणतंही हलकं-सलकं काम देईन व त्यातूनच त्याने आपली हुशारी व अक्कल दाखविली पाहिजे.” रमाबाईंनी मुलाला ठेवले व त्या गावी गेल्या. सावकाराने पहिल्याने गणूला आपल्या गाई म्हशी पाळण्याचे म्हणजे गुराख्याचे काम दिले. गणू जनावरे रानात नेऊ लागला. त्याला ते काम आवडत नव्हते, पण पुढील आशेवर त्याने काम सुरू केले. एक दिवस त्याने बाळू नावाच्या एका मित्राला जनावरे पाळण्याचे काम सांगून तो स्वतः एक उत्तम गाय घेऊन शेजारच्या गावात गेला. गाईच्या पाठीवर एक रुपयाला गाय विकणे आहे अशी पाटी लावून त्याने गाय सबंध गावातून फिरविली व ज्याला गाय पाहिजे असेल त्याला दोन वाजता चावडीवर येण्यास सांगितले. दोन वाजता लोक जमले. गणूने सांगितले, “प्रत्येकाने एकेक रुपया व आपल्या नावाची चिठ्ठी द्यावी. ज्याच्या नावाची चिठ्ठी निघेल त्याला गाय मिळेल.” त्या लहान मुलाचे सर्वांना कौतुक वाटले व त्यांनी प्रत्येकाने एकेक रुपया व नावाची चिठ्ठी दिली. त्या चिठ्ठ्यांपैकी एका लहान मुलाकडून एक चिठ्ठी उचलून त्यावर ज्याचे नाव आले त्याला गाय दिली. आमचे गणोबा जमलेले बाराशे सतरा रुपये घेऊन घरी आले. त्याने सर्वच्या सर्व रुपये सावकाराच्या हाती देऊन सर्व हकीगत सांगितली. सावकार खूष झाले व त्यांनी लागलीच चांगला

मुहूर्त पाहून गणूला दत्तक घेतले. गावकऱ्यांना भोजन दिले. रमाबाईंना आपल्या घरातच राहावयास जागा दिली. रमाबाईंनी सावकाराचे उपकार मानले.

तात्पर्य : मुलांनो, हुशारपणाचे बक्षिस मिळाल्यावाचून राहात नाही. तरी हुशारी दाखविण्याची संधी वाया घालवू नका.

# ५३. लबाड लोभी पुजारी

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

कोल्हापूर शहराच्या जवळच्या एका गावात एक अंबाबाईचे देऊळ होते. त्या देवळात काम करणाऱ्या पुजाऱ्याला प्राप्तीही बरी होती. पण हा पुजारी वर्तमानपत्रे वाचणारा असल्याने त्याला कुठे ना कुठे तरी संपाची बातमी दिसावयाची. आज काय पगारवाढीकरिता संप- उद्या पगारवाढ व बोनसकरिता मोर्चा—त्याच्या पुढील दिवशी पगारवाढीकरिता काळी निशाणे घेऊन निदर्शने, असे रोज वर्तमानपत्रातील संप, बंद, मोर्चे यांची भडक वर्णने वाचून या पुजाऱ्याने देवळाच्या ट्रस्टीकडून पैसे उकळण्याकरिता एक उपाय योजला. उपाययोजना मनातल्या मनात नक्की करून त्या वेळेपासून त्याने देवळात जाणे बंद केले व घरी राहू लागला. ट्रस्टींनी पुजाऱ्याला देवळाचे दार बंद असण्याचे कारण विचारले. पुजाऱ्याने अगदी दीनवाणी करून सांगितले, "ट्रस्टीमहाशय, मी तरी काय करणार ? परवा रात्री माझ्या स्वप्नात जगदंबा अंबाबाई आली व म्हणाली, 'माझ्या देवळाचा पुजारी असा भिकारडा असून उपयोगी नाही.

तेव्हा मी आता माझा मुक्काम ज्या देवळाचा पुजारी श्रीमंत असेल तेथे जाणार.' मी जगदंबेला मनःपूर्वक नमस्कार केला व म्हणालो, "आई जगदंबे, माझ्यासाठी हे देऊळ सोडून जाण्याची घाई करू नये. देवळाचो ट्रस्टी मंडळी फार चांगली आहेत. तुमच्या तक्रारीची योग्य नोंद घेऊन माझं दारिद्र्य नक्कीच ताबडतोब दूर करून मलाच श्रीमंत पुजारी बनवितील." ट्रस्टींनी पुजाऱ्याचे म्हणणे ऐकून घेतले व त्याला दुसऱ्या दिवशी भेटण्यास सांगितले. संध्याकाळी ट्रस्टी मंडळींची बैठक भरली. या लबाड व लोभी पुजाऱ्याचा डाव त्यांनी ओळखला व त्याच्या जागी दुसरा पुजारी नेमला. पहिल्या पुजाऱ्याला मागाहून पश्चात्ताप झाला. पण काय उपयोग ?

तात्पर्य : मुलांनो, लबाडी व लोभीपण कधीच फायदेशीर होत नाही.

# ५४. तीन विद्यार्थी तीन स्वभाव

लंडन शहरी एका कॉलेजात एक भारतीय, एक पाकिस्तानी व एक चिनी विद्यार्थी शिकावयास गेले होते. त्या कॉलेजातील एका इंग्लिश विद्यार्थ्याबरोबर या तिघांची खूप मैत्री जमली; कारण हे सर्व विद्यार्थी उत्तम खेळाडू होते. तो इंग्लिश विद्यार्थी लंडनजवळच असलेल्या आपल्या गावी या तिघा मित्रांना शनिवार-रविवारी मधून-मधून नेत असे. त्या विद्यार्थ्याचे वडील फार प्रेमळ असून या तीन विद्यार्थ्यांवर त्यांचे प्रेम बसले. त्यांच्याकरिता ते बरेच पैसे खर्च करीत. ते वडील एकदा फार आजारी पडले व त्यांनी आसन्नमरण असताना

या तीन परदेशी विद्यार्थ्यांना भेटावयास बोलाविले. म्हाताऱ्याला फार आनंद वाटला. ते विद्यार्थ्यांना म्हणाले, "मुलांनो, मी आता मरणार हे नक्की. पण माझी अशी इच्छा आहे की मी मेल्यावर माझ्या शवपेटीत तुम्ही प्रत्येकाने पाच पाच पौंड ठेवावे." संध्याकाळीच त्याला मरण आले. शवपेटी तयार झाली. भारतीय विद्यार्थ्याने म्हाताऱ्याच्या इच्छेप्रमाणे पाच पौंड शवपेटीत ठेवले. पाकिस्तानी विद्यार्थ्याने पाच पौंडांचा चेक लिहून शवपेटीत ठेवला. तो चेक वटवणे शक्य नव्हते हे त्याला माहीत होते. चिनी मित्राने पटदिशी आपले चेकबुक काढून पंधरा पौंडांचा चेक लिहून शवपेटीत टाकला व भारतीय मित्राने ठेवलेले पाच पौंड व पाकिस्तानी मित्राने ठेवलेला पाच पौंडांचा चेक काढून घेतला व ताबडतोब घराबाहेर पडला. भारतीय व पाकिस्तानी विद्यार्थी त्याच्याकडे आ करून पाहातच राहिले.

तात्पर्य : मुलांनो, या गोष्टीत भारतीय मनाचा मोठेपणा दिसून येतो. त्याचेच अनुकरण करा.

# ५५. समाजातील साप

*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*●*

एका घरात सापाने बीळ केले होते. तो वाटेल तेव्हा बाहेर पडत असे. त्यामुळे घरातील सर्व माणसे घाबरलेली असत. त्याला मारण्याकरिता खूप प्रयत्न केला पण व्यर्थ! शेवटी एक दिवस त्या सापाच्या बिळाच्या तोंडाशी सापाची भली मोठी कात पडलेली त्या घरमालकाला

दिसली. तेव्हा त्याने शेजारच्या रामरावांना बोलावून आणले व सांगितले, "अहो रामराव, दैवाने अखेर खैर केली म्हणायची. साप आपोआप मरून पडला आहे." रामरावांनी विचारले, "ते कसं काय बुवा? काय झालं?" घरमालकाने ती कात त्यांना दाखविली. रामराव म्हणाले, "अहो महाशय, हे मेलेल्या सापाचं कातडं नव्हे. हे जुनं कातडं म्हणजे कात! व ही कात टाकल्यावर सापाला अधिकच जोर चढतो. तेव्हा हे खूळ डोक्यातून काढून टाका आणि गाफील न राहता त्या दुष्ट सापाची शक्य तितक्या लवकर खांडोळी करून टाका. हे लपलेले साप फार वाईट."

तात्पर्य : भगिनींनो, समाजात लपलेले साप बरेच आढळतात. त्यांची खांडोळी करता आली नाहीत तरी त्यांच्यापासून सावध राहा. ऑफीसच्या कँटीनमध्ये फुकट चहा पिऊ नका. आपले काम दुसऱ्या-कडून करून घेऊ नका. कोणी मोटारीचा लिफ्ट दिला तरी मोहाला बळी पडू नका. तुमच्या मुलांना दिलेले चॉकोलेट महाग पडण्याचा संभव फार.

# ५६. गर्वाचे घर खाली

एका गावात केशवशास्त्री नावाचे एक उत्तम ज्योतिषी होते. पंचक्रोशीतील बहुतेक लोकांनी त्यांना हात दाखवून ज्योतिष विचारून घेतले होते. पण या गुणी मनुष्याच्या अंगी अहंकार हा दुर्गुण होता. गावात दुसरा कोणी ज्योतिषी आला तर त्याला नाना प्रकारचे प्रश्न

विचारून केशवशास्त्री त्याचा अपमान करीत असत. पण गर्वाचे घर खाली होण्याचा प्रसंग केव्हा तरी येतोच. तोच प्रसंग आमच्या शास्त्रीबुवांच्यावर आला. गावात काशीचे एक ज्योतिषी आले. सगळीकडे गावात बातमी गेली. केशवशास्त्री त्यांना भेटले व म्हणाले, "अहो काशीकर, माझ्यासारखा ज्योतिषी व हस्तसामुद्रिक इथं असताना, तुम्ही इथं येण्याचं धाडस का केलं ते कळत नाही." त्यावर तो ज्योतिषी म्हणाला, "आपण मोठे आहात, विद्वान आहात, हे सर्वश्रुत आहे. पण माझ्याजवळही थोडीशी विद्या आहे. पाहिजे असेल तर प्रचीती पाहावी." सर्व गावातील लोकांनी दोघांची परीक्षा पाहण्याचे ठरविले. सर्व मंडळी चावडीवर जमली. त्याच वेळी त्या गावात शेजारच्या गावचे पाटील काही कामानिमित्त आले होते. त्यांचे भविष्य दोघांनी पाहावे असे ठरले. पाटलांनी फुकटात भविष्य पाहावयास मिळते आहे, असा विचार करून हात पुढे केला. केशवशास्त्री हात पाहू लागले व म्हणाले, "पाटील महाराज, ही आमची परीक्षा आहे, तेव्हा मला सर्व खरं सांगणं क्रमप्राप्त आहे. आपल्या नशिबात धनलाभ आहे. पण आपण फार चिकट आहात. आपल्या पत्नीचं व आपलं फारसं पटत नसावं." पाटील रागावले व म्हणाले, "माझ्या तोंडावर माझी निंदा–अपमान ? मी चाललो." त्यावर काशीकर ज्योतिषी म्हणाले, "पाटीलबुवा, मी पाहातो तुमचं हस्तसामुद्रिक. काशीक्षेत्री माझं नाव फार मोठं आहे." पाटलांनी हात पुढे केला. त्यावर काशीकर म्हणाले, "पाटीलबुवा, आपल्यावर लक्ष्मीमातेचा वरदहस्त आहे. आपल्या औदार्याची कोणाबरोबर तुलना करावी, हाच प्रश्न आहे.

पूर्वजन्मीचं आपलं पुण्य फार मोठं असल्यामुळे आपल्याला उत्तम पत्नीसुख आहे." पाटीलबुवा खूष झाले व त्यांनी काशीकर ज्योतिषीबुवांना वीस रुपये ताबडतोब दिले व ते निघून गेले. ते गेल्यावर काशीकर म्हणाले, "ज्योतिषाला ज्योतिषशास्त्रापेक्षा व्यवहारज्ञान व समयसूचकता हे गुण असावयास पाहिजेत." केशवशास्त्र्यांनी यापासून काय तो धडा घेतला व त्यांनी अहंकार सोडून दिला.

तात्पर्य : मुलांनो, अहंकार हा फार मोठा दुर्गुण आहे. गर्वाचे घर खाली हे लक्षात ठेवा.

## ५७. एकाचे अन्न दुसऱ्याचे विष

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

कोकणातील एका गावात वैशाख महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जोराचा पाऊस आला. एक मासे विकणारा कोळी मासे विकून घरी जात असताना या पावसात सापडला. ओलाचिंब झाला व थंडीने थरथर कापू लागला. जवळच त्याला एक घर दिसले. ते घर एका माळ्याचे होते. माळ्याने ह्या कोळ्याला पाहिले व त्याला त्याची दया आली. त्याने त्याला घरी बोलाविले. कोरडे धोतर व सदरा त्याला अंगात घालावयास दिला. रात्री आपल्याबरोबर जेवावयास दिले व तो माळी गुलाबाची फुले ज्या खोलीत ठेवीत असे त्या खोलीत त्या कोळ्याला निजावयास सांगितले. कोळी अंथरुणावर पडला. पण त्या खोलीभर दरवळलेल्या गुलाबाच्या वासामुळे त्याला झोप येईना. त्याला

मळमळ वाटू लागली. त्याला काही केल्या झोप येईना. तो हळूच उठला व त्याने आपली मासळीची टोपली आपल्या उशाजवळ आणून ठेवली. त्या टोपलीकडे नाक करून मासळीच्या सुवासात तो गाढ झोपी गेला.

तात्पर्य : एखादी गोष्ट एका मनुष्यास आवडली म्हणजे दुसऱ्या मनुष्यास आवडतेच असे नाही. एकाचे जे अन्न ते दुसऱ्याचे विष. एकाने नाकारलेली वधू दुसऱ्याला पटदिशी पसंत पडून तो तिच्याशी संसार करतो. नातवाला आवडणारी आजी सूनबाईंना आवडेलच असे नाही.

## ५८. पूर्वीचे लहरी संस्थानिक

पूर्वी इंदूर संस्थानात शिवरामभट बाम नावाचे एक विद्वान शास्त्री राहात असत. धर्मशास्त्राविषयी कोणाला काही शंका विचारावयाची झाल्यास ते लोक शास्त्रीबुवा बाम यांचा पत्ता विचारून त्यांच्याकडेच जात असत. इतकी विद्वत्ता असूनही शास्त्रीबुवांचे घर चंद्रमौळी व दोन्ही वेळच्या नीटपणे जेवणाची चिंता असे. ही स्थिती पाहून संस्थानिकांच्या एका कारभाऱ्याने संस्थानिकांकडे जाऊन या विद्वान मनुष्याचे दारिद्र्य कायमचे दूर करण्यास विनंती केली. योगायोग असा की त्या वेळेस संस्थानिक रेसमध्ये पैसे मिळाल्याच्या आनंदात होते. राजेसाहेबांनी शिपायामार्फत ताबडतोब रुपये भरून पिशवी त्या बामबुवांच्या घरी पाठविली. शिपायाने त्यांना आदरपूर्वक

नमस्कार करून त्यांच्यापुढे ती पिशवी ठेवली व म्हणाला, "आपल्या विद्वत्तेचं व गुणांचं वर्णन ऐकून राजेमहाराजांनी आपणाकडे ही भेट पाठविली आहे. तरी स्वीकार व्हावा." शिपाई निघून गेल्यावर महाराजांची आपल्यावर कृपा का व्हावी, याबद्दल शास्त्रीबुवा विचार करू लागले. त्यांच्या पत्नी स्त्रीस्वभावानुरूप मनातल्या मनात मनोराज्य करू लागल्या. पिशवीत कोणते दागिने असतील, किती रुपये असतील वगैरे वगैरे. इतक्यात शास्त्रीबुवांनी ती पिशवी सील करून जशीच्या तशीच पेटीत ठेवली व पत्नीला सांगितले की यातील संपत्ती कोणीही केव्हाही वापरावयाची नाही. त्यावर सौ. जानकीबाई-त्यांच्या पत्नी—म्हणाल्या, "इश्श ! हा हो काय वेडेपणा ? चांगली घरी चालून संपत्ती आली, तिला कोणी डावलतो का ?" त्यावर शास्त्रीबुवा म्हणाले, "अग, तुम्हा बायकांना डोकं खरंच कमी असतं ह्यात शंका नाही. सोनं पाहिलं की हुरळून जाता ! कोणाच्या तरी सांगण्यावरून माझ्यावर ही महाराजांची कृपा झाली असेल. उद्या दुसऱ्या कोणाच्या तरी सांगण्यावरून संस्थानिक मला मारून सुद्धा टाकतील व सर्व संपत्ती हिरावून नेतील." आणि शास्त्रीबुवांचे हे बोल आठच दिवसांनी खरे ठरले. इंदूर संस्थानात बाम या नावाच्या गृहस्थावर चोरीचा खोटा आळ आला. पण तो सिद्ध होण्याच्या अगोदरच संस्थानिकांनी राज्यातील सर्व बाम मंडळींना हद्दपार करण्याचा हुकूम काढून अंमलात आणला. शिवरामशास्त्री त्यानंतर वाई मुक्कामी आले. ( सत्यकथा )

तात्पर्य : मुलांनो, संगत आपल्या बरोबरीच्या मुलांबरोबर करावी. श्रीमंतांपासून सर्वसाधारणपणे दूर राहाणे बरे.

मळमळ वाटू लागली. त्याला काही केल्या झोप येईना. तो हळूच उठला व त्याने आपली मासळीची टोपली आपल्या उशाजवळ आणून ठेवली. त्या टोपलीकडे नाक करून मासळीच्या सुवासात तो गाढ झोपी गेला.

तात्पर्य : एखादी गोष्ट एका मनुष्यास आवडली म्हणजे दुसऱ्या मनुष्यास आवडतेच असे नाही. एकाचे जे अन्न ते दुसऱ्याचे विष. एकाने नाकारलेली वधू दुसऱ्याला पटदिशी पसंत पडून तो तिच्याशी संसार करतो. नातवाला आवडणारी आजी सूनबाईंना आवडेलच असे नाही.

## ५८. पूर्वीचे लहरी संस्थानिक

पूर्वी इंदूर संस्थानात शिवरामभट बाम नावाचे एक विद्वान शास्त्री राहात असत. धर्मशास्त्राविषयी कोणाला काही शंका विचारावयाची झाल्यास ते लोक शास्त्रीबुवा बाम यांचा पत्ता विचारून त्यांच्याकडेच जात असत. इतकी विद्वत्ता असूनही शास्त्रीबुवांचे घर चंद्रमौळी व दोन्ही वेळच्या नीटपणे जेवणाची चिंता असे. ही स्थिती पाहून संस्थानिकांच्या एका कारभाऱ्याने संस्थानिकांकडे जाऊन या विद्वान मनुष्याचे दारिद्र्य कायमचे दूर करण्यास विनंती केली. योगायोग असा की त्या वेळेस संस्थानिक रेसमध्ये पैसे मिळाल्याच्या आनंदात होते. राजेसाहेबांनी शिपायामार्फत ताबडतोब रुपये भरून पिशवी त्या बामबुवांच्या घरी पाठविली. शिपायाने त्यांना आदरपूर्वक

नमस्कार करून त्यांच्यापुढे ती पिशवी ठेवली व म्हणाला, "आपल्या विद्वत्तेचं व गुणांचं वर्णन ऐकून राजेमहाराजांनी आपणाकडे ही भेट पाठविली आहे. तरी स्वीकार व्हावा." शिपाई निघून गेल्यावर महाराजांची आपल्यावर कृपा का व्हावी, याबद्दल शास्त्रीबुवा विचार करू लागले. त्यांच्या पत्नी स्त्रीस्वभावानुरूप मनातल्या मनात मनोराज्य करू लागल्या. पिशवीत कोणते दागिने असतील, किती रुपये असतील वगैरे वगैरे. इतक्यात शास्त्रीबुवांनी ती पिशवी सील करून जशीच्या तशीच पेटीत ठेवली व पत्नीला सांगितले की यातील संपत्ती कोणीही केव्हाही वापरावयाची नाही. त्यावर सौ. जानकीबाई–त्यांच्या पत्नी—म्हणाल्या, "इश्श ! हा हो काय वेडेपणा ? चांगली घरी चालून संपत्ती आली, तिला कोणी डावलतो का ?" त्यावर शास्त्रीबुवा म्हणाले, "अग, तुम्हा बायकांना डोकं खरंच कमी असतं ह्यात शंका नाही. सोनं पाहिलं की हुरळून जाता ! कोणाच्या तरी सांगण्यावरून माझ्यावर ही महाराजांची कृपा झाली असेल. उद्या दुसऱ्या कोणाच्या तरी सांगण्यावरून संस्थानिक मला मारून सुद्धा टाकतील व सर्व संपत्ती हिरावून नेतील." आणि शास्त्रीबुवांचे हे बोल आठच दिवसांनी खरे ठरले. इंदूर संस्थानात बाम या नावाच्या गृहस्थावर चोरीचा खोटा आळ आला. पण तो सिद्ध होण्याच्या अगोदरच संस्थानिकांनी राज्यातील सर्व बाम मंडळींना हद्दपार करण्याचा हुकूम काढून अंमलात आणला. शिवरामशास्त्री त्यानंतर वाई मुक्कामी आले. ( सत्यकथा )

तात्पर्य : मुलांनो, संगत आपल्या बरोबरीच्या मुलांबरोबर करावी. श्रीमंतांपासून सर्वसाधारणपणे दूर राहाणे बरे.

# ५९. कोणालाही फसवू नका

सर्व दैवतांमध्ये श्रीशिवशंकर हे दैवत फार भोळे व त्वरित प्रसन्न होते असा भाविक लोकांचा समज आहे. त्याला अनुसरून देवदत्त नावाच्या एका ब्राह्मणाच्या मुलाने भगवान श्रीशंकरांना फसविण्याच्या उद्देशाने त्यांची तपश्चर्या करण्याचे नाटक सुरू केले. श्रीशंकरांनी ते ओळखले व त्यांनी त्या मुलाला बऱ्याच दिवसांनी दर्शन दिले. त्यांचा संवाद खालीलप्रमाणे झाला.

**श्रीशंकर :** काय रे देवदत्ता, माझ्या भक्ता, तू माझी तपश्चर्या कशाकरिता केलीस ?

**देवदत्त :** हे देवाधिदेवा, महादेवा, लोक म्हणतात की तू भक्तवत्सल आहेस. भक्ताच्या हाकेला तावडतोब हजर होतोस. पण मला दर्शन देण्यास इतका वेळ का लावलास ?

**श्रीशंकर :** अरे भक्ता, तुमची हजारो वर्षे म्हणजे आमचा एक दिवस. त्या हिशेबाने मी लवकरच दर्शन दिले आहे.

**देवदत्त :** तर मग देवा, आमचे एक लाख रुपये म्हणजे तुमचे किती रुपये ?

**श्रीशंकर :** अरे, आमचा एक पैसा म्हणजे तुमचे लाख रुपये.

**देवदत्त :** तर मग देवा, माझ्या तपश्चर्येचं फळ म्हणून मला तुमचा एक पैसा द्या. ( मनात लक्षाधीश होण्याचे मांडे खात होता. )

**श्रीशंकर :** भक्ता, तू थांब, मी एका मिनिटात पैसा आणून देतो.

( असे म्हणून श्रीशंकर अदृश्य झाले. )

देवदत्त ब्राह्मण एक लक्ष रुपये मिळाल्यावर काय करायचे, याचे मनोराज्य करीत बसला. बराच वेळ झाला. श्रीशंकर आले नाहीत तेव्हा त्याच्या लक्षात आले की श्रीशंकरांचे एक मिनिट म्हणजे हजारो वर्षे. देवाला फसवायला गेलो पण उलट अंगाशी आले.

तात्पर्य : मुलांनो, कोणालाही फसविण्याचे मनात सुद्धा आणू नका.

## ६०. मागण्या योग्य असाव्या

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

इंद्रप्रस्थ राज्यात धर्मवीर नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचे नाव होते इंदुमती. ही राणी फार हुशार, धोरणी व राजकारणी होती. राजा तिचा सल्ला घेऊनच राज्य करीत असे. इन्दुमती राणीसाहेब गोरगरिबांना, विद्वानांना अन्नवस्त्र देऊन मदत करीत असे. सर्व मंत्र्यांना "गरिबी हटाव" हा उपदेश डोळ्यापुढे ठेवून प्रजेचे हित पाहाण्यास सांगत असे. मंत्री मंडळी स्वतःची "श्रीमंती वढाव" व लोकांची "गरिबी बढाव" हे धोरण ठेवून राणीचे ऐकत नसत ती गोष्ट निराळी. राजा नेहमी म्हणे, "माझी प्रजा म्हणजे माझीच धाकटी भावंडं आहेत: माझ्याजवळ व माझ्या राज्यात जे काही आहे ते माझ्या भावंडांचंच आहे." नाशिकचा एक ब्राह्मण त्यावेळेस तेथे गेला होता. त्याच्या कानावर राजाचे हे शब्द पडले. तो दुसऱ्या दिवशी उठला व

राजवाड्यात जाऊन म्हणाला, "मी महाराजांचा धाकटा भाऊ आहे. मला महाराजांना भेटायचं आहे." राजाने त्याला दरबारात बोलावून विचारले, "काय पाहिजे आपल्याला ?" तो ब्राह्मण म्हणाला, "मी आपली प्रजा, आपला धाकटा भाऊ आहे. आपल्या संपत्तीतला माझा वाटा जेवढा असेल तेवढा देण्याची व्यवस्था व्हावी, ही नम्र विनंती." राजाने अर्थमंत्र्यांना बोलाविले व विचारले, "खजिन्यात किती रक्कम आहे ? खर्च काय आहे ? पुढील वर्षीचे बजेट किती ? संरक्षण खर्च वगैरे सर्व गोष्टी पाहा व लोकसंख्येचा आकडा पाहून सांगा म्हणजे या ब्राह्मणाला त्याचा वाटा देण्यास बरं पडेल." अर्थमंत्री फार हुशार होता. त्याने ब्राह्मणाला धडा शिकविण्याचे ठरवून दुसऱ्या दिवशी आपला अहवाल राजेसाहेबांना सादर केला व सांगितले, "सर्व राज्यात महागाईवाढ, पगारवाढ, घरभाडे भत्ता वगैरे मागण्यांसाठी आंदोलनं, मोर्चे, संप चालू आहेत. शेजारचे मुसलमानी राज्य काही तरी कारणावरून लढाईची धमकी देत आहे. लोकसंख्या भरमसाट वाढत आहे. तरी एकंदर हिशेब पाहाता या ब्राह्मणाकडूनच त्याची निम्मी मालमत्ता सरकारजमा करावी लागेल असं मला वाटतं." अर्थमंत्र्याचे हे शब्द ऐकताच ब्राह्मण पळून गेला.

तात्पर्य : मुलांनो, कोणाच्याही चांगुलपणाचा फार फायदा घेणे बरे नव्हे. आई, वडील देतील तेवढ्या वस्तूवरच समाधान मानावे. नाही तर × × संपातील कर्मचाऱ्यांसारखी स्थिती होईल.

—

# ६१. प्रयत्न सोडू नका

रमेश नावाच्या एका तरुणास लहानपणापासून कविता करण्याचा व गोष्टी लिहिण्याचा छंद होता. तो एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाला. चांगली प्राध्यापकाची नोकरी मिळाली. दुसऱ्या एका प्राध्यापकाच्या सुधा नावाच्या मुलीबरोबर त्याचे लग्न झाले. प्राध्यापकाची नोकरी ! मग काय ? बरेच स्वास्थ्य मिळाले व मग यांनी कविता व गोष्टी लिहिण्याचा छंद सुरू केला. कविता, गोष्टी लिहावयाच्या व नियतकालिकांच्या मासिकांच्या संपादकांकडे पाठवावयाच्या, असा कार्यक्रम सुरू झाला. परंतु रमेशाचे सर्व लिखाण साभार परत येऊ लागले. रमेश हा सर्व पत्रव्यवहार कॉलेजच्या पत्त्यावर करी. त्यामुळे सुधाबाईंना साभार परत आलेल्या टपालाचे काही कळत नसे. या साभार लिखाणाने प्राध्यापकांची एक पेटी भरली. लिखाण कोठेच छापून प्रसिद्ध होईना. त्यामुळे रमेश एक दिवस अगदी वैतागला. सुधाताईंनी वैतागण्याचे कारण विचारले. तेव्हा नाही-होय करताकरता प्राध्यापकांनी सर्व परत आलेले लिखाण बायकोला दाखविले. इतक्यात सुधाबाईंचे वडील मुलीला व जावयाला भेटावयास आले. जावई नेहमीप्रमाणे मूडमध्ये दिसले नाहीत. म्हणून सासरेबुवांनी हळूच स्वैपाकघरात जाऊन सुधाला कारण विचारले. तिने सर्व प्रकार सांगितला. सासरेबुवा बाहेर आले व हसून म्हणाले, "अहो जावईबापू, असे खिन्न होऊ नका. उदास होऊ नका. तुमच्याकडे साभार लिखाण परत फार तर चारदोन महिने येत आहे. माझ्याकडे पाहा ?

पत्रावळीवर वाढली. शिवरायांना पेज खाण्याची कधीच सवय नव्हती. त्यामुळे ती सगळीकडून पत्रावळीच्या बाहेर वाहू लागली. शिवाजी-महाराजांची मोठी तिरपीट उडाली. ते पाहून म्हातारी म्हणाली, "अरे शूर गड्या, तू त्या शिवाजीसारखाच दिसतोस की रे!" महाराजांना वाटले, म्हातारीने आपल्याला ओळखले की काय? म्हणून त्यांनी विचारले, "मी शिवाजीसारखा कसा?" म्हातारी म्हणाली, "तो शिवाजी नाही का? एक किल्ला घेतो नि त्याचा बंदोबस्त करण्यापूर्वीच दुसरा किल्ला घ्यायला धावतो. मग इकडे ते मुसलमान पहिला किल्ला परत घेतात. असं करू नये. जिंकलेल्या मुलखाचा पुरा बंदोबस्त करून मगच दुसऱ्या गडाकडे जावं, तसं या पेजेचं आहे. एकीकडची भुरकावी नि मग दुसरीकडे हात घालावा." महाराज मनात वरमले व त्या म्हातारीने दिलेला राजकारणाचा धडा बरोबर घेऊन गेले

तात्पर्य : मुलांनो, म्हाताऱ्या माणसांचे ऐका. त्यांचा अपमान करू नका. तुम्हालाही पुढे म्हातारे व्हावयाचे आहे.

माझ्या ठिकाणी तुम्ही असतात तर तुम्ही काय केलं असतं? अहो, एक नाही, दोन नाही तर चांगली दहा वर्षे माझ्याकडे सारखी एकाच अर्थाची पत्रे येत होती. ( १ ) आमच्यावर अवलंबून राहू नका. ( २ ) तुमच्या मुलीबरोबर आमच्या मुलाचा लग्नयोग दिसत नाही. ( ३ ) पत्रिका पटत नाही. ( ४ ) लग्न जमले. ( ५ ) आपल्याबरोबर सोयरीक करण्याची इच्छा होती पण योग नाही. वगैरे वगैरे. इतकी पत्रं येत होती, पण जावईबापू, मी डगमगलो नाही, उदास झालो नाही, व प्रयत्न सोडला नाही. शेवटी माझ्या सुधाला तुमच्यासारखा उत्तम नवरा मिळवून दिला. तेव्हा तुम्ही आपलं लिखाण चालू ठेवा. केव्हा तरी नक्की छापून येईल." रमेशने दुप्पट हुशारीने काम सुरू केले.

तात्पर्य : मुलांनो, ध्येयप्राप्तीकडे नजर ठेवून प्रयत्न करा. अपयश हा गुन्हा नव्हे. पुन्हा पुन्हा प्रयत्न करा. प्रयत्नांती परमेश्वर.

## ६२. म्हाताऱ्या माणसांचे ऐका


छत्रपति शिवाजी महाराजांनी स्वराज्य-स्थापना करण्याचा उद्योग आरंभला होता. एक एक गढ मुसलमानांच्या ताब्यातून आपल्या ताब्यात घेत होते. एकदा ते गुप्त वेषात हिंडत असताना एका म्हातारीच्या झोपडीत गेले. शिवाजी महाराजांचा एक सैनिक आहे असे समजून म्हातारीने मोठ्या प्रेमाने त्यास राहवून घेतले. रात्री जेवावयास लसणाची चटणी व जोंधळ्याची पातळ पेज केली व ती

पत्रावळीवर वाढली. शिवरायांना पेज खाण्याची कधीच सवय नव्हती. त्यामुळे ती सगळीकडून पत्रावळीच्या बाहेर वाहू लागली. शिवाजी-महाराजांची मोठी तिरपीट उडाली. ते पाहून म्हातारी म्हणाली, "अरे शूर गड्या, तू त्या शिवाजीसारखाच दिसतोस की रे!" महाराजांना वाटले, म्हातारीने आपल्याला ओळखले की काय ? म्हणून त्यांनी विचारले, "मी शिवाजीसारखा कसा ?" म्हातारी म्हणाली, "तो शिवाजी नाही का ? एक किल्ला घेतो नि त्याचा बंदोबस्त करण्यापूर्वीच दुसरा किल्ला घ्यायला धावतो. मग इकडे ते मुसलमान पहिला किल्ला परत घेतात. असं करू नये. जिंकलेल्या मुलखाचा पुरा बंदोबस्त करून मगच दुसऱ्या गडाकडे जावं, तसं या पेजेचं आहे. एकीकडची भुरकावी नि मग दुसरीकडे हात घालावा." महाराज मनात वरमले व त्या म्हातारीने दिलेला राजकारणाचा धडा बरोबर घेऊन गेले

तात्पर्य : मुलांनो, म्हाताऱ्या माणसांचे ऐका. त्यांचा अपमान करू नका. तुम्हालाही पुढे म्हातारे व्हावयाचे आहे.

# ६३. मित्र पारखून मैत्री करावी

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★




सदाशिवराव इनामदारांचा माधव नावाचा एकुलता एक मुलगा होता. मुलगा वाईट मुलांच्या संगतीत असे. सदूभाऊ व त्यांची पत्नी जानकीबाई मुलाला समजावून सांगत असत की, "माधवा, उडाणटप्पू, खुशालचेंडू व लबाड मुलांच्या संगतीत राहू नकोस. चांगली संगत धर." माधवचा आपल्या लबाड मित्रावरच जास्त विश्वास होता. बापाच्या धंद्याकडेही तो फारसे लक्ष देत नसे. मुलावर आपल्या उपदेशाचा काही परिणाम होत नाही हे पाहून आईबापांनी एक युक्ती योजिली व त्यांनी काशीयात्रेला जाण्याचा कार्यक्रम ठरविला. ( गोष्ट पूर्वीच्या काळातील आहे. ) माधवही कबूल

झाला. जानकीबाई माधवला म्हणाल्या, "माधवा, यात्रेला जाण्याच्या अगोदर दागदागिने कोठेतरी सुरक्षित ठेवले पाहिजेत." माधवने आपल्या दोन मित्रांची नावे सुचविली. सदाशिवरावांनी दोन हंडे बंद करून माधवला त्याच्या दोन मित्रांकडे ठेवावयास सांगितले व माधवच्या नकळत आणखी दोन हंडे बंद करून श्रीधर नावाच्या त्यांच्या एका विश्वासू मित्राच्या मुलाकडे स्वतः नेऊन ठेवले. मग तिघे काशीयात्रेला गेले. काही दिवसांनी परत आल्यावर सदाशिवरावांनी माधवला त्याच्या मित्रांकडे ठेवलेले हंडे परत आणण्यास सांगितले. माधवने दोन्ही मित्रांकडून उघडलेले हंडे आणले व म्हणाला, "अहो भाऊ, दोन्ही हंड्यांत दगड आहेत. आता काय करायचं ?" सदूभाऊ म्हणाले, "अरे हे दगड आहेत हे हंडे उघडल्यावरच कळलं ना ? याचा अर्थ हंड्यांत दागिने असते तर तुझ्या मित्रांनी ते काढून घेतले असते." माधवच्या डोक्यात प्रकाश पडला. नंतर सदूभाऊंनी माधवला सांगितले, 'मी माझ्या मित्राच्या श्रीधर नावाच्या मुलाकडे दोन हंडे ठेवले आहेत. ते घेऊन ये." माधवने हंडे आणले आणि उघडले. दोन्ही हंड्यांत दागिने जसे ठेवले होते, तसेच्या तसे होते. सदूभाऊंनी व जानकीबाईंनी माधवला त्याच्या दोन मित्रांची लबाडी युक्तीने दाखवून दिली. माधवने त्यांची संगत सोडली व तो श्रीधरचा जानी दोस्त बनला.

तात्पर्य : मुलांनो, चांगला मित्र कोण व लबाड कोण, हे ओळखून चांगल्या मित्रांची संगत धरा.

लाजिरवाण्या वेषात तुमच्याकडे यावं लागतं. परवाचे कपडे मला एका बाईनेच दिले होते व तिच्या सांगण्यावरूनच मी ते घातले होते."

तात्पर्य : जग हे असे आहे. खऱ्यापेक्षा खोट्याला भाव जास्त.

## ६५. व्यवहारज्ञान श्रेष्ठ

वसंतराव नावाच्या एका मानसशास्त्र प्राध्यापकांच्या पत्नी सौ. विमलाबाई आपल्या यजमानांना म्हणाल्या "हे पहा, मी जरा बाजारात जाऊन येते. जरा वेळाने शशी (वयाने २० वर्षे असलेली त्यांची मुलगी) कॉलेजमधून येईल. तिला हे इथं ठेवलेलं खायला सांगा व तुम्ही फिरायला जायच्या वेळी तिला तिच्या मैत्रिणीकडे पोचवा. फिरून परत येताना तुम्ही आपल्याबरोबर तिला घेऊन या." प्राध्यापकांनी ते कबूल केले व विमलाबाई बाहेर निघून गेल्या. शशी आल्यावर तिच्या वडिलांनी तिच्या आईचा निरोप सांगितला. शशी आईवर खूप रागावली. पण करते काय ? निघाली वडिलांबरोबर. नीटनेटक्या सुंदर शशीला दर दहावीस पावलांवर भेटणारे कॉलेज युवक प्राध्यापकांना नमस्कार करीत व त्यांच्याशी बोलण्याचे निमित्त करून शशीबरोबर बोलत राहात. प्राध्यापकांना अर्थातच दूर उभे राहावे लागे. ही संधी साधून शशी म्हणाली, "अण्णा, तुम्ही पुढे जा, तुम्हाला उशीर होत आहे. मी जाईन एकटी कुमुदकडे व तिचा मोठा भाऊ रमेश मला घरी पोचवील." मुलीचा समजूतदारपणा पाहून प्राध्यापक खूष

## ६४. जसा वेष तशी भिक्षा

●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

एका गावी एक भिकारीण भिक्षा मागून आपले पोट भरत असे. भिक्षा मागण्याच्या वेळी ती अगदी फाटके कपडे घाली. तिचे उघडे पाय वगैरे पाहून लोकांना तिची दया येऊन तिला अन्न, कपडे, वगैरे बरीच प्राप्ती होत असे. एकदा एका दयाळू बाईला तिची दया आली व तिने त्या भिकारणीला जेवायला दिले व एक बऱ्यापैकी जुने लुगडे व पोलके देऊन सांगितले की हे लुगडे नेसूनच भिक्षा मागत जा. दुसऱ्या दिवशी ती भिकारीण ते मिळालेले लुगडे व पोलके घालून भीक मागण्यास गेली. तेव्हा तिला एका बाईने विचारले, "काय ग ए भवाने, तुला भीक मागायला लाज वाटत नाही का ? तू काय लंगडी आहेस, का आंधळी आहेस ? मेलीचे कपडे पाहा ? निर्लज्ज मेली ! जा इथून." भिकारणीला त्या दिवशी काही मिळाले नाही व ती घरी गेली. दुसऱ्या दिवशी ती भिकारीण त्या शिव्या दिलेल्या बाईकडेच जुने फाटके कपडे घालून अर्धनग्न स्थितीत गेली व मोठ्याने हेल काढून भिक्षा मागण्यास सुरुवात केली. ती बाई बाहेर आली. पण तिने त्या भिकारणीला न ओळखता भिक्षा वाढली व म्हणाली, "गरीब बिचारी !" ती भिकारीण हसून त्या बाईला म्हणाली, "बाई, मी काल निर्लज्ज मेली होते, तर आज गरीब बिचारी झाले. बाई, आम्ही चांगले कपडे घातले म्हणजे आमचा धंदा चालत नाही, व कालच्यासारख्या शिव्या खाव्या लागतात, म्हणून आम्हाला या

लाजिरवाण्या वेषात तुमच्याकडे यावं लागतं. परवाचे कपडे मला एका बाईनेच दिले होते व तिच्या सांगण्यावरूनच मी ते घातले होते."

तात्पर्य : जग हे असे आहे. खऱ्यापेक्षा खोट्याला भाव जास्त.

## ६५. व्यवहारज्ञान श्रेष्ठ

वसंतराव नावाच्या एका मानसशास्त्र प्राध्यापकांच्या पत्नी सौ. विमलाबाई आपल्या यजमानांना म्हणाल्या "हे पहा, मी जरा बाजारात जाऊन येते. जरा वेळाने शशी ( वयाने २० वर्षे असलेली त्यांची मुलगी ) कॉलेजमधून येईल. तिला हे इथं ठेवलेलं खायला सांगा व तुम्ही फिरायला जायच्या वेळी तिला तिच्या मैत्रिणीकडे पोचवा. फिरून परत येताना तुम्ही आपल्याबरोबर तिला घेऊन या." प्राध्यापकांनी ते कबूल केले व विमलाबाई बाहेर निघून गेल्या. शशी आल्यावर तिच्या वडिलांनी तिच्या आईचा निरोप सांगितला. शशी आईवर खूप रागावली. पण करते काय ? निघाली वडिलांबरोबर. नीटनेटक्या सुंदर शशीला दर दहावीस पावलांवर भेटणारे कॉलेज युवक प्राध्यापकांना नमस्कार करीत व त्यांच्याशी बोलण्याचे निमित्त करून शशीबरोबर बोलत राहात. प्राध्यापकांना अर्थातच दूर उभे राहावे लागे. ही संधी साधून शशी म्हणाली, "अण्णा, तुम्ही पुढे जा, तुम्हाला उशीर होत आहे. मी जाईन एकटी कुमुदकडे व तिचा मोठा भाऊ रमेश मला घरी पोचवील." मुलीचा समजूतदारपणा पाहून प्राध्यापक खूष

झाले व पुढे निघून गेले. रात्री आठ वाजता प्राध्यापक एकटे घरी आलेले पाहून विमलाबाईंनी विचारले, "हे काय ? शशी कुठाय ?" प्राध्यापक म्हणाले, "अहो, शशी म्हणाली, 'मी एकटीच जाईन कुमुदकडे व रमेशबरोबर परत येईन.' मग तास दीड तास मी एकटाच फिरत होतो. पण काय मजा वाटली म्हणून सांगू ? उद्याच्या मानसशास्त्रावरच्या लेक्चरची तयारी मनातल्या मनात पुस्तकाशिवायच करून टाकली. इतकं मानसशास्त्र तयार झालंय माझं." प्राध्यापकांच्या 'ज्ञाना'ची कीव करीत विमलाबाई म्हणाल्या, "तुम्ही इतकं मानसशास्त्र शिकलात, नि इतकी वर्षं शिकवलंत तरी शशीचं आणि तिला भेटणाऱ्या त्या युवकांचं मानसशास्त्र काही म्हटलं काही कळलं नाही तुम्हाला ?" बायकोने डोस दिल्यावर मग प्राध्यापकांची 'ट्यूब' पेटली व त्यांनी चूक कबूल केली.

तात्पर्य : मुलांनो, मनुष्य कितीही शिकला तरी व्यवहारज्ञानाची जोड पाहिजे. तरी त्या दृष्टीने प्रयत्न करीत राहा.

## ६६. गोदानाने स्वर्गप्राप्ती

रामजी शेतकऱ्याकडे एक सुंदर गीर जातीची दुभती गाय होती. रामजीची बायको सीताबाई त्या गाईवर फार प्रेम करीत असे. गावातील बऱ्याच लोकांचा व तेथील एका भटजीचा डोळा त्या गाईवर होता. अशा स्थितीत रामजीचे वडील साप चावून दिवंगत झाले. रामजीने

वडिलांचे सर्व अंत्यसंस्कार त्या भटजीकडून करून घेतले. पण शेवटी तो भटजी रामजीला म्हणाला, "रामजीबुवा, तुझे वडील साप चावून मेले आहेत. तेव्हा स्वर्गात जातील असं मला वाटत नाही. पण एक उपाय आहे. तू ब्राह्मणाला जर दुभती गाय दान केलीस तर तिच्या शेपटीचा आधार घेऊन ते स्वर्गात जातील." रामजीने घरी येऊन बायकोला तसे सांगितले. तिला फार वाईट वाटले, रामजीने तिची कशी तरी समजूत घातली, व गाय ब्राह्मणाच्या घरी आणून दिली. बापाच्या दुःखापेक्षा गाईचे दुःख दोघांनाही अवघड वाटले. सीताबाई मोठा धूर्त व शहाणी होती. तिने मनाशी काही तरी ठरवून ती भटजीकडे गेली व म्हणाली, "गुरुजी, माझे सासरे स्वर्गाला गेले त्याबद्दल मी तुमची लई आभारी आहे." असे म्हणून तिने भटजीपुढे पाच रुपये दक्षणा ठेवली. भटजीबुवांना गाईचा आनंद होताच. त्यात आणखी पाच रुपये. भटजीबुवा खूष झाले. नंतर सीताबाई म्हणाली, "गुरुजी, एक शंका विचारू का ?" भटजींनी त्या पाच रुपयांच्या आनंदात "शंका विचार" असे सांगितले. सीताबाई म्हणाली, "गुरुजी, माझे सासरे स्वर्गात गेले, ते आता तेथूनं परतणार नाहीत, हे नक्की ना ?" भटजी म्हणाले, "एकदा या भटजीकडून स्वर्गात गेले, म्हणजे परत यायचं नावच नको !" हे शब्द ऐकल्यावर सीताबाई उठली व ती गाय घेऊन चालू लागली. भटजी पुढे जाऊन पाहातात, तो सीताबाईने गाईची दोरी सोडून दिली. गाईने पळत पळत रामजीचे घर गाठले. भटजी आ करून घरी आले. खोटा उपदेश अंगाशी आला. गोदानामुळे भटजींची दक्षणाही बुडाली.

तात्पर्य : मुलांनो, खोटे सांगून लोकांना फसवू नका.

## ६७. कोणाचे हो दोष काढू नका

★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★

माधव आपल्या वडिलांबरोबर तीर्थयात्रा करीत होता. सर्व यात्रेकरूंनी असा नियम ठरविला की पहाटे उठून देवाची प्रार्थना करायची. चार दिवस सर्वांनी नियम पाळला. एक दिवस माधव प्रार्थना करण्याकरिता उठला व प्रार्थना केल्यावर इतर यात्रेकरू झोपलेले आणि काही पेंगत असलेले पाहून आपल्या वडिलांना म्हणाला, "बाबा, पहा, लोक किती आळशी झाले आहेत! अजून घोरत आहेत. पण त्यांना प्रार्थना करायची आठवण होते आहे का ?" त्यावर त्याच्या वडिलांनी माधवला जरा चढत्या आवाजातच सांगितले, "माधवा, तू पण पहाटे न उठतास तर बरं झालं असतं." माधव म्हणाला, "बाबा, ते का म्हणून ?" वडील म्हणाले, "अरे, तू पहाटे उठून दुसऱ्याचे दोष पाहून त्यांची निंदा करतो आहेस. त्यापेक्षा तू पहाटे न उठणंच बरं, नाही का ?" माधवला आपली चूक कळली.

तात्पर्य : मुलांनो, लोकांना नावे ठेवण्यापेक्षा आपले काम करीत राहावे, हेच उत्तम.

## ६८. खोटा अहंकार

●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

सौ. लक्ष्मीबाई एकाच दिवशी अनेक ठिकाणी हळदीकुंकवाच्या समारंभास निघाल्या. त्यांना बरीच बोलावणी होती. त्या सगळीकडे गेल्या. एके ठिकाणी त्यांना एक सुंदरपैकी टोपपदरी लुगडे मिळाले.

दुसऱ्या एका ठिकाणी एक चांदीचे भांडे मिळाले व शेंगांचे दाणे व हरभरे यांनी तर पिशवा गच्च भरून गेली. बाई मोठ्या अभिमानाने घरी आली व हुश्श-हुश्श करीत बसली. इतक्यात विष्णुपंत बाहेरून आले. लक्ष्मीबाई मोठ्या कौतुकाने म्हणाल्या, "म्हटलं, पाहिलं का ? मी काय काय आणलं आहे ते ?" विष्णुपंत म्हणाले "वा ! उत्तम. तर मग आता भरपूर तेलाची फोडणी देऊन चटपट चणे कर पाहू." लक्ष्मीबाई म्हणाल्या, "वा हो वा, कमालच करता आहात. चणे मला मिळाले आहेत, पुढल काम आता तुम्ही करा." विष्णुपंत म्हणाले, "अग, तुला मिळाले हे खरं, पण ते माझ्यामुळे मिळाले ना ! मी नसतो तर तुला कोणी बोलावलं असतं का हळदीकुंकवाला ?" लक्ष्मीबाई मुकाट्याने उठल्या व हरभरे फोडणीस टाकले. ( इस पाँवसे यह पाँव अच्छे. )

तात्पर्य : मुलांनो, खोटा अहंकार धरू नका.

## ६९. नातवाचा आजीवर विश्वास

एक आजीबाई आपल्या नातवाला घेऊन खेळवीत बसल्या होत्या. आई नोकरीला तेव्हा नातवाचा ओढा साहजिकच आजीकडे होता. बोलताबोलता नातवाने आजीला विचारले, "आजी, हे आकाश इतकं वरती कसं ग गेलं ?" आजी म्हणाली, "अरे बंड्या, आकाश किनई पहिल्यांदा अगदी खाली होतं. एकदा मी अंगण झाडीत होते, त्यावेळेस ते मेलं माझ्या पाठीला लागलं, नि त्यामुळे माझ्या पाठीला खूप

खरचटलं. मला आला त्याचा राग. म्हणून मी माझ्या हातातली केरसुणीच त्याच्यावर जोरात हाणली. तेव्हा ते जे वर गेलं, ते तिथंच राहिलं." नातवाचे समाधान झाले.

तात्पर्य : **जसा अधिकार तसा उपदेश.** मुलांनो, आपल्यापेक्षा लहान मुलांना गोष्टी सांगताना त्यांच्या भाषेत त्यांना समजतील अशा तऱ्हेने सांगण्यास शिका.

## ७०. पूर्वीचे हैद्राबाद संस्थान

१९४० सालातील गोष्ट. मी हैद्राबाद रेडियो स्टेशनवर गायनाचा कार्यक्रम करण्याकरिता गेलो होतो व तेथील डॉ. राघवेंद्र राव नावाच्या माझ्या मित्राकडे उतरलो होतो. एक दिवस संध्याकाळी आम्ही दोघे मजेने फिरावयास निघालो. माझ्या मित्राने दोन सायकली घेतल्या व मला दिलेल्या सायकलला दिवा वगैरे व्यवस्थित लावून दिला. त्याने घेतलेल्या सायकलला दिवा नव्हता. आम्ही निघालो. माझ्या मित्राने मुसलमानी पोषाख करून डोक्याला लाल रंगाची गोंड्याची टोपी घातली होती. वाटेत सात वाजण्याच्या सुमारास अंधार पडला. एका वाहतूक शिपायाने माझ्या मित्राला सायकलवरून खाली उतरविले व "बत्ती किधर है?" असे विचारले. माझ्या मित्राने डोक्यावर घातलेल्या लाल टोपीकडे बोट दाखवून सांगितले, "ये देख." शिपायाने टोपीकडे पाहिले व मित्राला सोडून मला आश्चर्य वाटले. माझा मित्र म्हणाला, "येथे मुसलमान लोकाना

कायद्याचं बंधन फारसं नाही. तुमच्या सायकलला दिवा नसता तर दंड झाला असता. म्हणून मी तुमच्या सायकलला सुरुवातीलाच दिवा लावून दिला होता.” नंतर आम्ही जरा पुढे गेलो. पुन्हा एका शिपायाने माझ्या मित्राला अडविले व तो मित्राला म्हणाला, “बत्ती कहाँ है ?” त्यावर माझा मित्र न थांबता म्हणाला, “अरे बत्ती भी नहीं है और ब्रेक भी नहीं है ! ये हैद्राबाद स्टेट है, तुमको मालूम नही है ?”

तात्पर्य : मुलांनो, असे विनोदात्मक हजरजवाबीपणाचे उत्तर देण्याची सवय करा. उत्तर उपहासात्मक नसावे.

## ७१. आमचे लोकप्रिय मास्तर

●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

वाई येथील द्रवीड हायस्कूल या शाळेमध्ये मी शिकत होतो त्या वेळची ही एक सत्यकथा. मी इंग्रजी सहाव्या यत्तेत असताना सांगलीहून आमच्या शाळेत ठकार नावाचे एक शिक्षक आले. ते मास्तर आम्हाला गणित विषय शिकवू लागले. ठकार मास्तर फार चांगले-गरीब, विद्यार्थ्यांना मुलांसारखे वागविणारे आहेत असे एका सांगलीहून आलेल्या मनुष्याने सांगितले. पण शाळेत आल्यावर आठच दिवसांनी त्यांनी आमच्या वर्गातील मुलांना सहा गणिताची उदाहरणे [illegible] करून आणण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी माझ्यासकट आठ मुलांनी उदाहरणे करून आणली नव्हती. ठकार मास्तर वर्गात हसतमुखाने आले. ज्यांनी उदाहरणे केली होती त्यांच्या वह्या पाहून

खरचटलं. मला आला त्याचा राग. म्हणून मी माझ्या हातातली केरसुणीच त्याच्यावर जोरात हाणली. तेव्हा ते जे वर गेलं, ते तिथंच राहिलं." नातवाचे समाधान झाले.

तात्पर्य : **जसा अधिकार तसा उपदेश.** मुलांनो, आपल्यापेक्षा लहान मुलांना गोष्टी सांगताना त्यांच्या भाषेत त्यांना समजतील अशा तऱ्हेने सांगण्यास शिका.

# ७०. पूर्वीचे हैद्राबाद संस्थान

*●*●*●*●*●*●*●*●*●:*●*●*●*●*●*●*

१९४० सालातील गोष्ट. मी हैद्राबाद रेडियो स्टेशनवर गायनाचा कार्यक्रम करण्याकरिता गेलो होतो व तेथील डॉ. राघवेंद्र राव नावाच्या माझ्या मित्राकडे उतरलो होतो. एक दिवस संध्याकाळी आम्ही दोघे मजेने फिरावयास निघालो. माझ्या मित्राने दोन सायकली घेतल्या व मला दिलेल्या सायकलला दिवा वगैरे व्यवस्थित लावून दिला. त्याने घेतलेल्या सायकलला दिवा नव्हता. आम्ही निघालो. माझ्या मित्राने मुसलमानी पोषाख करून डोक्याला लाल रंगाची गोंड्याची टोपी घातली होती. वाटेत सात वाजण्याच्या सुमारास अंधार पडला. एका वाहतूक शिपायाने माझ्या मित्राला सायकलवरून खाली उतरविले व "बत्ती किधर है?" असे विचारले. माझ्या मित्राने डोक्यावर घातलेल्या लाल टोपीकडे बोट दाखवून सांगितले, "ये देख." शिपायाने टोपीकडे पाहिले व मित्राला सोडून मला आश्चर्य वाटले. माझा मित्र म्हणाला, "येथे मुसलमान लोकाना

कायद्याचं बंधन फारसं नाही. तुमच्या सायकलला दिवा नसता तर दंड झाला असता. म्हणून मी तुमच्या सायकलला सुरुवातीलाच दिवा लावून दिला होता." नंतर आम्ही जरा पुढे गेलो. पुन्हा एका शिपायाने माझ्या मित्राला अडविले व तो मित्राला म्हणाला, "बत्ती कहाँ है?" त्यावर माझा मित्र न थांबता म्हणाला, "अरे बत्ती भी नहीं है और ब्रेक भी नहीं है! ये हैद्राबाद स्टेट है, तुमको मालूम नही है?"

तात्पर्य : मुलांनो, असे विनोदात्मक हजरजबाबीपणाचे उत्तर देण्याची सवय करा. उत्तर उपहासात्मक नसावे.

## ७१. आमचे लोकप्रिय मास्तर

●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●★●

वाई येथील द्रवीड हायस्कूल या शाळेमध्ये मी शिकत होतो त्या वेळची ही एक सत्यकथा. मी इंग्रजी सहाव्या यत्तेत असताना सांगलीहून आमच्या शाळेत ठकार नावाचे एक शिक्षक आले. ते मास्तर आम्हाला गणित विषय शिकवू लागले. ठकार मास्तर फार चांगले–गरीब, विद्यार्थ्यांना मुलांसारखे वागविणारे आहेत असे एका सांगलीहून आलेल्या मनुष्याने सांगितले. पण शाळेत आल्यावर आठच दिवसांनी त्यांनी आमच्या वर्गातील मुलांना सहा गणिताची उदाहरणे करून आणण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी माझ्यासकट आठ मुलांनी उदाहरणे करून आणली नव्हती. ठकार मास्तर वर्गात हसतमुखाने आले. ज्यांनी उदाहरणे केली होती त्यांच्या वह्या पाहून

समाधान व्यक्त केले. ज्यांनी उदाहरणे केली नव्हती त्या मुलांना एका ओळीत उभे केले व मला ऑफीसमधून छडी आणण्या सांगितले. आता आम्हा सर्वांना मार बसणार अशी आम्हा स मुलांची खात्री झाली. मी छडी घेऊन आल्यावर ठकार मास्तरांनी माझ्यापुढे हात केला व मला म्हणाले, "मी तुम्हाला घर उदाहरणे सोडवून आणण्यास सांगितले, तुमचा खेळ खेळण्याचा कमी केला, त्याबद्दल तू मला माझ्या हातावर छडी मार" मी का कापत छडी खाली टाकली व ठकार मास्तरांच्या पायावर डोके ठे नमस्कार केला, व त्यांना म्हटले, "क्षमा करा मास्तर, मी चुकलो. माझ्याप्रमाणेच माझ्या इतर आठ मित्रांनी मास्तरांची क्षमा मागितली त्या दिवसापासून ठकार मास्तर विद्यार्थीवर्गात फारच लोकप्रिय झाले.

तात्पर्य : मुलांनो, घरी करावयास दिलेला अभ्यास नियमाने करून मगच शाळेत जात जा.

— समाप्त —

दा. क्र. ...१११५
विषय ...
BVBK-0401115

मुद्रक : अभय कुमार, आर्यभूषण प्रेस, ब्रह्माघाट, वाराणसी-१